CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

धाराशिव | रविवार, ३ मे २०२६ । वर्ष ४ थे अंक ५५ । पाने १२+८ । किंमत रु. ८/- | ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

# नातेसंबंधाला लागला 'रक्ताचा डाग'; दिराने गाठली 'क्रौर्याची परिसिमा'

## वहिनीसह तिच्या दोन मुलांचा केला खून | जमिनीच्या वादातून रात्री तलवारीने केला सपासप वार

## दक्षिण सोलापुरातील 'बोरामणी'त तिहेरी हत्याकांड | मृत महिलेच्या पतीचे वर्षभरापुर्वी झाले निधन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**
एका दिराने नातेसंबंधाला रक्ताचा डाग लावत, क्रौर्याची परिसिमा गाठल्याची दुर्दैवी घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी या गावात घडली. जमिनीच्या वादातून 'त्या' दिराने वहिनींसह तिच्या दोन मुलांवर तलवारीने सपासप वार करत तिघांचाही निर्घुण खून केला. या तिहेरी हत्याकांडमुळे 'बोरामणी'सह संपूर्ण सोलापूर जिल्हा हादरला आहे.

पोलिसांनी घटनास्थळ तात्काळ ताब्यात घेत परिसराला बॅरिकेडिंग करुन बंदोबस्त वाढविला आहे. दरम्यान, यातील मृत महिलेच्या पतीचे वर्षभरापुर्वी निधन झाल्याचे सांगण्यात आले. माणुसकीला काळीमा फासणाऱ्या या घटनेची हकीकत अशी की, बोरामणी



**मृत गायत्री मस्के, प्रिया मस्के, शिवराय मस्के**

येथील मस्के कुटुंबाची सलग तीन घरे असून मधल्या घरात गायत्री सुधाकर मस्के (वय-४२), इयत्ता बारावीचे शिक्षण घेणारी मुलगी प्रिया मस्के (वय-१८) आणि इयत्ता दहावीत शिकणारा मुलगा शिवराय मस्के (वय-१६) हे तिघेजण राहत होते. गुरुवारी रात्री उष्म्यामुळे तिघेही घराच्या गच्चीवर झोपले होते. रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या दिराने घराच्या गच्चीवर प्रवेश करुन अचानक तलवारीने सपासप वार केले. या हल्ल्यात गायत्री मस्के आणि त्यांची मुलगी प्रिया मस्के यांचा गच्चीवरच मृत्यू झाला. गंभीर जखमी झालेला शिवराय जीव वाचविण्यासाठी खाली बैठकीच्या खोलीत धावत आला असावा, मात्र तेथेच त्याचाही रक्ताच्या थारोळ्यात मृतदेह आढळून आला.

शुक्रवारी दुपारी ही घटना उघडकीस आल्यानंतर गावकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, ठसे तज्ज्ञ, रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी पंचनामा करुन तिन्ही मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आले.

### वहिनी व दिराचे घर शेजारी-शेजारी
यातील मृत गायत्री मस्के ह्या विधवा असून त्या आपल्या दोन मुलांसह स्वतःच्या घरात राहत होत्या. शेजारी त्यांचे सख्खे दिर राहत असल्याची माहिती समोर आली आहे. घर, शेतजमीन, कौटुंबिक वादातून हे हत्याकांड घडले असावे, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे.

### रात्रीच्या शांततेत घडली घटना
रात्रीच्या शांततेत घडलेल्या या रक्तरंजित घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून पोलिसांकडून संशयितांचा शोध सुरु आहे. या हत्याकांडामागील नेमका सूत्रधार कोण? हल्ल्याचे खरे कारण काय? याचा तपास पोलिसांकडून युध्दपातळीवर सुरु आहे.




## विचारपुष्प



नि आपली हिंदू संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण आहे. उदात्त जीवनाचे स्वरूप वर्णन करताना प्रत्येक हिंदूने जीवनात चार पुरुषार्थ साधले पाहिजेत असे म्हटले आहे. आपले जीवन उन्नत करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने या जीवनाच्या चार आदर्शांना लक्ष्य म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे असे मानले गेले आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ही त्या चार पुरुषार्थांची नावे आहेत.

**स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

## महत्त्वाचे

### स्पिरिट एअरलाईन्सची सर्व उड्डाणे रद्द
**वॉशिंग्टन** : अमेरिका-इराण युद्धामुळे जगभरात तेलाच्या किमतीत मोठी वाढ होत आहे. विमान वाहतूक उद्योगही याला अपवाद नाही. वाढत्या एटीएफ किमतींचा परिणाम वेगाने जाणवत आहे. अनेक एअरलाईन्स काही उड्डाणे रद्द तर काही पूर्णपणे बंद करत आहेत. याच पार्श्वभूमीवर अमेरिकन स्पिरिट एअरलाइन्सनेही तत्काळ प्रभावाने आपली उड्डाणे रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेल्या जलद वाढीमुळे परिचालन खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे सध्याच्या दरात विमानसेवा चालवणे किफायतशीर राहिलेले नाही. ■

### कच्छमध्ये 'इसिस'चा प्रसार करणाऱ्याला अटक
**कच्छ** : दहशतवादी संघटना इसिसच्या विचारसरणीचा प्रचार समाज माध्यमांवर करणाऱ्या एका व्यक्तीला गुजरातच्या कच्छ जिल्ह्यात अटक करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी शनिवारी दिली. गुजरातच्या कच्छमधील राहणारा आरोपी फकिरमामद गागडा याला शुक्रवारी अटक करण्यात आली. एका विशिष्ट विचारसरणीचा प्रचार करणारे व्हिडीओ, लिखाण आणि छायाचित्रे त्याने पोस्ट केली, असे पश्चिम कच्छ-भूज विशेष कृती दलाच्या एका निवेदनात नमूद करण्यात आले. गागडाच्या मोबाईलची तपासणी केली असता, त्यात विविध नावांची फेसबुक, इन्स्टाग्रामची खाती आढळली. तो दहशतवादी संघटना इसिसच्या विचारसरणीचे अनुसरण करीत होता तसेच त्याने समाज माध्यमांवर लोकांना इस्लामी युद्ध, खिलाफत आणि जिहादसाठी एकत्र येण्याचे आवाहन करणाऱ्या पोस्ट शेअर केल्या होता. त्या माध्यमातून भारताच्या सार्वभौमत्व, एकता व अखंडतेला धोका निर्माअण केला, असे निवेदनात म्हटले आहे. ■

# 'भोर'च्या 'त्या' नराधमाचा बळी ठरलेली 'ती' चार वर्षाची मुलगी मूळची 'सोलापूर'ची

## बालिकेवर अत्याचार करून निर्घृण हत्या; ६५ वर्षीय आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**पुणे । सोलापूर दि.२ मे-**
भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात ६५ वर्षीय नराधमाने साडेतीन वर्षीय बालिकेवर अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह गोठ्यातच टाकून दिला होता. ही घटना शुक्रवारी सायंकाळी उघडकीस आली.या प्रकरणी राजगड पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. भीमराव कांबळे (वय ६५ वर्षे, रा. साळवडे, ता. भोर) असे आरोपीचे नाव आहे.

'ती' चार वर्षांची कन्या मूळची 'सोलापूर'ची असल्याची बाब पुढे आली आहे. 'त्या' चार वर्षीय दुर्दैवी मुलीच्या काकांनी ही माहिती दिली. सोलापूर शहराच्या मध्यवर्ती भागात हे कुटुंब राहायचे. मात्र, कामानिमित्त सदर कुटुंब पुण्याला स्थलांतरित झाले आहेत. ती अभागी मुलगी सुटीसाठी आजीकडे 'भोर'ला गेली होती.

६५ वर्षीय त्या वृध्द नराधमाने तुला वासरु दाखवतो बाळा ये म्हणून तिला हाताला धरुन गोठ्यात नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. त्याने चिमुकल्या कोवळ्या कळीला जिवे मारुन शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवले होते. 'त्या' नराधम वृध्दाला कठोर शिक्षा व्हावी. आमच्या चिमुकलीला न्याय मिळावा; याकरिता समस्त सोलापूरकरांनी आपापल्या ठिकाणी काळ्या फिती लावून निषेध नोंदवावा, असे आवाहन 'त्या' मुलीच्या काकांनी केले आहे.

या प्रकरणानंतर संतप्त ग्रामस्थांनी पुणे-सातारा महामार्गावर शुक्रवारी रात्री रास्ता रोको आंदोलन केले. आरोपीला आमच्या ताब्यात द्या अशी मागणी यावेळी करण्यात आली होती. त्यानंतर शनिवारी ग्रामस्थांनी मोर्चा काढून बंद पुकारत ठिय्या आंदोलन केले. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, सिंहगड रस्ता परिसरातील राहणारी साडेतीन वर्षांची चिमुकली तिच्या आजीकडे नसरापूर येथे गेली होती. शुक्रवारी दुपारी साडेतीन वाजता ती अंगणात एकटी खेळत होती. आरोपीने तिला कशाचे तरी आमिष दाखवून एका गोठ्यात नेले आणि तिच्यावर अत्याचार केला.

त्यानंतर आरोपीने बालिकेला दगडाने ठेचून मारले व तिचा मृतदेह त्याच गोठ्यात टाकून तो पसार झाला. पाऊण तास होऊनही मुलगी घरी न आल्याने आजीने मुलीचा शोध सुरू केला. मुलगी सापडत नसल्याने ग्राम स्थांनीही शोधाशोध सुरू केली. गावातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, त्यात आरोपी मुलीला गोठ्याकडे जाताना दिसला. ग्रामस्थांनी आरोपीला बनेश्वर फाट्यावरून पकडून गावात आणले आणि चोप दिला. त्यानंतर आरोपीने मुलीचा मृतदेह लपवून ठेवलेली जागा गावकऱ्यांना सांगितली.

### चिमुकलीचा मृतदेह बाहेर काढताच गावकऱ्यांचा उद्रेक
शेणाच्या ढिगाऱ्यातून पीडित चिमुकलीचा मृतदेह बाहेर काढताच गावकऱ्यांचा उद्रेक झाला. त्यामुळे गावकऱ्यांनी तिचा मृतदेह रुग्णालयात घेऊन जाण्यास पोलिसांना विरोध केला. त्या नराधमाला ताब्यात द्या या मागणीसाठी ग्रामस्थांनी राजगड पोलिस ठाण्याला घेराव घातला आणि शुक्रवारी रात्रापासूनची पुणेसातारा महामार्गावर ठिय्या आंदोलन सुरू केले. आरोपीला जोपर्यंत आम च्या ताब्यात देणार नाही, तोपर्यंत बालिकेचा मृतदेह रुग्णालयात घेऊन जाऊ देणार नसल्याचा पवित्रा नागरिकांनी घेतला होता. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक संदीप सिंह गिल आणि अन्य अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. ग्रामस्थांची बाजू ऐकून आरोपीवर कडक कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन त्यांनी दिले. १५ दिवसांत आरोपीविरोधात दोषारोपपत्र दाखल करून फास्ट ट्रॅक न्यायालयात खटला चालविला जाईल, असे आश्वासन पोलिस अधीक्षक गिल यांनी दिले.

### फाशीची शिक्षा देण्याची मागणी...



घटना अत्यंत निंदनीय, धक्कादायक आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून, या प्रकरणात कडक कारवाई केली जाईल. प्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. विशेष सरकारी वकिलाची नेमणूक करून आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली जाईल

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

आरोपीवर १९९८ आणि २०१५ मध्ये विनयभंग आणि पोक्सोचे गुन्हे दाखल होते. या दोन्ही गुन्ह्यांतून त्याची निर्दोष मुक्तता झाली असल्याचे समोर आले आहे.

**- संदीप सिंह गिल, पोलिस अधीक्षक**

### आरोपीला ५ दिवसांची पोलिस कोठडी
भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिचा खून करणाऱ्या नराधमाला पुणे न्यायालयाने ७ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावली. आरोपीच्या लैंगिक सक्षमतेची चाचणी केली जाणार असून, त्याने यापूर्वी अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास करणार असल्याचे पुणे ग्रामीण पोलिसांनी न्यायालयात सांगितले. विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्या न्यायालयाने कोठडी सुनावली. तपास अधिकारी विजयमाला पवार आणि विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी कोठडीची मागणी केली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून आरोपीला पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली.

## चिमुकल्याची अत्याचारानंतर गळा चिरुन हत्या

**पुणे, दि.२ मे-**
म्हाळुंगे एमआयडीसी परिसरात तीन वर्षांच्या चिमुकल्यावर लैंगिक अत्याचार करून त्याचा गळा चिरून हत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. यातील अल्पवयीन आरोपीला म्हाळुंगे पोलिसांनी अवघ्या १२ तासांत ताब्यात घेतले. पीडित बालक शुक्रवारी घरासमोर खेळत असताना अचानक बेपत्ता झाला होता. कुटुंबीयांनी परिसरात शोध घेतला, मात्र तो न सापडल्याने म्हाळुंगे पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

तपासादरम्यान शेजारील एका खोलीत बॅगेमध्ये बालकाचा मृतदेह आढळून आला. प्राथमिक तपासात आरोपीने बालकाला खोलीत नेऊन त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार केल्याचे समोर आले आहे. त्यानंतर पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याने धारदार शस्त्राने बालकाचा गळा चिरून हत्या केली. मृतदेह बॅगेत भरून ठेवून आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता. सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी संशयिताचा माग काढला. मूळचा बिहारचा असलेला हा अल्पवयीन आरोपी पुणे रेल्वे स्थानक परिसरातून ताब्यात घेण्यात आला.

# चाकणकरांना ईडीचे समन्स

## भोंदू खरातच्या पतसंस्थेतील गैरव्यवहार

**मुंबई, २ मे -**
भोंदू अशोक खरातशी संबंधित मनी लॉंडरिंग प्रकरणात ईडीने प्रतिभा चाकणकरांसह त्यांचा मुलगा तन्मय चाकणकरला समन्स पाठवले आहे. समता नागरी सहकारी पतसंस्थमध्ये झालेल्या आर्थिक व्यवहाराप्रकरणी प्रतिभा आणि तन्मय चाकणकरची चौकशी होणार आहे.

प्रतिभा चाकणकर राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या बहीण आहेत. भोंदू अशोक खरात प्रकरणात ७० कोटी



रूपयांच्या घोस्ट अकाऊंटचा भंडाफोड झाला आहे.

खरात प्रकरणात ईडीच्या तपासाला आता वेग आला असून प्रतिभा आणि तन्मय चाकणकर या दोघांनाही पुढील आठवड्यात चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. त्यामुळे प्रतिभा चाकणकरांचे पाय खोलात होते असे बोलले जात आहे. समता नागरी सहकारी पतसंस्थेत चार खात्यांतून गत काही वर्षात १ कोटी २० रूपये ते २ कोटी ४० लाख रूपयांचे आर्थिक व्यवहार झाले आहेत.

हे सर्व बँक अकाऊंट्स अशोक खरातशी संबंधित होते. १३४ हून अधिक प्रॉक्सी अकाऊंट्स खरात चालवत होता असा आरोप आहे. या सर्व खात्यांचा नॉमिनी भोंदू अशोक खरात होता.

# राज्यातील ५४ लाख लाडक्या बहिणींना योजनेतून 'बाहेरचा रस्ता'



**मुंबई, २ मे -**
महिलांना आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या 'लाडकी बहीण' योजनेबाबत आता मोठी घडामोड समोर आली आहे. या योजनेतून जवळपास ५४ लाख लाडक्या बहिणींना 'बाहेरचा रस्ता' दाखवल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सरकारच्या नव्या निर्णयामुळे अनेक महिलांच्या खात्यात येणारी आर्थिक मदत थांबण्याची शक्यता आहे. अडीच लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांतील महिलांना दरमहा दीड हजार रुपये थेट बँक खात्यात जमा केले जात होते.

गेल्या दोन वर्षांपासून ही योजना राज्यभरात राबवली जात आहे. त्यामुळे लाखो महिलांना याचा थेट फायदा झाला होता. मात्र, कालांतराने या योजनेत अपात्र महिलांनीही लाभ घेतल्याचे समोर आले. काही ठिकाणी सरकारी नोकरी करणाऱ्या महिलांनीही या योजनेचा फायदा घेतल्याची प्रकरणे उघड झाली होती. त्यामुळे सुरुवातीपासूनच सरकारने घालून दिलेल्या अटींचे पालन न करणाऱ्या लाभार्थ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यानुसार अशा महिलांना योजनेतून वगळण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

# आदिवासी भागातील 'अंत्योदय' सेवा हाच ईश्वरभाव

## सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे प्रतिपादन ● गेटवे ऑफ इंडियावर रंगला 'एकल शिक्षक' मेळावा

## विदर्भात ५०० कोटींचे पहिले आदिवासी विद्यापीठ उभारणार

◆ **मुंबई, २ मे**
समाजातील वंचित, शोषित आणि दुर्गम भागात राहणाऱ्या बांधवांची सेवा करणे ही त्यांच्यावर केलेली दया किंवा उपकार नसून, ते आपले परम कर्तव्य आहे. 'शिवभावे जीवसेवा' हाच भारताचा मूळ स्वभाव असून, ही सेवा आपल्याला माणूस म्हणून समृद्ध करणारी प्रक्रिया आहे, असे प्रेरक प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

मुंबईच्या ऐतिहासिक गेटवे ऑफ इंडिया येथे 'कै. लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या' वतीने आयोजित 'कर्मयोगी एकल शिक्षक मेळावा २०२६' मध्ये ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. विदर्भ आणि नाशिकच्या अतिदुर्गम भागातून आलेल्या शिक्षकांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी 'अंत्योदय' हीच खरी ईश्वरसेवा असल्याचे अधोरेखित केले.

यावेळी व्यासपीठावर सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत,



कर्मयोगी पुरस्कार सोहळ्याला उपस्थित असलेले सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मंत्री अशोक उईके, खा. मायाताई इवनाते, मानकर ट्रस्टचे अध्यक्ष अतुल शिरोडकर व मान्यवर

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, आदिवासी विभाग मंत्री अशोक उईके, खासदार मायाताई इवनाते, मानकर ट्रस्टचे अध्यक्ष अतुल शिरोडकर उपस्थित होते. तर, या कार्यक्रमाला मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री संजय सावकारे, माजी अध्यक्ष हंसराज अहिर, श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे प्रबंध संचालक धनंजय बापट आणि अभिनेता सुनील शेट्टी उपस्थित होते.

सेवा ही केवळ भौतिक मदतीपुरती मर्यादित नसून ती समाजाप्रति असलेल्या आत्मीयतेतून आणि कळवळ्यातून निर्माण व्हायला हवी. वंचितांना मदत करताना मनात उपकाराची भावना नसावी. आदिवासी आणि दुर्गम भागातील बांधवांना केवळ मुख्य प्रवाहात आणणे पुरेसे नाही, तर त्यांच्याकडे असलेली शाश्वत जीवनमूल्ये आणि संस्कृती शहरात राहणाऱ्या सुशिक्षित लोकांनीही शिकली पाहिजे. भारताची मूळ संस्कृती ही जंगलात आणि शेतीमध्ये रुजली आहे. आपली ही मूळ ओळख आणि अस्मिता जोपर्यंत आपण जपतो, तोपर्यंतच देशाचे अस्तित्व टिकून राहील. भारताचा उदय हा केवळ स्वतःच्या कल्याणासाठी नसून संपूर्ण विश्वाच्या कल्याणासाठी आहे. आज जग ज्या संकटातून जात आहे, त्या जगाचा तोल सावरण्याचे सामर्थ्य केवळ भारतातच आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

विदर्भातील दुर्गम भागात मागील ३० वर्षांपासून नि:स्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या 'लक्ष्मणराव मानकर स्मृती संस्थेच्या' कार्याचे डॉ. भागवत यांनी विशेष कौतुक केले. अनेक संकटांवर मात करून

(शेवटच्या पानावर)

## छत्तीसगडमध्ये डीआरजीचे चार जवान हुतात्मा

◆ **कांकेर, २ मे**
आयईडी निष्क्रिय करताना शनिवारी त्याचा अचानक स्फोट झाल्यामुळे छत्तीसगडच्या कांकेर येथे जिल्हा राखीव रक्षक दलाचे चार जवान हुतात्मा झाले. यात एका निरीक्षकाचा समावेश आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

३१ मार्च रोजी देश सशस्त्र माओवादापासून मुक्त झाल्याची घोषणा केल्यानंतर माओवादी हिंसाचाराशी संबंधित हा पहिलाच मोठा स्फोट आहे. नारायणपूर जिल्ह्याच्या सीमेजवळ छोटेबेथिया पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका वनक्षेत्रात हा स्फोट झाला. माओवाद्यांनी पेरून ठेवलेले आयईडी शोधून ते निकामी करण्यासाठी डीआरजीने मोहीम हाती घेतली आहे, अशी माहिती एका पोलिस अधिकाऱ्याने दिली. मोहिमेदरम्यान सुरक्षा दलाच्या जवानांनी एक आयईडी शोधून काढला. निष्क्रिय करण्याची प्रक्रिया सुरू असताना अचानक त्याचा स्फोट झाला. यात चार जवान गंभीर जखमी झाले. त्यापैकी निरीक्षक सुखराम वट्टी, कॉन्स्टेबल कृष्णा कोमरा आणि कॉन्स्टेबल संजय गडपाले यांचा मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### विविध समस्यांबाबत समाज कल्याणमंत्री संजय शिरसाट यांना निवेदन

**सोलापूर, दि. २ मे-**

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे सोलापूर दौऱ्यावर आले असताना त्यांना राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी शहरातील विविध समस्यांबाबत निवेदन दिले. यावेळी त्यांचा श्री.चंदनशिवे यांनी त्यांचा शाल, निळी टोपी व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. सुरुवातीस त्यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक अमोल शिंदे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, लखन कांबळे, भीमा मस्के उपस्थित होते.



### हिंगुलांबिका शाळेस राज्यस्तरीय पुरस्कार

**सोलापूर, दि. २ मे-**

हिंगुलांबिका प्राथमिक शाळेस नाशिक येथील पाटील अ‍ॅक्टिंग अ‍ॅकॅडमीतर्फे राज्यस्तरीय पुरस्कार वितरीत करण्यात आले. राज्यातून१५ पुरस्कार निवडण्यात आले. त्यात हिंगुलांबिका ही एकमेव प्राथमिक शाळा आहे. नाशिक येथील परशुराम साईखेडकर नाट्यगृहात जय जय स्वामी समर्थ या प्रसिद्ध नाटकांमध्ये स्वामी समर्थांची भूमिका साकारलेल्या अक्षय मुडावदकर व अभिनेता, दिग्दर्शक व लेखक महेश डोकफोडे यांच्या हस्ते याचे वितरण करण्यात आले. अक्षय मुडावदकर यांनी सोलापूरचे हे बालकलाकार भविष्यातील मोठे कलाकार असून येणाऱ्या काळात ते मोठ्या रंगमंचावर दिसतील असे भविष्य वर्तविले. नवी मुंबई येथे झालेल्या राज्य एकांकिका स्पर्धेत हिंगुलांबिका प्राथमिक शाळेतील इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी कचरा नव्हे ही तर निसर्गाची संपत्ती या विषयावर एकांकिका सादर केली होती. बाहुसार शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बापू ढगे व सचिव विजय पुकाळे यांनी त्यांचे अभिनंदन केले.




### गैबीपार उर्दू प्रा शाळेत महाराष्ट्र दिन, कामगार दिन साजरा

**सोलापूर, दि. २ मे-**

गैबीपीर उर्दू प्रा. स्कूल येथे एक मे रोजी महाराष्ट्र व कामगार दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ कामगार लॅब टेक्निशियन महिबूब मदार शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उपस्थित मुलांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या महत्व या विषयावर मुख्याध्यापक अ. मजीद शेख यांनी माहिती दिली. यावेळी नवभारत साक्षरता या उपक्रमात नव साक्षर या परिक्षेत उत्तीर्ण झालेले विद्यार्थ्यांना नवसाक्षर यांच्या प्रमाणपत्र देउन गौरव करण्यात आले. यावेळी निलोफर शेख, तहसीन चाँदा, जमादार शबाना, अकबर मुतवल्ली, सलमा नदाफ, मसरत शेख, शब्बीर अहमद शेख, पालक आफरीन शेख, सालेहा शेख, यासीनबी शेख यांची उपस्थित होती.




### उमाबाई श्राविका विद्यालयात वार्षिक निकालाचे वाटप

**सोलापूर, दि. २ मे-**

येथील उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त इयत्ता पाचवी ते अकरावी निकालाची घोषणा व विद्यार्थ्यांच्या प्रगती पत्रकाचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. महाराष्ट्र दिनानिमित्त प्रशालेत सकाळी ध्वजारोहण कार्यक्रम संस्थेच्या विश्वस्त देवई शहा, वरिष्ठ दीप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, सर्व विभागाचे विभाग प्रमुख, बसप्पा कुंभार, महानंदा झाडे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या पाल्यांचे द्वितीय सत्रचे पेपर दाखविण्यात आले. पाल्याचे पेपर पाहून पालकांनी समाधान व्यक्त केले.

# पंढरपुरात पैसे भरुनही 'आवास' च्या घरांची प्रतिक्षा

## कित्येक वर्ष उलटली; विक्रम शिरसट यांचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २ मे-**

पंतप्रधान आवास योजना कित्येक वर्षांपासून रखडली; लाभार्थ्यांचे पैसे अडकले, घरांचे स्वप्न अधांतरी असल्याने येथील माजी नगरसेवक विक्रम शिरसट यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

पंढरपूर शहरातील पंतप्रधान आवास योजना गेल्या काही वर्षांपासून धुळखात पडल्याचे चित्र आहे. घर मिळण्याची प्रतीक्षा करताना नागरिकांना ना घरे मिळाली, ना भरलेले पैसे परत मिळाले, त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

योजनेसाठी अनेकांनी व्याजाने पैसे काढून हप्ते भरले होते. मात्र, दीर्घकाळ उलटूनही कोणतीही ठोस प्रगती न झाल्याने आर्थिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे लाभार्थ्यांचे म्हणणे आहे. हतबल झालेल्या नागरिकांनी अखेर भाजपचे माजी शहराध्यक्ष व नगरसेवक विक्रम शिरसठ यांच्याकडे व्यथा मांडली. शिरसठ यांनी नागरिकांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व बेघर नागरिकांना घर मिळावे या उद्देशाने केंद्र सरकारने पंतप्रधान आवास योजना सुरू केली. मात्र पंढरपूरमध्ये स्थानिक नगरपालिका व ठेकेदार यांच्यातील मतभेदामुळे योजना रखडली आहे.



दहा वर्षे उलटूनही अनेकांना घरे मिळालेली नाहीत. प्रत्यक्षात अनेक कामे अपूर्ण अवस्थेत आहेत, असे शिरसट म्हणाले. प्रकरणामुळे पंढरपूरमध्ये प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत असून, लवकरात लवकर योजना पूर्ण करून लाभार्थ्यांना न्याय देण्याची मागणी जोर धरत आहे.

> **परिणामांना पालिका, ठेकेदार जबाबदार**
>
> पंढरपूरकरांना न्याय मिळवून देण्यासाठी उग्र आंदोलन करण्याची आमची तयारी आहे. जर न्याय मिळाला नाही तर पैसे गुंतवलेल्यांना बेकायदेशीर ताबा मिळवून देण्याचाही विचार करु. आंदोलनानंतर होणाऱ्या परिणामांना नगरपालिका व संबंधित ठेकेदार जबाबदार असतील.
>
> **विक्रम शिरसट,** माजी नगरसेवक, पंढरपूर नगरपालिका

### 'उर्स-ए-शरीफ' निमित्त रेल्वेकडून कलबुर्गी दरम्यान विशेष गाड्या धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

संत ख्वाजा बंदा नवाज यांच्या 'उर्स-ए-शरीफ २०२६' निमित्त, रेल्वे प्रशासन हैदराबाद आणि सोलापूर विभागातील कलबुर्गी दरम्यान खालील तपशीलांनुसार ४ विशेष गाड्या धावणार आहेत.

हैदराबाद-कलबुर्गी उर्स विशेष गाड्यामध्ये ४ फेऱ्या होतील. यात गाडी क्रमांक ०७१७७ (विशेष) ही गाडी दि. ०२.०५.२०२६ आणि ०५.०५.२०२६ रोजी हैदराबाद येथून २३:५५ वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०७:०० वाजता कलबुर्गी येथे पोहोचेल. (२ फेऱ्या) आणि गाडी क्रमांक ०७१७८ (विशेष) ही गाडी दि. ०३.०५.२०२६ आणि ०६.०५.२०२६ रोजी कलबुर्गी येथून ०७:४० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १४:०० वाजता हैदराबाद येथे पोहोचेल. (२ फेऱ्या). बेगमपेठ, सानत नगर, हाफिजपेठ, लिंगमपल्ली, शंकरपल्ली, विकाराबाद, तांदूर, सेडम, मलखेड रोड, चित्तापूर आणि वाडी अशे गाडीचे थांबे असतील तर २ स्लीपर क्लास (शयनयान श्रेणी) आणि १४ द्वितीय श्रेणी आसनयान (Second Class Sitting), ज्यामध्ये २ लगेज-कम-गार्ड ब्रेक व्हॅन्सचा समावेश आहे. (एकूण १६ डबे) अशी रचना असेल.



### सांगोला तहसील कार्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सांगोला, दि. २ मे-**

महाराष्ट्र राज्याचा ६७ वा स्थापना दिवस निमित्त राष्ट्रीय ध्वज वंदनाचा सांगोला तहसील कार्यालय येथे शासकीय कार्यक्रम आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांचे शुभहस्ते पार पडला. यावेळी सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे, मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव, सहायक निबंधक डॉ.वैशाली साळवे, सह दुय्यम निबंधक अपर्णा गुरव, नगराध्यक्ष आनंदा माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, माजी सैनिक, तहसिल कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थित स्वातंत्र्य सैनिक वारस पत्नी, शहीद जवानाच्या वीर पत्नी, वीर माता-पिता यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी तहसिलदार बाळूताई भागवत, आ.डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजी इंगोले यांनी देशभक्तीवर गिताचे गायन केले. ग्राम महसूल अधिकारी गणेश पंडीत यांनी आभार मानले.

## '५ स्टार' दर्जाचे नवीन बस पोर्ट सोलापुरात उभारा

**सोलापूर विकास मंचाची परिवहन मंत्र्यांकडे मागणी;**

**भैया चौकातील नरसिंग गिरजी मिलची जागा प्रस्तावित**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे-**

शहरासाठी अत्याधुनिक रेल्वे स्टेशन जवळ '५ स्टार' दर्जाचे नवीन बस पोर्ट उभारण्याची मागणी सोलापूर विकास मंचने महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे .

यावेळी सोलापूर विकास मंचचे केतन शहा, दत्तात्रय अंबुरे वकील, प्रसन्न नाझरे, विजय कुंदन जाधव आदी उपस्थित होते. त्यांच्या भेटीसाठी शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख नगरसेवक अमोल शिंदे यांनी प्रयत्न केले. त्यांनी दिलेल्या निवेदनात असे नमूद आहे की, सोलापूर हे राज्यातील एक महत्त्वाचे वाहतूक केंद्र असून, सध्या असलेले जुने एस.टी. स्थानक वाढत्या प्रवासी संख्येमुळे अपुरे पडत आहे. तसेच स्थानकाची विद्यमान अवस्था समाधानकारक नसल्याने नागरिकांमध्ये व प्रवाश्यां मध्ये नाराजी आहे.

जुळे सोलापूर परिसरात सुद्धा एसटी स्टँड असणे गरजेचे आहे, नागरिकांनी अनेक वर्षांपासून सोलापूर नवीन बस पोर्टची मागणी करत आहेत. या पार्श्वभूमीवर, रेल्वे स्टेशन जवळील भैया चौक येथील अनेक वर्षांपासून बंद असलेल्या नरसिंग गिरजी मिलची जागा, नवीन बस पोर्टसाठी सुचविण्यात आली आहे. ही जागा सध्या नॅशनल टेक्सटाईल कॉर्पोरेशन यांच्या ताब्यात असून, मुख्यमंत्री व परिवहनमंत्र्याद्वारे योग्य नियोजन



केल्यास बारामती व इंदापूरच्या धर्तीवर तसेच रेल्वे स्टेशन जवळ अत्याधुनिक ५ स्टार बस पोर्ट उभारता येऊ शकते, असे विकास मंचचे मत आहे.

**मंगळवेढा रोडमार्गे एस टी वाहतूक सुलभ करण्याचा आराखडा**

पंढरपूरच्या आषाढी व कार्तिकी वारी, तुळजापूरच्या नवरात्रीला तसेच अक्कलकोटसाठी लाखो भाविक देश भारतातून एस टी स्टँड चा वापर करतात. तसेच सध्याच्या एस टी स्टँड वर रेल्वे स्टेशन वरून जाण्यासाठी प्रवाश्यांना व भक्तांना रिक्षा द्वारे महागडा प्रवास करावा लागतो. प्रस्तावित आराखड्यानुसार, सर्व एस.टी. बसेस मंगळवेढा रोडमार्गे शहराबाहेर वळवता येतील, ज्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठी मदत होईल. यामुळे प्रवाशांना अधिक सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक सुविधा मिळण्याबरोबरच शहराच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळेल.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना हा मुद्दा व्यवस्थित समजावून सांगितल्यावर त्यांनी ताबडतोब सेक्रेटरी यांना एनटीसीशी सोबत पत्र व्यवहार करण्याचे आदेश दिले.

## शिवस्मारकतर्फे शिवकालीन युध्दकला प्रशिक्षण उत्साहात

**सेवासदन शाळेत उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे-**

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ (शिवस्मारक) तर्फे सेवासदन प्रशालेत शिवकालीन युद्धकला प्रशिक्षण शिबिर उत्साहात झाले. या शिबिराचा समारोप महाराष्ट्र दिनी करण्यात आला.

या शिवकालीन युद्ध कला प्रशिक्षण शिबिराअंतर्गत लाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यात तीस मुलींनी सहभाग घेतला होता. त्यांना शरीराच्या वेगवेगळ्या भागावर करावयाचे प्रहार शिकवण्यात आले. अचानक हल्ला झाला तर कसा प्रतिकार करावा याचेही प्रशिक्षण देण्यात आले. लाठी द्वंद्वाचेही प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षक विवेक मिस्कीन आणि स्वाती कानगुडे यांनी केवळ सात दिवसांत मुलींची खूप छान प्रात्यक्षिके बसवली.

एक मे रोजी शाळेच्या महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमात या




लाठी प्रशिक्षणाची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. या शिबिराच्या समारोपप्रसंगी व्यासपीठावर याप्रसंगी शाळेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, शाळेचे उपाध्यक्ष, सचिवा वीणा पतकी, मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे, शिवस्मारकच्या संचालिका माधवी कुलकर्णी आणि व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर उपस्थित होते.

याप्रसंगी शिवस्मारकच्या संचालिका माधवी कुलकर्णी यांनी शिवस्मारकतर्फे राबविण्यात येणारे उपक्रम आणि शिवकालीन युद्धकला प्रशिक्षणाचा उद्देश सांगितला.

सर्व शिक्षक वर्ग, शाळेचे विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. याप्रसंगी शाळेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री, शाळेचे उपाध्यक्ष, सचिवा वीणा पतकी, मुख्याध्यापिका राजश्री रणपिसे, शिवस्मारकच्या संचालिका माधवी कुलकर्णी आणि व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर उपस्थित होते. शिक्षिका रुपाली पवार यांनी सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केले.

> **शाळांना मोफत प्रशिक्षण**
>
> शिवस्मारकतर्फे विविध शाळांमध्ये शिवकालीन युद्धकलेचे मोफत प्रशिक्षण विद्यार्थी – विद्यार्थिनींना देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक शाळांनी शिवस्मारकशी संपर्क साधावा, असे आवाहन शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी केले आहे.



### श्री मल्लिकार्जुन व रखमाबाई हत्तुरे महाविद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय, श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा, श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर या शिक्षण संकुलात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन साजरा करण्यात आला.

प्रशालेचे प्र. मुख्याध्यापक रमेश दिंडोरे, मार्गदर्शक धरेप्पा हत्तुरे, विनायक हत्तुरे, ज्येष्ठ शिक्षक अण्णाराया तुप्पद, बसवराज कोरे, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक सचिन जाधव, बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका संगिता हुमनाबादकर यांच्या प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजावारोहन करण्यात आले. प्र. मुख्याध्यापक दिंडोरे यांनी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिनाविषयी माहिती सांगून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी भारत राऊत, गंगाराम घोडके, विद्याधर हुलगेरी, अनिलकुमार गावडे, अनिता हौदे, परमेश्वर चांदोडे, संतोष हिरेमठ, गणेश कोरे, संतोष स्वामी, अमरनाथ कदारे, लक्ष्मीकांत पनशेट्टी, प्रतीक्षा बिडवे, प्रिया पसारे, सुनीता गंगोडा उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश आगवणे यांनी केले. सुकेशनी गंगोडा आभार मानले.

## पशू-पक्ष्यांसाठी 'मायेचा ओलावा': एकता महिला मंचचा उपक्रम

**मालबार गोल्ड येथे बक्षीस वितरण सोहळा**

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. २ मे-**

उन्हाच्या तीव्रतेमुळे पशू-पक्ष्यांना पाण्याची मोठी टंचाई भासत आहे. त्यादृष्टिकोनातून 'एकता महिला मंच'ने सामाजिक बांधिलकी जपत 'मायेचा ओलावा' हा अनोखा उपक्रम राबवला. उपक्रमांतर्गत महिलांनी आपल्या घरासमोर किंवा गॅलरीत पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची सोय केली होती.

या कार्याचा गौरव आणि महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आज, २ मे रोजी 'मालबार गोल्ड अँड डायमंड्स', सोलापूर येथे बक्षीस वितरण सोहळा पार पडला.

कार्यक्रमाचा प्रारंभ क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाला. यावेळी व्यासपीठावर मालबार गोल्डचे मार्केटिंग मॅनेजर शाहीर सय्यद, एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर,



मार्केटिंग इंचार्ज सुमित टकले, मयूर दहिहांडे आणि ज्योती बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. एकता महिला मंचचे प्रमुख प्रभाकर क्षीरसागर यांनी घरासमोर एक मडक्यात पाणी ठेवून या मुक्या जीवांचे प्राण वाचवावेत, हीच खरी समाजसेवा असल्याचे सांगितले.

मालबार गोल्डचे मार्केटिंग मॅनेजर शाहीर सय्यद यांनी हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून अशा उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही नेहमीच तत्पर असल्याचे सांगितले. त्यांनी महिलांना मालबार गोल्डच्या विविध योजनांची माहितीही दिली.

सोहळ्याला वसुधा कुंभार, रंजना गवळी, सविता काजळे, शीतल काजळे, मैना सोनवणे, अश्विनी डाके, रत्नप्रभा गायकवाड, आशा विभुते, सुरेखा कोळी, वैशाली साळुंखे, सुखनंदा सुरवसे, मथुरा दसवंत, उज्वला गुरव, संगीता काजळे, संगीता डाके, मंगल डाके आदी सदस्या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजना गवळी यांनी केले. प्रास्ताविक रत्नप्रभा गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन आशा विभुते यांनी केले.

> **विविध स्पर्धा आणि विजेते**
>
> १) 'मायेचा ओलावा' (पक्षी जल सोय स्पर्धा):
>
> प्रथम क्रमांक: लक्ष्मी सुतार, द्वितीय क्रमांक: कविता दसवंत, तृतीय क्रमांक: गीतांजली जोशी.
>
> २) संगीत खुर्ची : प्रथम: अनुजा काजळे, द्वितीय : कविता दसवंत, तृतीय: क्रांती पाटील.
>
> ३) लकी ड्रॉ विजेते : प्रथम : लोचना डाके, द्वितीय : लक्ष्मी मोरे, तृतीय : लक्ष्मी सुतार.
>
> ४) दागिन्यांची नावे सांगणे : प्रथम: गंगा गोडगे, द्वितीय: क्रांती पाटील, तृतीय: कविता दसवंत.
>
> सहभागी इतर सर्व सदस्यांना 'कॉम्प्लिमेंटरी' बक्षिसे देण्यात आली.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित



# खलिस्तान्यांचा कॅनडाला धोका

## गुप्तचर यंत्रणेने दिली कबुली



**ओटावा, २ मे**

खलिस्तानी तत्त्वांचा कॅनडाला मोठा धोका निर्माण होत आहे, अशी कबुली कॅनडाच्या गुप्तचर यंत्रणेने शुक्रवारी जारी केलेल्या एका अगवालात दिली आहे.

कॅनडाची गुप्तचर यंत्रणा सीएसआयएसचा २०२५ मधील अहवाल कॅनडाच्या संसदेत सादर करण्यात आला. कॅनडातील खलिस्तानी घटकांचे उपक्रम सातत्याने हिंसक आणि अतिरेकी विचारसरणीचा प्रसार करीत असल्याचे या अहवालात म्हटले आहे. चीन, रशिया आणि भारत हेरगिरीच्या माध्यमातून कॅनडाच्या अंतर्गत राजकारणात हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप यात करण्यात आला. असा प्रयत्न करणारे आणखी काही देश असल्याचे अहवालात म्हटले आहे.

एअर इंडियाच्या विमानात बॉम्बस्फोट घडवण्याच्या घटनेला मागील वर्षी ४० वर्षे पूर्ण झाली. या स्फोटातील संशयित कॅनडातील खलिस्तानी कट्टरवादी संघटनांचे सदस्य होते. कॅनडाच्या इतिहासातील आतापर्यंतचा हा सर्वांत घातक दहशतवादी हल्ला मानला जातो. या हल्ल्यात ३२९ जणांचा मृत्यू झाला होता. यात बहुतांश कॅनडाचे नागरिक होते. २०२५ मध्ये खलिस्तानी समूहांशी संबंधित कोणताही हल्ला झालेला नाही, असे या अहवालात म्हटले आहे. कट्टरवादी समूहांच्या वाढत्या हालचाली कॅनडाच्या राष्ट्रीय हितांसाठी धोका ठरत आहे. यातील काही जण कॅनडाच्या नागरिकांशी जुळलेले आहे आणि कॅनडातील संस्थांचा वापर हिंसक अजेंडा राबवण्यासाठी केला जात आहे.

### पाळत ठेवणे आवश्यक

**याचा उद्देश भारत सरकारच्या विरोधातील टीकेचा सूर येऊ नये आणि समुदायात भीती निर्माण करण्याचा आहे. कॅनडात भारतीय समर्थकांच्या उपस्थितीमुळे या प्रकारच्या कारवाया आणि पाळत ठेवणे आवश्यक असल्याचे यात म्हटले आहे.**

समुदायातील लोक निधी उभारतात आणि नंतर त्याचा वापर हिंसक कारवायांसाठी केला जातो, असा आरोप अहवालात करण्यात आला. अंतर्गत स्थैर्यासाठी निर्माण झालेल्या धोक्यांचा सामना भारत करीत आहे. यात खलिस्तानी फुटीरतावादाचाही समावेश आहे. कॅनडात खलिस्तानचे समर्थन एका कायदेशीर राजकीय हालचाल आहे, असे या अहवालात म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

### भारतासह काही देशांवर आरोप

**जगभरातील बदलत्या परिस्थितीत चीन, रशिया, भारत, इराण, पाकिस्तान आणि इतर काही देश कॅनडाच्या राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप अहवालात करण्यात आला. भारताने कॅनडातील नेते, पत्रकार आणि भारतीय वंशाच्या नागरिकांसोबत दृढ संबंध निर्माण केले असून, यामुळे कॅनडात सीमापार दमनाची स्थिती निर्माण झाली आहे. यात पाळत ठेवणे आणि दबाव निर्माण करण्यासासारख्या कारवायांचा समावेश आहे.**



जम्मू-काश्मीरमध्ये स्थानिक प्रशासनाने मादक पदार्थांची विक्री आणि साठवणूक करणाऱ्यांविरोधात मोहीम उघडली आहे. या अवैध व्यापारात गुंतलेल्या आरोपींचे घर आणि दुकाने भुईसपाट केली जात आहेत

# कमलेश पारेखचे यूएईतून भारतात प्रत्यार्पण

### शेकडो कोटींचे फसवणूक प्रकरण

**नवी दिल्ली, २ मे**

देशातील बँकांची शेकडो कोटींनी फसवणूक करणारा कमलेश पारेख याचे संयुक्त अरब अमिरात येथून प्रत्यार्पण करण्यात आले असून, या माध्यमातून सीबीआयला मोठे यश मिळाले आहे. तो दीर्घकाळापासून फरार होता. पारेखला शुक्रवारी भारतात आणले. दिल्लीत पोहोचताच सीबीआयने त्याला ताब्यात घेतले.

ही कारवाई परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि केंद्रीय गृह मंत्रालयाच्या समन्वयातून पार पाडण्यात आली. पारेखच्या विरोधात इंटरपोलचा रेड कॉर्नर नोटीस जारी करण्यात आली होती. त्या आधारे यूएईतून त्याचा माग काढून त्याला ताब्यात घेण्यात आले. भारताने केलेल्या औपचारिक विनंतीनंतर दोन्ही देशांमधील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. त्यानंतर त्याला भारतीय यंत्रणांच्या हवाली करण्यात आले. कमलेश पारेखने मोठ्या प्रमाणात बँकांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. त्याने केलेल्या घोटाळ्यामुळे देशातील कित्येक बँकांच्या समूहाचे मोठे नुकसान झाले. या बँकिंग समूहाचे नेतृत्व भारतीय स्टेट बँक करीत होती. या प्रकरणात शेकडो कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली. पारेखने अन्य प्रवर्तक आणि गुंतवणूकदारांसोबत बँकेतून घेतलेले कर्ज विदेशातील कंपन्यांमध्ये वळते केले. यासाठी बनावट निर्यात, संशयास्पद आर्थिक व्यवहार आणि बँकिंग चॅनल्सचा दुरुपयोग करण्यात आला. या फसवणुकीसाठी पारेखने यूएईसह कित्येक देशांत पसरलेल्या आपल्या व्यावसायिक नेटवर्कचा वापर केला, अशी माहिती सूत्रांनी दिली. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेने भारताला परत केल्या ६५७ प्राचीन कलाकृती

**वॉशिंग्टन, २ मे**

अमेरिकेने भारताला सुमारे १.४ कोटी डॉलर्स किमतीच्या ६५७ प्राचीन कलाकृती परत केल्या आहेत. या कलाकृती तस्करी नेटवर्कद्वारे विदेशात पोहोचवण्यात आल्या होत्या. या तपासानंतर जप्त करून परत करण्यात आल्या.

मॅनहटन डिस्ट्रिक्ट ॲटर्नी एल्विन ब्रॅग यांनी मंगळवारी या कलाकृती परत करण्याची घोषणा केली. या सर्व कलाकृती आंतरराष्ट्रीय तस्करी नेटवर्कच्या तपासादरम्यान जप्त करण्यात आल्या होत्या. तपासात कुख्यात कला विक्रेता सुभाष कपूर आणि तस्कर नॅन्सी वीनर यांच्याशी संबंधित नेटवर्क समोर आले. या नेटवर्कद्वारे भारत आणि इतर अनेक देशांच्या सांस्कृतिक वारशाची चोरी आणि विक्री केली जात होती. न्यूयॉर्कमधील भारतीय वाणिज्य दूतावासाच्या कौन्सिलर राजलक्ष्मी कदम यांच्या उपस्थितीत कलाकृती परत करण्यात आल्या. भारताचे महावाणिज्य दूत बिनय प्रधान यांनी अमेरिकन एजन्सींच्या सहकार्याची प्रशंसा केली. परत केलेल्या वस्तूंमध्ये २० लाख डॉलर्स किमतीची 'अवलोकितेश्वरा'ची कांस्य प्रतिमा आहे. ती छत्तीसगडमधील रायपूर येथील संग्रहालयातून चोरीला गेली होती. याव्यतिरिक्त, मध्य प्रदेशातील मंदिरातून चोरी झालेली नृत्य करणाऱ्या गणेशाची मूर्ती देखील समावेश आहे. एक लाल वाळूच्या दगडाची बुद्ध प्रतिमा देखील परत करण्यात आली आहे. याची किंमत सुमारे ७५ लाख डॉलर्स आहे. ही प्रतिमा देखील तस्करी करून अमेरिकेत पोहोचवण्यात आली होती. मॅनहॅटन डिस्ट्रिक्ट ॲटर्नीच्या ॲन्टिक्विटीज ट्रॅफिकिंग युनिटने आतापर्यंत ६२०० हून अधिक सांस्कृतिक वस्तू जप्त केल्या आहेत. यांची एकूण किंमत ४८५ दशलक्ष डॉलर्सपेक्षा जास्त आहे. यापैकी ५९०० हून अधिक वस्तू ३६ देशांना परत करण्यात आल्या आहेत. अजूनही अनेक कलाकृती विदेशात आहेत. यांना परत आणण्यासाठी तपास आणि कारवाई सुरू राहील, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'राजा शिवाजी' चित्रपटाचा बॉक्स ऑफिसवर धमाका

**मुंबई** : अभिनेता रितेश देशमुख याचा ड्रीम प्रोजेक्ट असणारा 'राजा शिवाजी' चित्रपट महाराष्ट्र दिनी प्रदर्शित झाला. चित्रपटाने पहिल्याच दिवशी



बंपर कमाई करत ११.७० कोटींचा गल्ला कमवला आहे. या चित्रपटाने मराठीत ८.७५ कोटी रुपयांची तर हिंदीत २.९५ कोटींची कमाई केली. या चित्रपटात संजय दत्त, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री, फरदीन खान आणि जितेंद्र जोशी यांच्याही महत्त्वाच्या भूमिका आहेत. विशेषतः रितेशच्या इतर चित्रपटांप्रमाणे सलमान खानने या चित्रपटाही छोटीशी भूमिका साकारली आहे. त्याने 'जिवा महाला'ची खास भूमिका साकारली आहे. सुमारे १०० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झाला आहे.

### २० वर्षांनी रंगभूमीवर येणार अतुल परचुरेंचे नाटक



**मुंबई** : काही नाटके केवळ मनोरंजन करत नाहीत तर, काही अजरामरही होतात. तब्बल २० वर्षांपूर्वी रंगभूमीवर गाजलेले 'ए.. भाऊ डोकं नको खाऊ!' हे नाटक पुन्हा एकदा रसिक प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. रॉयल थिएटर आणि निर्माते मिहिर गवळी यांच्या या नव्या प्रयोगाचे दिग्दर्शक संतोष पवार यांनी केले आहे. या नाटकानिमित्त अतुल परचुरेंच्या आठवणी ताज्या झाल्या आहे. या प्रसिद्ध नाटकात विनोदाची अप्रतिम जाण असलेले अतुल परचुरे यांची महत्त्वाची भूमिका होती. विनय येडेकर यांच्या सोबत संतोष पवार यांची अभिनयाची धमाल रंगणार आहे. त्यात आनंदा कारेकर, सानिका शिंदे, सोनाली मगर, आदित्य गटे आणि संकेत बिवलकर हे कलाकार आहेत. संदेश बेंद्रे (नेपथ्य), शीतल तळपदे (प्रकाश योजना), आशुतोष वाघमारे (संगीत) आणि हास्या पवार (वेशभूषा) यांची आहे.

### कियारा सहकुटुंब गेली सुटीवर

**मुंबई** : कियारा अडवाणी सध्या सहकुटुंब सुटीवर गेली आहे. तिने समाज माध्यमावर फोटो जारी केले आहेत. यामध्ये ती समुद्रकिनाऱ्यावर आराम करताना दिसत आहे. तिने या फोटोंना 'माझ्या आयुष्यातील प्रियजनांसोबत' असे कॅप्शन दिले आहे. एका फोटोत तिने एका बाजूला तिचे कपडे हँगरवर टांगलेले आहेत, तर दुसऱ्या बाजूला तिची लाडकी मुलगी सरायाचे कपडेही आहेत. या फोटोमधून अभिनेत्रीने तिची मुलगी आता तिच्या आयुष्याचा एक भाग कशी झाली असल्याचे दाखवून दिले आहे. यर्टमधील दुसऱ्या एका फोटोमध्ये, ती आनंदाने पाण्याकडे बघताना दिसत आहे. आणखी एका फोटोमध्ये, ती उन्हात बसलेली आहे.



# बॉम्ब निष्क्रिय करताना स्फोट

## इराणमध्ये मोठी दुर्घटना

### आयआरजीसीचे १४ जवान ठार

**तेहरान, २ मे**

युद्ध संपुष्टात आणण्यासाठी अमेरिकेसोबत चर्चा सुरू असतानाच इराणमध्ये बॉम्ब निष्क्रिय करताना झालेल्या स्फोटात इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड्स कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीचे १४ जवान ठार झाले.

जवळपास १२०० हेक्टरच्या शेतीत विखुरलेले आणि स्फोट न झालेले बॉम्ब आता मोठा धोका ठरत असल्याचे वृत्त इराणची सरकारी वृत्तसंस्था फार्स न्यूजने दिले. इराणमध्ये निर्माण झालेल्या एका मोठ्या समस्येचा हा स्फोट एक भाग आहे.

दरम्यान, ट्रम्प प्रशासनाने जुने धोरण बदलले आहे. पूर्वी अमेरिका जगातील ऊर्जेवर नियंत्रण ठेवण्याच्या धोरणावर चालायचा. आता तो अडथळे निर्माण करण्याच्या धोरणावर चालत असल्याची टीका आयआरजीसीने समाज माध्यमावर केली.

होर्मुझ सामुद्रधुनीत याच उद्देशाने अमेरिकेने नाकेबंदी केली आहे. चीन, रशिया आणि युरोपला रोखण्याचा खरा उद्देश अमेरिकेचा यामागे आहे, असा आरोप आयआरजीसीने केला. मात्र, ही योजना २० दिवसांतच अपयशी ठरली. अडथळे निर्माण करण्याच्या अमेरिकेच्या या धोरणाविरुद्ध एकत्र आलेले देश इराणच्या बाजूने येत आहे, असा दावा आयआरजीसीने केला.

इराणने एक नवा प्रस्ताव पाठवला असला, तरी त्यावर समाधानी नाही, असे व्हाईट हाऊसमध्ये पत्रकारांशी चर्चा करताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले. त्यांना तडजोड करायची आहे. पण, मी त्यावर समाधानी नाही. पुढे काय होते ते पाहू, असे ट्रम्प यांनी सांगितले. इराणने काही पावले उचलली आहेत. मात्र, इराण कोणत्याही करारापर्यंत पोहोचेल, यावर विश्वास नाही, असे ट्रम्प यांनी सांगितले.

इराणचे नेतृत्व विखुरले आहे, असा दावा ट्रम्प यांनी केला. इराणमध्ये दोन ते चार गट निर्माण झाले असून, ते देश वेगवेगळ्या दिशेला खेचत असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. इराणमध्ये नेमके नेतृत्व नसल्याने चर्चेत अडथळा येत आहे. मात्र, प्रत्येक गटाला कोणती ना कोणती तडजोड हवी आहे, असे ट्रम्प यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# फेरमतदानादरम्यान भाजपा-टीएमसी समर्थक भिडले

## मतदानाला जाण्यापासून रोखल्याचा आरोप

**दक्षिण २४ परगणा, २ मे**

दक्षिण २४ परगणा जिल्ह्यात फेरमतदानादरम्यान भाजपा आणि तृणमूल काँग्रेस समर्थकांमध्ये झडप झाली. दरम्यान, स्थानिक लोकांनी तृणमूल काँग्रेसवर मतदान करण्यास रोखण्यासाठी धमकावल्याचा आरोप केला आहे. तणावाची स्थिती लक्षात घेता परिसरात सीआरपीएफ आणि आरएएफचे जवान तैनात करण्यात आले आहे.

पश्चिम बंगालमधील दोन विधानसभा मतदारसंघांतील १५ मतदान केंद्रांवर शनिवारी सकाळी ७ वाजेपासून फेरमतदान घेण्यात येत आहे. दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील मगराहट पश्चिम विधानसभा मतदारसंघात ११ आणि डायमंड हार्बर विधानसभा मतदारसंघात चार मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया सुरु होती. मतदान शांततापूर्ण आणि निष्पक्ष वातावरणात पार पडावे, यासाठी निवडणूक आयोगाने कडक सुरक्षा उपाययोजना लागू केल्या आहेत. दक्षिण २४ परगणा येथील एका दिव्यांग महिला मतदाराला मतदान करता आले नाही, कारण तिची काळजी घेणाऱ्या तिच्या आईला मतदान केंद्रात प्रवेश नाकारण्यात आला होता. मतदान केंद्रावरील एका व्यक्तीने सांगितले, तिच्या कुटुंबातील कोणालाही मतदान केंद्रात प्रवेश दिला नाही. मी आत गेलो तेव्हा अधिकाऱ्याने सांगितले की हे चालणार नाही, आणि एक दिव्यांग व्यक्ती मतदान कसे करणार असे विचारले असता, त्यांनी सांगितले की त्यांचे मत स्वीकारले जाणार नाही.



फेरमतदानाच्यावेळी गडबड होऊ नये म्हणून तैनात करण्यात आलेले अर्धसैनिक दलाचे जवान

### मतदारांना धमकी, महिलांचा छळ

दक्षिण २४ परगणा येथील हासिम नगरच्या रहिवाशांनी टीएमसी कार्यकर्त्यांवर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले, शुक्रवारी रात्रीच टीएमसीचे गुंड आमच्या गावात घुसले, त्यांनी महिलांचा छळ केला आणि लोकांना मारहाण केली. टीएमसी नेते जहांगीर खानने आम्हाला धमकी दिली की, सत्तेत आल्यास ते महिलांवर बलात्कार करतील आणि आम्हाला ठार मारतील. त्यामुळेच लोक दमदम रस्त्यावर उतरली. हे आंदोलन रात्री उशीरापर्यंत सुरु होते. दरम्यान, प्रशासनाने आंदोलकांची समजून घालत आरोपींवर शनिवारी सका १० वाजेपर्यंत कारवाई करण्याचे आश्वासन दिले. परंतु, कोणतीही कारवाई न झाल्यामुळे आरोपींच्या अटकेसाठी शनिवारी सकाळी गावकरी पुन्हा रस्त्यावर उतरले असता पोलिसांनी त्यांच्यावर लाठीचार्ज केला, असा आरोपही मतदारांनी केला.

### तीन आरोपींना अटक

दक्षिण २४ परगणा येथील फेरमतदानादरम्यान झालेल्या संघर्षाप्रकरणी पोलिसांनी तीन जणांना अटक केली. येथे फेरमतदानादरम्यान भाजप आणि टीएमसी समर्थकांमध्ये झडप झाली. मतदारांना मतदान करण्यापासून रोखले जात होते, असा आरोप भाजपा समर्थकांनी केला. (वृत्तसंस्था)

# सात वर्षांत हृदयविकाराच्या रुग्णांची संख्या तिप्पट

## देशात आठपैकी एक जण असतो आजारी ● १५ ते २९ वयोगटातील लोकांनाही धोका

**नवी दिल्ली, २ मे**

देशातील प्रत्येक आठ पैकी एक व्यक्ती आजारी आहे, म्हणजेच १०० पैकी १३ लोक कोणत्या ना कोणत्या आजाराने ग्रस्त आहेत. यामध्ये लहान मुले आणि वृद्धांना सर्वाधिक त्रास होत आहे.

जीवनशैलीशी संबंधित आजारांमध्ये पूर्वीपेक्षा जास्त वाढ झाली असून, त्याचा परिणाम देशाच्या जवळपास निम्म्या लोकसंख्येवर होत आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या घरगुती सामाजिक उपभोग आरोग्य अहवालानुसार, देशात संसर्गजन्य आजार कमी झाले आहेत, परंतु हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि मधुमेह यांसारख्या आजारांमध्ये वाढ झाली आहे. मागील सात वर्षांत देशात हृदयरोगाने ग्रस्त असलेल्या लोकांची संख्या जवळपास तिप्पट झाली आहे. आता १५ ते २९ वयोगटातील तरुणांनाही हृदयरोगाचा त्रास होत आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाचा हा अहवाल जानेवारी-डिसेंबर २०२५ या आरोग्य सर्वेक्षणाच्या ८० व्या फेरीवर आधारित आहे. यातून देशातील आजार, उपचार पद्धती आणि आरोग्य खर्चाचे चित्र समोर येते. अहवालानुसार, मागील १५ दिवसांत देशातील अंदाजे १३.१ टक्के लोक आजारी पडले. प्रति एक लाख लोकसंख्येमागे एकूण १५,२१७ आजारांची नोंद झाली. यावरून अनेक लोकांना एकापेक्षा जास्त आरोग्य समस्या होत्या, असे दिसून येते . महिलांमध्ये हा आकडा १७,००६ होता, जो पुरुषांमधील १३,५०४ पेक्षा जास्त होता.



अहवालानुसार, ग्रामीण भागांपेक्षा शहरी भागांमध्ये आजारांचे प्रमाण जास्त आहे. शहरांमध्ये अंदाजे १४.९ टक्के लोक आजारी पडले, तर ग्रामीण भागांमध्ये हा आकडा अंदाजे १२.२ टक्के होता. महिलांमध्ये आजारांचे प्रमाण १४.४ टक्के होते, तर पुरुषांमध्ये ते ११.८ टक्के होते. हृदयाशी संबंधित प्रकरणे प्रति एक लाख लोकसंख्येमागे ३,८९१ पर्यंत वाढली असून, एकूण आजारांपैकी २५.६ टक्के आजार हृदयविकाराचे आहेत. अहवालानुसार, ०-१४ वर्षे वयोगटातील मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये संसर्ग आणि श्वसनसंस्थेच्या समस्यांचा आजारांमध्ये सर्वात मोठा वाटा आहे. यामध्ये ताप, खोकला आणि घशाच्या संसर्गाचा समावेश आहे. १५ ते २९ वयोगटातील तरुणांमध्ये संसर्ग ही एक मोठी चिंतेची बाब आहे.

तथापि, या वयोगटात मानसिक आणि पोटाशी संबंधित समस्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. या वयोगटातील लोकांमध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या समस्याही दिसून आल्या आहेत. (वृत्तसंस्था)

### वृद्धांना आजारी पडण्याची शक्यता जास्त

वयानुसार, ६० आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांना आजारी पडण्याची शक्यता जास्त असते. या वयोगटातील अंदाजे ४२ ते ४५ टक्के लोकांनी आपण आजारी असल्याचे सांगितले. यानंतर ४५ ते ५९ वयोगटातील लोकांचा क्रमांक लागतो. यात अंदाजे २० ते २५ टक्के लोक आजारी आहेत. १५ ते २९ वयोगटातील तरुणांना आजारी पडण्याची शक्यता सर्वात कमी आहे. त्यांच्यात हे प्रमाण चार ते पाच टक्के आहे. ० ते ४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी हा आकडा अंदाजे ९ ते १० टक्के आहे.

### शस्त्रास्त्रांची तस्करी करणारी टोळी उघडकीस

**चंदीगढ** : पंजाब पोलिसांनी गुरुवारी दोन जणांना अटक करून आणि ४.१०८ किलो हेरॉईन जप्त करून, सीमेपार चालणाऱ्या मादकपदार्थ आणि शस्त्र तस्करीच्या एका टोळीचा पर्दाफाश केला. अमृतसर पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून चार अत्याधुनिक पिस्तूल आणि पाच जिवंत काडतुसेही जप्त केली, अशी माहिती पोलिस महासंचालक गौरव यादव यांनी दिली. आरोपी समाज माध्यमातून पाकिस्तानस्थित तस्करांच्या संपर्कात होते आणि पंजाबमध्ये पुढील वितरणासाठी अमली पदार्थ व शस्त्रांचे साठे मिळवत होते, असे प्राथमिक तपासात आढळून आल्याचे यादव यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हटले आहे. अमृतसरमधील कँटोन्मेंट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे त्यांनी सांगितले. या नेटवर्कचे पुढील आणि मागील दुवे प्रस्थापित करण्यासाठी आणि त्यात सामील असलेल्या इतर साथीदारांना ओळखण्यासाठी पुढील तपास सुरू आहे, असे यादव म्हणाले.

रोखठोक

दिनेश गुणे

# ती वेळ आली आहे

गेल्या मार्च महिन्याच्या ८ तारखेस आणि जगभर महिला दिन साजरा केला गेला. सर्वत्र स्त्रीवंदना स्तोत्रे दुमदुमली. महिलांच्या संरक्षणासाठी, सबलीकरणासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही देणारी भाषणे झालीत , समाजमाध्यमांवर महिला सबलीकरणाच्या शपथादेखील घेतल्या गेल्या... वर्षानुवर्षे महिला दिनी हेच घडत आले आहे. त्यामुळे, गेल्या मार्चमध्ये साजऱ्या झालेल्या महिला दिनाचे चित्र यापेक्षा वेगळे असणारच नव्हते. त्यामुळेच, महिलांच्या सबलीकरणाचे आणि सामाजिक सन्मानाचे नवेजुने नारे आठवणे साहजिकच होते. तब्बल १३ वर्षांपूर्वी, २०१३ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्रसंघाने एक घोषणा दिली होती. 'बस्स झाले. आता सहन करण्याचे दिवस संपले, महिलांवरील अत्याचारांविरुद्ध ठोस कृतीची वेळ आली आहे!' ... त्यानंतर एक तप उलटून गेले. कृतीची वेळ आली म्हणजे नेमके काय झाले आणि त्या वेळी कोणती कृती केली गेली, असे प्रश्न मात्र अजूनही पिंगा घालतच आहेत. अत्याचार, मानवी तस्करी, बालविवाह, कुपोषण अशा समस्या आजही महिलांच्या सहनशीलतेची कसोटी पाहत आहेत आणि त्या कृतीच्या प्रतिज्ञेला वाकुल्या दाखवत अत्याचारांचा भीषणपणा नवी विक्राळ रूपे घेऊन थयथयाट करत आहे. वारंवार दिल्या जाणाऱ्या त्याच त्याच घोषणांची धारदेखील कमी होऊन त्या बोथट झाल्या आहेत. केवळ कायदे करून आणि कारवाईचा धाक दाखवून अत्याचाराची सामाजिक मानसिकता संपविता येणे शक्य आहे का, असे अनेक प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

महिलांच्या सहनशीलतेला, दुर्बलतेला वेठीस धरणारी ही मानसिकता नेमकी काय आहे?... कशामुळे माणुसकीचादेखील विसर पडतो?... आणि अशा प्रसंगी समाज म्हणून माणसांची काही कर्तव्ये असतील, तर त्याचा विसर पडून नेभळटपणाच का समोर येतो?... स्त्री ही अबला आहे, ही शतकानुशतके रुजविली गेलेली मानसिकता हे पुरुषप्रधान संस्कृतीतील महिला अत्याचारामागील कारण असावे असे सांगितले जाते. मग 'महिलांचे सबलीकरण' नावाच्या सरकारी आणि सामाजिक प्रयोगांचे नेमके फलित काय? महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी, स्वयंपूर्ण होण्यासाठी भक्कम आधार देणे असा एक विचार अनेकदा सबलीकरणाच्या समर्थकांकडून मांडला जातो. स्वबळावर उभे राहण्यासाठी आधार देणे ही कल्पनाच विसंगत आहे. सबलीकरणाचे प्रयोग काही मर्यादित अर्थाने कदाचित यशस्वी ठरलेदेखील असतील, पण स्त्री-पुरुष भेदांची दरी पुसून टाकण्यात हा सबलीकरणाचा सरकारी किंवा सामाजिक प्रयोग यशस्वी ठरला आहे का, याचा आढावा घ्यायला हवा. कारण, गेल्या काही महिन्यांत आपल्या आसपास घडलेल्या काही घटनांमुळे समाज अस्वस्थ आहे. महिलांच्या सुरक्षिततेची काळजी अधिक वाढली आहे आणि संरक्षण देण्यात कुठेतरी कमी पडत असल्याची खंतदेखील व्यक्त होत आहे.

गेल्या काही वर्षांत स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण भयावह वाढले. जगभरात महिलांवरील अत्याचाराच्या घटनांपैकी एक तृतीयांश, म्हणजे सुमारे ३५ टक्के घटना भारतात होतात, असा एका जुन्याच जागतिक पाहणीचा निष्कर्ष आहे. राष्ट्रीय गुन्हे शोध विभागाच्या एका सर्वेक्षणानुसार, भारतात दर तीन मिनिटाला एका मुलीची छेडछाड होते, तर दर दिवशी सरासरी ८६ महिला बलात्काराच्या शिकार होतात. २०२२ च्या आकडेवारीनुसार, त्या वर्षी महिलांवरील अत्याचाराचे सुमारे साडेचार लाख गुन्हे नोंदविले गेले. म्हणजे, दर तासाला ५१ तक्रारी दाखल झाल्या. हे प्रमाण अगोदरच्या काही वर्षांच्या तुलनेत सुमारे १२ टक्क्यांनी वाढले होते. लैंगिक छळाची तर हजारो प्रकरणे नोंदविली जातात. बलात्कार, अत्याचार, लैंगिक छळाची बातमी नाही, असा एक दिवसही जात नाही. तरीही अनेक बातम्या समाजापर्यंत पोहोचतही नाहीत. त्या तशाच दडपल्या जातात आणि त्या अत्याचाराने उद्ध्वस्त झालेली स्त्री-मुलगी, पुढे आयुष्यभर कुढत, अबला होऊनच दिवस ढकलत राहते. स्त्रीच्या जन्माआधीच तिच्यावरील अत्याचार सुरू होतात, असे म्हटले जाते. स्त्री भ्रूणाची हत्या हा त्याचा ढळढळीत दाखला! काही बुरसट समजुतीतून मुलगी 'नकोशी' होऊ लागली. मुलीचा जन्म नाकारण्याच्या मानसिकतेमागे नवनवी कारणे जन्माला येऊ लागली आहेत. केवळ भित्तिपत्रके, लिखित साहित्य, भिंतीवरल्या घोषणा आणि कोट्यवधी रुपये खर्चून वर्षानुवर्षे केली जाणारी जाहिरातबाजीदेखील ही मानसिकता बदलण्यात फारशी प्रभावी ठरलेली नाही. ही नवी कारणे रोखली नाहीत, तर मुलीचा जन्म हा कुटुंबाचा आनंदसोहळा राहणार नाही...

सुमारे दहा वर्षांपूर्वी, राजस्थानात बालविवाह रोखण्यासाठी सुरू असलेल्या एका सरकारी मोहिमेतील एका कार्यकर्तीला एका स्थानिक कुटुंबात होऊ घातलेल्या एका बालविवाहाची कुणकुण लागली आणि तिने त्याची तक्रार दिली. बालविवाह रोखला गेला, पण या कुटुंबातील पुरुषांनी भर दिवसा, त्या कार्यकर्तीच्या नवऱ्याला शेतात झाडाला बांधून त्याच्यादेखत या कार्यकर्तीवर बलात्कार केला. बलात्काराचे पुरावे नष्ट होण्याआधीच पावले उचलावीत, म्हणून त्या हिंमतवान महिलेने प्रयत्न सुरू केले पण तिला न्याय मिळाला नाही. तिच्यासाठी दोन हजार महिलांनी कलेक्टर कार्यालयासमोर धरणे धरले, तरीही तिची उपेक्षा थांबलीच नाही. विशाखा नावाच्या एका गटाने एक खटला दाखल केला. त्याचा परिणाम म्हणून प्रिव्हेन्शन ऑफ सेक्शुअल हॅरॅसमेंट ॲट वर्कप्लेस हा कायदा निर्माण झाला. कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचारास बळी पडणाऱ्या महिलांना कायद्याचे संरक्षण मिळाले.

पण लैंगिक अत्याचाराच्या घटना थांबल्या नाहीतच. अजूनही कामाच्या ठिकाणी महिला लैंगिक शोषणाची शिकार होतातच, कारण, सगळ्याच महिलांना अन्यायाविरोधात उठविण्याएवढा आवाज प्राप्त झालेलाच नाही. अलिकडच्या नाशिकमधील एका जागतिक दर्जाच्या कंपनीतील प्रकरणातून



हे स्पष्ट झाले. आत्मविश्वासाचा अभाव हे त्याचे कारण असेल, तर हा आत्मविश्वास केवळ भाषणबाजीतून किंवा सरकारी उपाययोजनांतून येणार नाही. ज्या ठिकाणी स्त्री जन्माला येते, लहानाची मोठी होते, तेथे तिला मिळणारी वागणूक तिचे व्यक्तिमत्त्व घडविणारी असली पाहिजे. प्रत्यक्षात मात्र, लहान मुलींवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांपैकी अधिक घटनांमध्ये घरच्या, विश्वासातल्या किंवा नातेवाईक असलेल्या पुरुषांचाच सहभाग असतो, हे वारंवार स्पष्ट झाले आहे.

दिल्लीतील निर्भया प्रकरणानंतर बलात्काऱ्यांना कठोर शिक्षा करण्याच्या घोषणा झाल्या, कायद्यालाही धार काढण्याचे उपाय आखले गेले, पीडितांच्या साह्यासाठी निधीची तरतूद केली गेली आणि आता बलात्काराचे धाडसच कुणाला होणार नाही असा डांगोराही पिटला गेला. प्रत्यक्षात मात्र, बलात्कारासारख्या विकृतींचे प्रमाण कमी झालेले नाही. सहज इंटरनेटच्या 'सर्च इंजिन'वर 'बलात्कार' हा शब्द टाईप केला, तर मिनिटागणिक नवी बातमी येऊन आदळताना दिसतेच, पण अमानुषपणाचे असंख्य नमुने हिडीसपणे प्रत्येक बातमीतून समोर येतात. तेव्हाच्या अहमदनगर जिल्ह्यातील कोपर्डी बलात्कार प्रकरणाच्या महाराष्ट्राच्या मनावरील जखमा अजूनही ओल्या आहेत. त्या प्रकरणामुळे उभा देश हादरला, जिल्हा संतापाने धगधगू लागला. सामाजिक असंतोषामुळे कायदा-सुव्यवस्था स्थितीचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत असतानाच, नांदगावला बलात्काराची दुसरी घटना घडली, तर आणखी एका घटनेत, बलात्काराचा प्रयत्न करणाऱ्या नराधमांना व पोलिसांनाच कोंडून ठेवून मारहाण करत ग्रामस्थांनीच कायदा हातात घेतला. एकाच परिसरात एकापाठोपाठ एक घडणाऱ्या अशा घटनांत वासनेची विकृती तर आहेच, पण या घटनांना सामाजिक कारणांचाही कंगोरा असावा, अशी कुजबूज सुरू झाली आणि अशा घटनांचा कायद्यापलीकडच्या अंगाने विचार करण्याची गरज अधोरेखित झाली. त्यालाही आता बराच काळ लोटला आहे.

समाजमाध्यमांवर 'गुडिया' नावाचा एक लघुपट काही वर्षांपूर्वी कमालीचा गाजला होता. रक्त उसळेल, मन थिजून जाईल आणि माणुसकीला शरमेने मान खाली घालावी लागेल अशा विषयावरील हा लघुपट म्हणजे सडलेल्या समाजव्यवस्थेचे व सरकारी यंत्रणांच्या त्रयस्थ मानसिकतेचे विदारक वर्णन आहे. देहविक्रयासाठी वाराणसीसारख्या 'तीर्थक्षेत्री' होणाऱ्या लहान मुलींच्या अपहरण आणि खरेदी-विक्रीच्या अमानवी प्रकारांवर विदारकपणे प्रकाश टाकणाऱ्या या लघुपटातील पात्रे काल्पनिक नाहीत. त्यांच्या स्वानुभवाच्या कहाण्या हृदय पिळवटून टाकणाऱ्या आहेत. आपल्या आईचे बोट धरून सकाळच्या वेळी नैसर्गिक विधीसाठी शेतात गेलेल्या एका बालिकेचे ओळखीच्याच तरुणांनी पिस्तुलाचा धाक दाखवून केलेले अपहरण आणि त्यानंतर सुरू झालेली त्या मुलीची परवड, सातत्याने केले जाणारे बलात्कार, शारीरीक वेदना आणि देहाची विटंबना तिच्या तोंडून ऐकताना, ती मुलगी म्हणजे मन मेलेले एक शरीर आहे, हे सतत जाणवत राहते. ही कहाणी एका खेड्यातून सुरू होऊन मुंबईमार्गे वाराणसीपर्यंत पोहोचते... या अमानवी धंद्यात कुटुंबे कशी उद्ध्वस्त होतात, आईबापांनाही गप्प बसणे का भाग पडते, गरिबीमुळे माणसे कशी हतबल होतात, याचे लाज वाटायला लावणारे वास्तव वर्णन या लघुपटातून समोर येते, तेव्हा या समाजात आपणही आहोत, याची चीड आल्यावाचून राहत नाही. वाराणसीत एका दहा वर्षाच्या मुलीचा खुलेआम सुरू असलेला लिलाव, हा या लघुपटातील एक प्रसंग तर, माणुसकीला काळे फासून विक्राळपणे समाजाला चिडवत राहतो... लहान वयातच मुलींना वेश्याव्यवसायात खुलेआम आणण्याचा धंदा चालतो, पळवून वा विकत आणल्यानंतर वेश्याव्यवसायाच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत त्यांच्यावर सामूहिक बलात्कार केले जातात आणि त्यांची मने मारून टाकण्याचा एक पद्धतशीर प्रयत्न केला जातो. लहान मुलीच नव्हे, तर नवजात बालिकांना थेट इस्पितळांमधून पळवून आणून याच वातावरणात वाढविण्याचा व 'योग्य वेळी' त्यांना धंद्यात ढकलण्याचा संघटित उद्योगही अस्तित्वात असल्याचा दावा या लघुपटात केला गेला आहे. मुलींनी लवकर वयात यावे, यासाठी त्यांना मादक पदार्थ दिले जातात, हॉर्मोनवाढीची इंजेक्शन्स आणि औषधे बळजबरीने पाजली जातात, असेही या लघुपटातील कार्यकर्ती सांगते. प्रतिष्ठित म्हणून वावरणारी माणसे काही प्रश्नांना उत्तरे देताना हात बांधून मान खाली घालून उभी राहिल्याचे एका प्रसंगात दिसते. बहुधा संपूर्ण समाजाचे ते प्रातिनिधिक चित्र असावे...

महिला, मुलींचे बेपत्ता होणे, बळजबरीने लैंगिक अत्याचार करून धर्मांतरास प्रेरित करणे, बलात्कार करून त्याचे चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित करण्याच्या धमक्या देत मुलींच्या असहायतेचा गैरफायदा घेणे आणि फसवणूक करून बळजबरीने विवाह केल्यानंतर मुलीचा खून करून मृतदेहाचे तुकडे फ्रीजमध्ये लपविणे अशा पाशवी मानसिकतेच्या बातम्या कोणतेही सामान्य मन सुन्न करणाऱ्या आहेत. काही वर्षांपूर्वी बिहारच्या सिवान जिल्ह्यात बलात्काराचा प्रतिकार केला म्हणून एका महिलेला रॉकेल ओतून जिवंत जाळण्यात आले, तर हाजीपूरमध्ये दहा वर्षाच्या एका बालिकेवर वरातीसाठी सजविलेल्या मोटारीतच बलात्कार करण्यात आला. उत्तर प्रदेशात बहराईचमध्ये सात वर्षांच्या बालिकेवर तिच्या २४ वर्षांच्या चुलत भावाने बलात्कार केला. पूर्व चंपारण जिल्ह्यात, मैत्रिणीसोबत बागेत खेळणाऱ्या दहा वर्षांच्या बालिकेवर चाकूच्या धाकाने सामूहिक बलात्कार करण्यात आला. मुलगा हवा अशी कामना बाळगणाऱ्या सुमारे १०० महिलांना कृपेचे आमिष दाखवून बलात्कार केल्याच्या आरोपाखाली तुरुंगात असलेल्या कुणा परमानंद आश्रमात तर डॉक्टरांच्या देखरेखीखाली स्त्री भ्रूणहत्येचा कारखानाच सुरू असल्याचे उघडकीस आले. नाशिक जिल्ह्यातील खरात नावाच्या भोंदूच्या कारवाया उघड होऊ लागल्यामुळे जुन्या घटनांचा हा संपूर्ण पट पुन्हा उलगडणे अपरिहार्य ठरले असून काळ पुढे सरकत असला तरी महिलांच्या सुरक्षिततेबाबत आपण कोठे आहोत, हे प्रश्नचिन्ह मात्र आहे तेथेच आहे.

एकापाठोपाठ एक घडणाऱ्या अशा घटनांमुळे, मुलीचा जन्म म्हणजे असुरक्षिततेला आमंत्रण असा समज समाजात फैलावू लागला, तर त्याचे खापर कोणावर फोडायचे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. बालविवाह रोखण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलली. आठ-दहा दिवसांपूर्वी, अक्षय्य तृतीयेच्या दिवशी, राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी समाजमाध्यमांवरून बालविवाह प्रथेच्या विरोधात सरकारच्या निर्धाराचा पुनरुच्चार केला, पण त्या वेळीदेखील त्यांनी केलेला एक गौप्यस्फोट समाजाला अस्वस्थ करणारा आहे. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर राज्यात बालविवाह होत असल्याची माहिती त्यांनी दिली आणि बालविवाह रोखण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा असे आवाहन केले. त्यानंतर काही दिवसांतच, सोलापूर जिल्ह्यातील बालिका मातांच्या गर्भवती अवस्थेचे लाजिरवाणे चित्र स्पष्ट झाले होते. लहान वयातच त्यांच्यावर मातृत्व लादले गेले आणि ती बाब उघडकीस येऊनही कोणीच त्याविरोधात तोंडदेखील उघडले नाही, ही बाब त्याहूनही लाजिरवाणी ठरते. अमरावतीजवळील एका गावातील लैंगिक अत्याचाराचे प्रकरणही पाठोपाठ उघडकीस आले आणि मुलांच्या सुरक्षिततेच्या मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला. अशा असुरक्षिततेमुळेच मुलगी ही जन्मदात्यांपुढे जोखीम ठरू लागली आणि मुलगी वयात येण्यापूर्वी तिची जोखीम सुरक्षित हाती सोपविण्याच्या मानसिकतेतून बालविवाहासारखी प्रथा वाढीस लागली, असे सांगण्यात येते. मुलगी ही धनाची पेटी नव्हे, तर जोखीम वाटावी अशी भयावह स्थिती आसपास असतानाही, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अशा घोषणा दिल्या जात आहेत. या घोषणांचा आदर करण्यासाठी समाजाने काय केले पाहिजे, याचे उत्तर शोधण्याची वेळ आली आहे. मुळातच, मुलींच्या जन्माचे गुणोत्तर कमी होत असताना असुरक्षिततेच्या भावनेत भर घालणारे हे भयानक प्रकार थांबले नाहीत, तर स्त्री-पुरुष संख्येतील विषमतेची दरी आणखीनच रुंदावण्याची भीती आहे. कदाचित, स्त्री सबलीकरणाच्या मोहिमांकडे नव्या नजरेने पाहण्याची, नव्या आखणीची गरज आता निर्माण झाली आहे. ▮

dineshgune@gmail.com

---

रविवारची पत्रे

## लक्ष भोजन

आम्ही आठ भावंडं. पाच भाऊ, तीन बहिणी. वडील महसूल खात्यात. आई गृहिणी. फार शिकलेली नव्हती, पण वाचनाचा छंद होता. त्यामुळे ती सुसंस्कृत आणि चतुरस्र होती. स्वभाव अत्यंत शांत आणि आहे त्या परिस्थितीत संसार नेटका करण्याचं कौशल्य तिच्या ठिकाणी होतंच. वडिलांची नोकरी होती; त्या काळात पगार फारसा नव्हता. वडील एकटे कमावणारे. आर्थिक परिस्थिती बेताचीच. तशातच आमच्याकडे चुलत भाऊ-बहीण, मावसभाऊ असे नेहमीच कुणीतरी शिक्षणासाठी असायचे. आम्ही यवतमाळला राहत होतो. साधारण १९६८-६९ चा काळ असेल. त्यावेळी उमरखेड-पुसद येथे कॉलेज होते, पण परीक्षा केंद्र यवतमाळलाच असायचे. उन्हाळ्यात वडिलांच्या मित्रांची मुले-मुली आमच्याकडे हक्काने राहायला यायचे. घरासमोरच सरकारी दवाखाना होता. मग काय, ओळखीपैकी कुणीही आजारी पडले तरी त्यांना सरकारी दवाखान्यातच यावे लागत असे. त्यात आमचं घर जवळ त्यामुळे अडलीनडली बरीचशी मंडळी हक्काने आमच्याकडे यायची. चहा, गरम पाणी, उपमा, पोहे अशा बऱ्याचशा सेवा आमच्याकडून पुरविल्या जात असत. कधी कधी मोठे भाऊ थोडी कुरकुर करायचे, पण आमची आई म्हणजे 'शांतिब्रह्म.' भावांच्या कुरकुरीकडे दुर्लक्ष करून आणि तात्यांची (आम्ही वडिलांना तात्या म्हणायचो) काही तक्रार नाही म्हणून ती जमेल ते आणि जमेल तसं सगळं करायची. घर बरंच मोठं होतं. परीक्षेसाठी आलेली मुलं-मुली आमच्याकडे आपलंच घर समजून राहायचे. आपण कुणाच्या तरी अडचणीला कामी पडू शकतो हा आनंद आई-वडील दोघांनाही असायचा. बरं, दुसरी गोष्ट म्हणजे त्यांच्यासाठी वेगळं काही करावं लागत नसे. घरच्यासाठी जे जेवणं बनायचं म्हणजे वरण, भात, भाजी, भाकरी किंवा पोळी, खिचडी जे असेल ते. ते येणाऱ्यांनाही आवडायचं. हे असं अनेक वर्षे चालू होतं.

परंतु, एकदा एक असा प्रसंग घडला आणि आई बरीच अस्वस्थ झाली. आमच्यापैकी तीन भाऊ आणि एक बहीण मोठे असल्यामुळे थोडे समजदार होते. त्यांना कदाचित आईच्या अस्वस्थपणाचं कारण समजलंही असेल; पण आम्हा लहानांना ते त्यावेळी फार काही कळलं नाही. नंतर पुढे समज आल्यावर घडलेला प्रसंग म्हणून आईनेच तो सांगितला. प्रसंग असा होता, नेहमीप्रमाणे वडील कामानिमित्त परगावी गेले होते. घरात किराणा सामान महिन्याचे एकदाच आणले जायचे. कधीतरी त्यातील काही जिन्नस संपायचे. वडील स्वतः किंवा मोठ्या भावांच्या हाताने ते लगेच आणले जायचे. पण यावेळी आमच्याकडे परीक्षेसाठी आलेल्या दोन मुली, आम्ही घरचे सर्व जण म्हणजे १०-१२ जणांचा स्वयंपाक करायला हवा होता. डब्यात गव्हाचे पीठ थोडेच होते आणि तेल वगैरे बहुतेक संपलेलं असेल. आई वैतागणे स्वाभाविक होते. नकळत तिची चिडचिड झाली. मोठ्या भावाने काहीतरी सोय केली. सामान नेहमीच्या दुकानातून आणलं. स्वयंपाक झाला, जेवणेही झालीत. सगळे जण आपापल्या कामाला निघून गेले. संध्याकाळी वडील परत आले आणि आईचा बांध फुटला. 'शांतिब्रह्म' अस्वस्थ झालेलं पाहून तात्याही थोडे बेचैन झाले. त्यांनी काय झाले म्हणून आईला विचारले!. जरा नाराजीच्याच स्वरात आई म्हणाली, 'आता हे फार झाले, कंटाळा आला या सगळ्या गोष्टींचा. कष्टाने करा आणि...!' असे म्हणून आई थांबली. झाला प्रकार तात्यांच्या लक्षात आला. लगेच ते म्हणाले, 'हे बघा! (तात्या आईला नेहमीच अहो-जाहो म्हणायचे.) आपण सामान्य माणसे. आपण काही पिढीजात श्रीमंत वगैरे नाही किंवा आपल्याला कुणी काही आणून देणारं नाही आणि दिलं तरी ते आपण घेणार नाही. हे मला आणि तुम्हालाही चांगलेच माहीत आहे.'

'आता समजा आपल्याला लक्ष भोजन घालावे, अशी इच्छा झाली तर ते शक्य आहे का? नाही ना! त्यापेक्षा रोज एक-दोन व्यक्ती आपल्या व्यतिरिक्त आपल्या घरी जेवल्या तर केव्हातरी भगवंताच्या डायरीत आपल्या लक्ष भोजनाची नोंद होईल की नाही! आणि ते पुण्य आपल्यालाच नाही तर आपल्या पुढच्या पिढीलाही कामी पडेल, हे आपल्याला वेगळं सांगायला नकोच. तेव्हा आता जे चाललं आहे ते चांगलं आहे, असं समजून चालू द्यायचं!' त्यानंतर आईने कधीही कुरकुर केलेली आम्हाला आठवतं नाही.

**लता पाध्ये**/९४२२५३३७०५

●● ●●

## ३ मे : जगदीश खेबूडकर यांना आदरांजली

''फिरत्या चाकावरती देशी मातीला आकार, विठ्ठला, तू वेडा कुंभार...'' या ओळी ज्यांच्या लेखणीतून उतरल्या, ते थोर शब्दप्रभू म्हणजेच जगदीश खेबूडकर. मराठी चित्रपटसृष्टी आणि भावसंगीत विश्वावर तब्बल चार-पाच दशके अधिराज्य



गाजवणारे खेबूडकर आज आपल्यात नसले, तरी त्यांची गाणी आजही प्रत्येक मराठी घराघरात गुंजत आहेत. ३ मे रोजी त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त या महान साहित्यिकाच्या प्रवासाचा हा एक छोटासा प्रयत्न. १० मे १९३२ रोजी कोल्हापूरच्या पन्हाळा तालुक्यातील कळे या गावी जगदीश खेबूडकर यांचा जन्म झाला. त्यांचे वडील शिक्षक होते आणि घरातूनच त्यांना साहित्याचे बाळकडू मिळाले. कोल्हापूरच्या मातीत वाढल्यामुळे तिथली लोकसंस्कृती, लावणी आणि शब्दांची लय त्यांच्या रक्तात भिनली होती. शिक्षकी पेशात असतानाच त्यांनी कविता आणि गीते लिहिण्यास सुरुवात केली. गदिमांच्या प्रभाव असलेल्या त्या काळात खेबूडकरांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. जगदीश खेबूडकर यांचे लेखन अफाट होते. त्यांनी केवळ मनोरंजन म्हणून गाणी लिहिली नाहीत, तर ती संस्कृतीचा भाग बनली. त्यांनी ३२५ हून अधिक मराठी चित्रपटांसाठी गीते लिहिली. त्यांच्या नावावर ३५०० हून अधिक गाणी आणि कवितांची नोंद आहे. यामध्ये चित्रपटगीते, भावगीते, भक्तिगीते आणि लावण्यांचा समावेश आहे. त्यांनी नाटके, काही कथासंग्रह आणि पोवाड्यांचेही लेखन केले. खेबूडकरांच्या लेखणीत विलक्षण ताकद होती. त्यांनी शृंगारिक लावण्यांपासून ते आध्यात्मिक अभंगांपर्यंत सर्व काही लीलया हाताळले. अष्टविनायका तुझा महिमा, विठ्ठला तू वेडा कुंभार, विठूमाउली तू माउली, देहाची तिजोरी, यांसारखी गाणी आजही भक्तीचा ओलावा जपून आहेत. 'सांगत्ये ऐका'मधील लावण्या असोत किंवा पिंजरा चित्रपटातील दिसला गं बाई दिसला आणि छबीदार छबी, या लावण्यांनी मराठी चित्रपटसृष्टीला सुवर्णकाळ दाखवला. श्रावणात घननिळा बरसला हे गीत आजही पावसाळ्यातील प्रत्येकाच्या ओठावर असते. आकाशी झेप घेरे पाखरा, ऐरणीच्या देवा, बाई बाई मनमोराचा अशी अनेक गीते जी कालबाह्य होणे शक्यच नाही. साहित्यातील योगदानासाठी त्यांना अनेक मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने गदिमा पुरस्कार, व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, महाराष्ट्र राज्य पुरस्कार, अनेक वेळा उत्कृष्ट गीतकार म्हणून, साहित्य सम्राट पुरस्कार इत्यादी. जगदीश खेबूडकर यांनी मराठी भाषेला अशा काही रचना दिल्या ज्या काळाच्या पडद्याआड कधीच जाणार नाहीत. ३ मे २०११ रोजी शब्दांचा हा जादूगार काळाच्या पडद्याआड गेला.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

●● ●●

## राजकारणातील अनैतिकतेचा प्रवास कुठवर?

सध्या देशाच्या राजकारणात जे काही होते आहे ते बघून देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या करोडो स्वातंत्र्य सैनिकांचा आत्मा निश्चितच तळमळत असेल. सत्ता मिळवण्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे जनतेचा विश्वास संपादन करणे, सत्ताधारी पक्षापेक्षा आपल्याकडे देशहिताच्या कोणत्या योजना आहेत हे मतदारांना पटवून देणे, आपण सत्तेवर असतो तर देशाच्या सर्वांगीण विकासासाठी काय वेगळे केले असते हे जनतेला सांगणे, जनतेचा विश्वास संपादन करणे, देशहिताच्या मुद्द्यांवर सत्ताधारी पक्षाचे समर्थन करणे हे करण्याऐवजी विरोधी पक्षनेते २०१४ पासून नेमके याउलट करत आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदींवर कठोर शब्दांत टीका करणे, देशाची देशात आणि देशाबाहेर बदनामी करणे, जनादेशाचा अपमान करणे हेच सुरू आहे. पराभवाची कारणे शोधून त्यावर आत्मपरीक्षण करणे आदि प्रक्रिया तर विरोधी पक्षनेते विसरूनच गेले आहेत. मोदींची, भाजपची आणि रालोआची बदनामी केली तरच जनता आपल्याला सत्ता बहाल करेल असा अजब समज विरोधी पक्षांनी करून घेतला आहे. संवैधानिक संस्थांच्या प्रामाणिकपणावर संशय घेणे, त्यांच्या संवैधानिक कर्तव्यांची पूर्तता करण्यामध्ये अडथळे निर्माण करणे, हिंसाचार पसरवणे, संवैधानिक संस्थांना उघड आणि जाहीरपणे धमक्या देणे, न्यायालयांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे, सरकारविरोधात जनतेला भडकावणे, देशातील जेन झी ला उठाव करण्यास उद्युक्त करणे, देशभरात अराजकता, हिंसाचार पसरवण्यासाठी प्रयत्न करणे असे अनेक प्रकार विरोधी पक्ष करत आहेत. अशा प्रकारच्या कामांमुळे सरकारी पक्षाचाच फायदा होतो आहे आणि आपण हे करणे आत्मघातकीपणा आहे एवढीही समज नसल्यामुळे विरोधी पक्षांनी आपल्याही पक्षाचे अस्तित्व धोक्यात टाकले आहे. सत्ताप्राप्तीसाठी विरोधी पक्ष मोदीविरोध करता करता देशविरोधी होऊ लागले आहेत याचेही कोणाला भान राहिलेले नाही.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीत तर विरोधी पक्षांचे खरे आणि विद्रूप चित्र जनतेसमोर आले आहे. काँग्रेससारख्या देशातील सर्वांत जुन्या आणि सर्वांत जास्त काळ सत्ता भोगलेल्या पक्षाने तर पोरकटपणाची पराकाष्ठा केली आहे. एका राज्यात ज्या पक्षाबरोबर आघाडी आहे त्याच पक्षाला दुसऱ्या राज्यात विरोध करणाऱ्या काँग्रेसला राजकीय समज आहे यावर शुद्धीवर असलेला कोणीही माणूस विश्वास ठेवणार नाही. बापूंचे नाव घेऊन राजकारण करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी जनतेला सर्वकाळ गृहीत धरण्याची घोडचूक काँग्रेस करत आहे. जनता म्हणजे, मुकी बिचारी कुणीही हाका, आहे असाही काँग्रेसच्या नेत्यांचा समज झाला आहे. गांधी-नेहरू परिवाराच्या तथाकथित त्यागाचा जीवावर राजकारण करणे इतिहासजमा झाले आहे हे काँग्रेसच्या लक्षात येत नाही.

तात्पर्य काय तर राजकारणातील नैतिकता जपण्यासाठी विरोधी पक्ष गांभीर्याने प्रयत्न करत नाहीत आणि देशविरोध आणि मोदीविरोध यातील फरक समजून घेत नाहीत, तोपर्यंत जनताजनार्दनाचा विश्वास संपादन करणे ही अशक्य कोटीतील गोष्ट आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

## १०१ व्या दिवशी तरी मराठी बोलतील का?

परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयाला अखेर सरकारने शंभर दिवसांची मुदत दिली. आगामी शंभर दिवसांत जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सीचालकांना मराठी बोलता आली नाही तर त्यांचा परवाना रद्द करण्यात येईल असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. परप्रांतीय रिक्षा आणि टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी १०० दिवसांची मुदत दिल्यानंतर हा वाद तूर्त शांत झाला असला तरी प्रश्न पडतो की जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सीचालक अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकू शिकले नाहीत ते अवघ्या १०० दिवसांत मराठी शिकतील का? मराठी शिकण्याची या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सीचालकांची मानसिकता आहे का? आणि जर त्यांची मानसिकताच नसेल तर १०० दिवस काय १०० वर्षांची मुदत दिली तरी ते मराठी शिकणार नाहीत आणि जर ते १०० दिवसांत मराठी शिकले नाही तर १०१ व्या दिवशी सरकार त्यांचे परवाने खरोखरच रद्द करेल का? की त्यांच्या मुजोरीला बळी पडून पुन्हा मुदत वाढ देईल? सरकारने आता या मुजोर चालकांना आणखी मुदतवाढ देऊ नये. अनेक वर्षे महाराष्ट्रात राहूनही मराठी न शिकणाऱ्या या रिक्षा, टॅक्सीचालकांवर कारवाई व्हायलाच हवी. ▮

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

---

# पोषण ट्रॅकर कुपोषणासाठी डेटाचा वापर

दखल

प्रा. लिंडसे जॅक्स

आपले डॉक्टर आरोग्यविषयक माहिती इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदवून ठेवतात, ही गोष्ट आता आपल्यापैकी बऱ्याच जणांना सवयीची झाली आहे. काही काळानंतर आपल्या आरोग्याच्या या नोंदींचा मागोवा घेऊन, आपल्या आरोग्याला उद्भवू शकणाऱ्या धोक्यांची अगोदरच जाणीव करून देऊन त्यावर वेळीच कृती करण्यासाठी या माहितीची मदत होण्याची शक्यता दिवसेंदिवस वाढत आहे. केवळ माहिती संकलित करतात म्हणूनच नव्हे, तर या माहितीची वेळीच योग्य निर्णय घेण्यासाठी आणि आरोग्याची अधिक चांगल्या प्रकारे काळजी घेण्यास मदत होत असल्याने डिजिटल प्रणाली अतिशय उपयुक्त ठरत आहेत.



महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या वतीने २०२१ मध्ये पोषण ट्रॅकर हे ॲप सुरू केल्यापासून, पोषण सेवा वितरणाशी संबंधित डेटा अधिक कृतिशील बनवण्याचा प्रयत्न राहिला आहे. केवळ डिजिटायझेशनसाठीच नाही तर बालकांची वाढीची तसेच पोषणाशी संबंधित सेवांची नोंद ठेवून त्यांचा अधिक गांभीर्याने आणि सातत्याने आढावा घेतला जावा हा या ॲपचा उद्देश आहे.

वाढीबाबत नियमितपणे संकलित केलेल्या माहितीचे शेवटच्या टप्प्यात परिणामकारक निर्णयात रूपांतर करण्याची पोषण ट्रॅकरमध्ये क्षमता आहे. मासिक वाढीचे निरीक्षण - जर योग्यरीत्या त्याची मोजदाद केली गेली आणि त्यांची नियमित नोंद ठेवली गेली तर धोक्याची चिन्हे अगोदरच लक्षात येऊ शकतात. बालकांच्या वाढीत कशी प्रगती होत आहे, हे लक्षात घेऊन घरगुती शिधावाटपाच्या माध्यमातून पूरक आहार पुरवणे, काळजीवाहकांचे समुपदेशन आणि अतिप्रमाणात कुपोषित मुलांना आरोग्य केंद्रांमध्ये पाठविणे अशा उपायांची जोड देण्यासाठी केवळ एकाच गोष्टीची म्हणजे नियमितपणे ठेवल्या गेलेल्या इलेक्ट्रॉनिक नोंदीची मदत होऊ शकते. या दिशेने पुढे जाण्यासाठी आपल्याला आपले लक्ष डॅशबोर्डकडून निर्णय घेण्याकडे आणि मापे नोंदविण्याऐवजी योग्य काळजी कशी घेता येईल, याकडे वळविणे गरजेचे आहे. अंगभूत वैशिष्ट्ये, मुख्य गोष्टींची साधी यादी आणि सतर्कता यामुळे अंगणवाडी सेविकांना कृशता किंवा अत्याधिक कुपोषणाचा धोका असलेल्या मुलांच्या वाढीवर देखरेख ठेवण्यास मदत होऊ शकते. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आणि आरसीएच २.० पोर्टलवरील डेटाचे एकत्रीकरण केल्यास, समन्वित गृहभेटींद्वारे संबंधित मुलांच्या वाढीवर लक्ष ठेवण्याच्या कामाला बळ मिळू शकते.

सध्या संकलित केलेला वाढीचा डेटा नेमकी कुठून सुरुवात करावी याचा मार्ग दाखवण्याच्या दृष्टीने अत्यंत मोलाचा आहे. वाढीचे मापन करण्याच्या पद्धती आणि व्यवस्थेचा पाठिंबा आणखी कसा वाढेल यावर लक्ष केंद्रित करण्यासोबतच, तो वेळीच निर्णय घेण्यासाठी खात्रीशीरपणे सहायक ठरू शकतो. अचूक निर्णय ज्या मूलभूत गोष्टींवर अवलंबून असतात, अशा गोष्टी म्हणजे खात्रीशीरपणे घेतलेली मापे, योग्य तंत्र आणि कार्यक्षम उपकरणे. जर मुलाच्या उंचीत किंवा वजनात एका महिन्यातून दुसऱ्या महिन्यात आश्चर्यकारक किंवा मोठा बदल दिसत असेल, तर व्यवस्थेने त्याची तत्परतेने पडताळणी करणे किंवा पुन्हा मापे घेणे आवश्यक ठरते. ॲपमध्ये असलेले छोटे मायक्रो-व्हिडीओ, आरोग्य सेवा केंद्रांच्या ठिकाणचे वजनकाटे आणि उंची मोजण्याच्या पाट्यांच्या योग्य वापराला बळकटी देऊ शकतात. प्रत्येक अंगणवाडी केंद्रात कॅलिब्रेटेड आणि कार्यक्षम उपकरणे असतील, याची खबरदारी घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वाढीच्या निरीक्षणाच्या नोंदींच्या डेटाची उपयुक्तता वाढण्याच्या दृष्टीने या मूलभूत गोष्टी गरजेच्या आहेत.

डॅशबोर्ड्सऐवजी निर्णय घेण्याकडे लक्ष केंद्रित करण्यासाठी पोषण ट्रॅकर डेटाच्या विश्लेषणाची मदत होऊ शकते. सर्वप्रथम आपल्याला हे जाणून घेणे आवश्यक आहे की नेमक्या कोणत्या काळात म्हणजे बाळाच्या कोणत्या वयात, ते काही महिन्यांचे असताना किंवा वर्षाचे झाल्यावरच्या काळात त्याचे कुपोषण होण्याची जास्त शक्यता असते. ते जन्माच्या वेळीच कुपोषित असते का, की ज्या काळात मातांना केवळ स्तनपान देण्यासाठी प्रोत्साहित केले जाते, तो ० ते ३ महिने किंवा ३ ते ६ महिने यापैकी कोणता काळ महत्त्वाचा आहे? की, बाळाला जेव्हा पुरेसा, योग्य आणि सुरक्षित पूरक आहार देणे आवश्यक असते, तो ६ महिने ते १ वर्ष हा तो काळ असतो का?

पोषण ट्रॅकर डेटाच्या विश्लेषणातून, कुपोषणातून बरे होणाऱ्या मुलांबद्दल अधिक माहिती मिळण्यास मदत होऊ शकते. विशिष्ट जिल्ह्यांमधील मुलांच्या बरे होण्याची शक्यता अधिक असते का? खरीप पिकांच्या कापणीच्या काळात मुले बरी होण्याची शक्यता जास्त असते का? या प्रश्नांची उत्तरे त्यातून मिळू शकतात. त्याचप्रमाणे अशा विश्लेषणातून बालपणी वारंवार किंवा दीर्घकाळ कुपोषणाचा सामना करणाऱ्या मुलांबद्दल अधिक माहिती मिळू शकते. ही अशी मुले जन्मतःच कुपोषित होती आणि त्यानंतरही पूर्णपणे बरी होऊ शकलेली नाहीत? ही मुले ज्यांच्या घरांना नियमितपणे शिधावाटपाचा लाभ मिळत नाही, अशापैकी आहेत का? ही माहिती उपलब्ध झाल्यास, स्थानिक पातळीवर पोषण सेवा वितरणात सुधारणा करता येऊ शकेल.

डेटाची विश्वासार्हता वाढविणे फ्रंटलाईन कर्मचाऱ्यांचा कामाचा भार कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरेल. प्रणालीवरील विश्वास वाढत असल्यामुळे अंगणवाडी सेविका प्राथमिक नोंद म्हणून ॲपचा अधिकाधिक वापर करू लागल्या आहेत. तथापि, अनेक ठिकाणी असलेल्या कनेक्टिव्हिटीच्या मर्यादा किंवा अनुपालनाच्या अटींमुळे सुरक्षित मार्ग म्हणून अजूनही डिजिटल नोंदीसोबत कागदी वह्यांमध्येही लिखित स्वरूपात नोंदी ठेवल्या जातात. ऑफलाईन कार्यक्षमता मजबूत करणे, डेटाची विश्वसनीयता वाढविणे आणि डिजिटल-फर्स्ट कार्यपद्धतीत स्पष्टता आणणे अशासारख्या उपायांमुळे सेवेच्या ठिकाणी डेटा एंट्रीच्या रूपात होणारे संक्रमण अधिक वेगाने होण्यास आणि दोन दोनदा अहवाल देण्याची आवश्यकता कमी करण्यास मदत होऊ शकते. प्रणाली सुधारण्याच्या प्रक्रियेत फ्रंटलाईन कर्मचाऱ्यांना सहभागी करून घेतल्यास ॲप त्यांच्या कामात सहायक ठरेल, हे सुनिश्चित करण्यासही मदत होऊ शकते.

पोषण ट्रॅकर हे वेळीच आणि माहितीवर आधारित निर्णय घेण्यासाठीचे विश्वसनीय साधन आहे. संभाव्य धोके वेळीच ओळखणे, जलद पाठपुरावा करणे आणि पोषण सेवांमध्ये अधिक समन्वय साधणे, ही त्याची खरी ताकद आहे. शेवटच्या टप्प्यातील वास्तवासाठी तयार केलेला आणि डेटाची गुणवत्ता व वापरामध्ये सतत होणाऱ्या सुधारणांमुळे अधिक प्रभावी झालेले पोषण ट्रॅकर हे केवळ निरीक्षण करण्याचेच नाही तर पोषण सेवा वितरण अधिक प्रभावी करण्यासाठी सर्वार्थाने उपयुक्त साधन आहे. ▮

(लेखिका एडिनबर्ग विद्यापीठात 'जागतिक आरोग्य आणि पोषण' या विषयाच्या प्राध्यापक आहेत.)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### वखारिया विद्यालयात सेवानिवृत्तांना निरोप

**बार्शी, दि. २ मे-**

उपळे दुमाला येथील वखारिया विद्यालयातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिनी शुक्रवारी ज्येष्ठ शिक्षक शंकर शिंदे आणि सेवक नागनाथ वाघ यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, प्रमुख पाहुणे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक काकासाहेब बुरगुटे, माजी मुख्याध्यापक रावसाहेब देशमुख, सतीशकुमार बुरगुटे, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ, पालक यांचे उपस्थितीत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना संपूर्ण पोशाख, शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, सन्मान चिन्ह आणि पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी बोलताना काकासाहेब बुरगुटे यांनी शंकर शिंदे आणि वाघ यांचे विषयी गौरव उदगार काढले. विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी नागनाथ वाघ यांनी कामावर श्रद्धा ठेवून सेवा कार्य केले. आपल्या सेवापूर्ती सन्मान सोहळ्यात शंकर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी समृद्धी ठोंगे या विद्यार्थिनीने, डॉ. कुणाल शिंदे, राहुल पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी सेवानिवृत्त शंकर शिंदे, सेवक नागनाथ वाघ मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, प्रमुख पाहुणे काकासाहेब बुरगुटे, सतीशकुमार बुरगुटे यांचे हस्ते कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. डॉ. प्रशांत काशीद यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. आभार एन.एन. महाले यांनी मानले.



### शंकरलिंग महाविद्यालयाचा निकाल ९०.४७ टक्के

**वळसंग, दि. २ मे-**

वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९०.४७ टक्के लागला असून या परीक्षेत ४२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ६ विद्यार्थी प्रथम श्रेणी १३ विद्यार्थी द्वितीय श्रेणी आणि १९ विद्यार्थी तृतीय श्रेणीत असे ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कनिष्ठ महाविद्यालयात कुमारी अलिषा शफिक अमलीचुंगे हिने ७३ टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम क्रमांक, कुमारी प्राजक्ता दिलीप माने हिने ७१ टक्के टक्के गुण मिळवून प्रशालेत द्वितीय क्रमांक, तर कुमारी महेक फकीर अहमद बागवान हिने ७०.१७ टक्के टक्के गुण मिळवून प्रशालेत तृतीय क्रमांक मिळविले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक प्राध्यापक संतोष शिंदे, शरणय्या मसुती, प्रतिभा तांडुरे यांचे संस्था अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, संचालक विश्वनाथ थळंगे, रामेश्वर बिज्जरगी, शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, रमेश दुधगी मल्लिनाथ थळंगे, संजय दुधगी, चंद्रशेखर दसमाने, सिद्धाराम बागलकोटी, शंकर केशेट्टी, प्राचार्य वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके यांनी अभिनंदन केले.



### वेळापूर येथे रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींना निरोप

**वेळापूर, दि. २ मे-**

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संलग्नित रत्नाई कृषी महाविद्यालयांमध्ये बीएससी ॲग्री पदवीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. अभ्यासक्रमांतर्गत कृषी कार्यानुभव (रावे) २०२५-२६ अंतर्गत चा अभ्यासक्रम वेळापूर ता. माळशिरस येथे पार पडला. अभ्यासक्रमावेळी प्रगतशील शेतकरी महादेव ताटे यांनी कृषी कन्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या चार वर्षाचा अभ्यास पूर्ण झाल्यावर सदर कृषी कन्यांनी महादेव ताटे यांच्या निवासस्थानी भेट दिली असता ताटे कुटुंबीयांकडून कृषी कन्यांना निरोप दिला. भगवान बळीरामाची प्रतिमा, शाल, श्रीफळ देऊन कृषी कन्या आरती मंडले, योगेश्वरी मदने, मोहिनी कानडे, वैष्णवी हिवरकर, अनुपमा गोसावी, अनघा फरांदे, राजनंदनी डिकोळे, प्राजक्ता जाधव, सिद्धी पाटील यांचा सन्मान केला. यावेळी बोलताना आरती मंडले हिने वेळापूर येथे अभ्यासक्रम पूर्ण करत असताना सर्व कृषी कन्यांना महादेव ताटे, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, महादेव जाधव, पिसे, डेअरी चेअरमन माऊली जानकर, भाकरे, चंदू चंदनशिवे, रमेश बनकर आदींसह शेतकऱ्यांनी सहकार्य केल्याचे सांगितले.

### शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन

**सांगोला, दि. २ मे-**

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये महाराष्ट्र दिन साजरा झाला. संस्थेचे सचिव अंकुश गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण केले. यावेळी राष्ट्रगीत, ध्वजगीत व महाराष्ट्र गीताचे गायन झाले. अंकुश गायकवाड यांनी मनोगतात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच चांगले संस्कार, शिस्त व कर्तव्यनिष्ठा जोपासावी असे नमूद केले. संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष इंजि.महादेव गायकवाड यांनीही सर्वांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमास सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उळेगावात ५४ वर्षीय इसमाचा झोपेत गळ्यावर वार करून खून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

रस्त्याच्या कडेला सिमेंट कट्ट्यावर झोपलेल्या एका ५४ वर्षीय व्यक्तीचा गळ्यावर तीष्ण हत्याराने वार करून निर्घृण खून करण्यात आल्याची घटना दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळेगावात शुक्रवार एक मे रोजी पहाटे पाच वाजता उघडकीस आली .

संजय विठ्ठल शिंदे (वय ५४ वर्ष, रा. उळे ) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. संजय शिंदे हे नेहमीप्रमाणे गुरुवारी रात्री उळे गावातील शिवनेरी प्रतिष्ठानसमोरील रस्त्याच्या बाजूला दुकानासमोरील कट्ट्यावर झोपले असताना अज्ञात इसमाने त्यांचा झोपेत अज्ञात कारणावरून त्यांचा गळ्यावर वार करून खून केला. ही घटना एक मे रोजी शनिवारी



पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. गळ्याला जखमा झाल्याने संजय शिंदे हे रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे आढळून आले. सदर माहिती गावाच्या पोलीस पाटलाने तात्काळ सोलापूर तालुका पोलीस ठाण्याला कळविली असता पोलिस निरीक्षक देशपांडे, हवालदार शेख, एएसआय बानेवाले यांनी त्वरित घटनास्थळी पोहचून तेथील पंचनामा केला. आणि मयत संजय शिंदे यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी आठ वाजता दाखल केला. मयत संजय शिंदे यांच्या पश्चात आई, पत्नी आणि दोन मुले असा परिवार असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली.

**मारेकरी बारा तासात अटकेत, पोलीस कोठडीत रवानगी**

दरम्यान या खून प्रकरणी मयत संजय शिंदे यांचा मुलगा आकाश शिंदे यांच्या फिर्यादीवरून सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात येऊन मारेकरी आरोपी अतुल बब्रुवान शिंदे (वय २७, रा. उळे ) यास पोलिसांनी शुक्रवारी रात्री उशिरा अटक केली. आरोपीस शनिवारी दुपारी येथील न्यायालयात हजर करण्यात आले असता न्या. ऐश्वर्या जाधव यांनी आरोपीची पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम हे करीत आहेत .

**इथे का बसलास घरी निघून जा म्हटल्याने आरोपीने चाकूने गळ्यावर केला वार**

अटक केल्यावर चौकशीत आरोपीने पोलिसांना सांगितले की त्याचे हॉटेलमध्ये जेवण करत असताना मित्रांसोबत भांडण झाले होते. त्यानंतर तो गावात येऊन बसला होता. त्याच्याजवळ झोपलेला मयत संजय विठ्ठल शिंदे यांनी आरोपीला इथे का बसला आहेस , घरी निघून जा असे म्हणाल्याने दोघांमध्ये वादावादी सुरू झाले. यावेळी आरोपीने रागाच्या भरात चाकूने संजय शिंदे यांच्या गळ्यावर वार करून तेथून पळून गेला होता. पोलिसांनी गोपनीय बातमीदारांकडून माहिती काढून आरोपीला १२ तासाच्या आत अटक केलेली आहे.

## लोकविकास स्कूलचा बारावी परीक्षेत ८५.९१ टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २ मे-**

वेळापूर येथील लोकविकास शिक्षण प्रसारक संस्था संचलित लोकविकास इंग्लिश मिडीयम स्कूलचा बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल उल्लेखनीय लागला आहे. शाळेने ८५.९१ टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. परीक्षेसाठी एकूण १६८ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १४० विद्यार्थी उत्तीर्ण होऊन संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची प्रचिती दिली. विज्ञान शाखेत अथर्व बनकरने ९२.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. हर्षदा चव्हाणने ८२.३३ टक्के गुणांसह द्वितीय तर धनश्री शिंदेने ७९.८३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला.

वाणिज्य शाखेत मयुरी जाधवने ७९.00 टक्के गुणांसह प्रथम, रेखादेवी निशादने ६५.00 टक्के गुणांसह द्वितीय तर श्रावणी चौगुलेने ५४.१७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक जालिंदर बनकर, सचिव चंद्रकांत नवले, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य अमोल पांढरे, लोकविकास मराठी मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक सुनिल पताळे तसेच लोकविकास इंग्लिश मिडीयम स्कूलचे मुख्याध्यापक अजित बनकर यांनी अभिनंदन केले.

## मोहोळ -१३ मैल-वळसंग या ८१ किमी नव्या रस्त्यासाठी ७४० कोटींच्या निधीला मंजूरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

मोहोळ - १३ मैल - वळसंग या ८१ किमी नव्या रस्त्यासाठी ७४० कोटी रुपयांच्या निधीला मंजूरी मिळाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या माध्यमातून या रस्त्याला मंजुरी मिळाली आहे.

मोहोळ - १३ मैल - वळसंग या मार्गावर मालवाहतूक तसेच प्रवासी वाहतूक शेतकऱ्यांची अन्नधान्याची वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे. परिणामी या मार्गावर मोठ्या प्रमाणात अपघातही घडत आहेत. शेतकरी वर्गालाही या रस्त्यावरून शेतमालाची वाहतूक करणे जिकरीचे होत आहे. या मार्गावरून प्रवास करणाऱ्या शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचीही संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. वारंवार होणाऱ्या लहान मोठ्या अपघातांमुळे त्यांच्याही सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मोहोळ - १३ मैल - वळसंग या मार्गाच्या बांधणीकरिता निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली होती. लवकरच या कामाची प्रक्रिया सुरुवात होणार आहे.

**जिल्ह्याच्या विकासातील नवा अध्याय**



या नव्या रस्त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होणार असून शेतमालाची बाजारपेठेपर्यंतची वाहतूक जलद आणि कमी खर्चात होणार आहे. सोलापूर जिल्ह्यासह शेजारील प्रदेशांच्या व्यापार आणि उद्योगालाही या रस्त्यामुळे मोठी गती मिळणार आहे. हा रस्ता म्हणजे सोलापूर जिल्ह्याच्या विकासातील नवा अध्याय ठरणार आहे. सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचे सोलापूर जिल्हावासियांतर्फे आभार. **- सचिन कल्याणशेट्टी,** आमदार, अक्कलकोट

## सरकारी चालकांना न्याय कधी?

**सीईओंच्या वाहनावर खाजगी चालक कायम; जिल्हा परिषदेत असंतोष उसळला**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे -**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) यांच्या शासकीय वाहनावर अनेक वर्षांपासून खाजगी चालक कार्यरत असल्याचा मुद्दा आता राजकीय पातळीवर गाजू लागला आहे. प्रशासनातील पारदर्शकता आणि समान संधीच्या तत्त्वांना धक्का बसत असल्याची टीका होत असून, सरकारी वाहन चालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

जिल्हा परिषदेत तब्बल ३१ अधिकृत वाहन चालक उपलब्ध असतानाही त्यांना डावलून खाजगी चालकाला प्राधान्य दिले दिल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हमारा नंबर कब आयेगा ? असा संतप्त सवाल उपस्थित करत चालकांनी आपल्या हक्कासाठी आवाज उठवण्यास सुरुवात केली आहे. काहींनी वरिष्ठांच्या जवळीकतेचा फायदा घेत ही व्यवस्था कायम ठेवल्याचा आरोपही केला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातही यापूर्वी अशीच परिस्थिती होती. मात्र तेथील चालकांनी एकत्रितपणे भूमिका घेतल्यानंतर कलेक्टरांच्या वाहनावरील चालक बदलला. यामुळे जिल्हा परिषदेतही समान न्याय मिळावा, अशी मागणी जोर धरत आहे. मागील सीईओ दिलीप स्वामी, मनीषा आव्हाळे आणि कुलदीप जंगम यांच्या कार्यकाळातही खाजगी चालकच कार्यरत होता. सध्याच्या कार्यकाळातही तीच पद्धत कायम असल्याने प्रशासनाच्या निर्णयप्रक्रियेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित चालक हा कंत्राटी असून त्याची नियुक्ती इतर तालुक्यात असल्याचे समोर आले आहे.

वाढत्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर 'देशमुख' नावाच्या एका सरकारी चालकाची तात्पुरती नियुक्ती करण्यात आली असली, तरी तो बार्शीहून ये-जा करत असल्याने ही व्यवस्था व्यवहार्य नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे मुख्यालयात उपलब्ध असलेल्या चालकाला संधी देण्यात यावी, अशी ठाम मागणी पुढे येत आहे. शिस्तप्रिय व कडक प्रशासनासाठी ओळखले जाणारे सीईओ कुशल जैन या प्रकरणात कोणता निर्णय घेतात, याकडे केवळ चालक वर्गाचेच नव्हे तर स्थानिक राजकीय वर्तुळाचेही लक्ष लागले आहे. समान संधी, पारदर्शकता आणि प्रशासनातील न्याय या मुद्द्यांवर आता हा प्रश्न अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.




## सांगोला विद्यामंदिर कॉलेजचे बारावी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२ मे-**

बारावी परीक्षेत सांगोला विद्यामंदिर ज्युनिअर कॉलेज मधील कला, वाणिज्य, शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. यामध्ये कला शाखा ९३.५७, वाणिज्य शाखा ९९.१५, शास्त्र शाखा ९८.०१ व एकूण निकाल ९७.५० टक्के लागला आहे.

कला शाखेमध्ये हर्षदा गेजगे, आरती गोडसे ८३.६७, विशाखा सोनवणे ८३.१७, अस्मिता इंगोले ७९.८३, वाणिज्य शाखेमध्ये लक्ष्मी गोडसे ९०.३३, आर्या घोंगडे, वैष्णवी रणदिवे ९०, मृणाली लांडगे ८८.३३, शास्त्र शाखेमध्ये ऋचाश्री चव्हाण ८६.६७, स्वरदा वांगीकर ८६.५०, धीरज जगताप ८५ टक्के गुण मिळवत अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे सां.ता.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड. विजयसिंह चव्हाण, सचिव म.शं.घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, प्राचार्य बिभिषण माने, उपमुख्याध्यापक चारूदत्त जगताप, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, काकासो नरूटे, उत्तम सरगर यांनी अभिनंदन केले.

**गणित विषयात स्वरदा वांगीकर पुणे बोर्डात प्रथम**

गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत शास्त्र शाखेतील विद्यार्थिनी स्वरदा वांगीकर हिने पुणे बोर्डात प्रथम क्रमांक पटकाविला.

## सदोष मनुष्यवध व इतरांना जखमी केल्याच्या आरोपातून ट्रक ड्रायव्हरची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

आरोपी गिरीधर भाऊराव नरवडे, वय ५३ वर्षे, धंदा ड्रायव्हर, रा. उदगीर याने आपली ट्रक नं.MH११-५२६७ यामध्ये आषाढी वारीला जाणारे भाविकांना ट्रकमध्ये बसवून उदगीर मधून तारीख २/७/२०१० रोजी पंढरपूरकडे निघाले असता, पहाटे ५.१५ मि. वाजता मोहोळ जवळील जयशंकर हॉटेल, लांबोटी येथे फिर्यादी इमाम दस्तगीर पठाण यांनी त्याची मालट्रक MH१२-FC७०९१ ही ट्रक रोडवर घेत असताना आरोपीच्या ट्रकने फिर्यादीच्या ट्रकला उजव्या बाजूला धडक दिली. त्या धडकेमुळे आरोपीची ट्रक रस्त्याच्या उत्तर बाजूला जावून एका झाडास आदळून त्यामध्ये असलेले भाविक राम पांडुरंग गबाळे, विजयकुमार महादेव भंडारे व पार्वती नरसिंगराव कडेवार यांच्या मृत्युस कारणीभुत झाला व २८ लोकांना जखमी केले म्हणून फिर्यादी इमाम दस्तगीर पठाण ट्रक ड्रायव्हर याने फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार आरोपी विरुध्द खटला दाखल करण्यात आला?

या खटल्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश सोलापूर यांचेपुढे झाली. सरकार पक्षातर्फे फिर्यादी इमाम पठाण व इतर साक्षीदार यांच्या जबानी नोंदवण्यात आल्या. आरोपीने बचाव घेतला की, आरोपी त्याचा ट्रक घेऊन पंढरपूरला निघाला होता. फिर्यादीने त्याची ट्रक जयशंकर हॉटेलवरुन अचानकपणे रोडवर येऊन आरोपीच्या ट्रकला धडक दिली. त्यामुळे अपघात झाला. आरोपीच्या चुकीमुळे अपघात झाला नाही, तर फिर्यादी याच्या निष्काळजीपणामुळे अचानक रोडवर आल्याने अपघात झाला. मे. कोर्टांनी आरोपीचा बचाव विचारात घेतला. तसेच परिस्थितीजन्य पुरावा याचे अवलोकन केले. फिर्यादीच्या विसंगत जबाबामुळे त्याच्यावर विश्वास ठेवला नाही. सरकारपक्षाने संशयापलिकडे जावून आरोपीने गुन्हा केला हे शाबीत केलेले नाही म्हणून आरोपीची निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे, ॲड. राही पवार (खेडकर), ॲड. निलम वाडेकर यांनी काम पाहिले.

**CHANGE IN NAME**

I HERE BY DECLARE THAT MY OLD NAME IS **Varun Prafulkumar Sanklecha** HAS BEEN CHANGED TO **Varun Praful Sanklecha**

Resi. - 102/C/42, Bhavani Peth, Solapur

**KINDLY NOTE**

THE SAME.(1747Dtd.23.04.2026)

**अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट**
**पाणीपुरवठा विभाग**
**वार्षिक निविदा सूचना**

जा.क्र.२०२६/न.प.अ.कोट/पापु १२/संकलन-१/कावि ८४ — दिनांक: ३०/०४/२०२६

अक्कलकोट नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडील करावयाच्या एकूण सात वार्षिक कामांसाठी योग्य त्या वर्गवारीत नोंदणीकृत ठेकेदार / पुरवठादार / संस्था यांचेकडून द्वि लिफाफा पद्धतीने ऑफलाईन / ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागविणेत येत आहे. सदर निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आणि नगरपरिषदेच्या सूचना फलकावर पाहण्यास उपलब्ध आहेत. निविदेबाबत वेळोवेळी करण्यात येणारे बदल (शुद्धीपत्रक) अथवा मुदतवाढ सूचना शासनाच्या www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर आणि नगरपरिषदेच्या सूचना फलकावर पाहण्यास उपलब्ध राहतील. निविदा सादर करण्याची मुदत दि.०४/०५/२०२६ सकाळी १०:०० ते दि.१३/०५/२०२६ सायंकाळी ५:०० पर्यंत राहील.

स्वाक्षरीत/-
**(रमाकांत डाके)**
मुख्याधिकारी
अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

स्वाक्षरीत/-
**(देविदास कवटगी)**
सभापती
पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती

स्वाक्षरीत/-
**(मिलन कल्याणशेट्टी)**
नगराध्यक्ष
अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

**आदर्श कामधेनू संशोधन संस्था, सोलापूर**
मु. पो. वडकबाळ, होनमुर्गी, तालुका दक्षिण सोलापूर जि. सोलापूर - ४१३००४

**पदभरती**

सविनय विनंती की, आमची संस्था आदर्श कामधेनू संशोधन संस्था येथे खालील पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. संबंधित पदांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अनू | पद | पद संख्या | पात्रता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | प्रकल्प अधिकारी | १ | B. sc | ५ वर्षे |
| २ | पशुवैद्यकीय अधिकारी | १ | MVSc & AH | २ ते ३ वर्षे |
| ३ | पशुधन पर्यवेक्षक | १ | पशुधन/डिप्लोमा किंवा समतुल्य | २ ते ३ वर्षे |
| ४ | सुपरवायझर | १ | १२ वी पास | २ ते ३ वर्षे |
| ५ | सफाई कामगार | १ | ८ वी पास | - |
| ६ | कामगार/हेल्पर | १० | शारीरिक काम करण्याची तयारी | - |

संपर्क: ९६०४१४२३११, ७५८८७९६१४७/४८ E-mail-Id : contact. Aadarshkamdhenu@gmail.com या संस्थेच्या ईमेल आयडी वरती शैक्षणिक डॉक्युमेंट मेल करावा. जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून चार दिवस.

**सही/-**
**अध्यक्ष**
**आदर्श कामधेनू संशोधन संस्था**
**वडकबाळ, ता. द. सोलापूर. जि. सोलापूर**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

दि. कि. अर्ज नं. १५/२०२६
नि. नं. ७

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ञ ज्यु. डी. यांचे कोर्टात**

**मधुकर संदिपान सुरवसे** -- **अर्जदार**
**विरुद्ध**
**कोणीही नाही** -- **सामनेवाला**

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. १५/२०२६ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला असून अर्जदाराचे वडील संदिपान पांडूरंग सुरवसे हे दि. ०८/०२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच कै. संदिपान पांडूरंग सुरवसे यांचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे कै. संदिपान पांडूरंग सुरवसे यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ११/०४/२०२६ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हे जाहीर प्रसिद्धीकरण केले. ता. ०२/०५/२०२६

शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय,**
**अक्कलकोट**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :-**

डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर, शहर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील पेठ बुधवार पेठ येथील मिळकत यांसी नगर भूमापन क्र. ८९२७/अ/२/३३/३७ यामधील फायनल प्लॉट नं. ३४६ यापैकी सब प्लॉट नं. ३३ याचे एकूण क्षेत्र ५०५.00 चौ.मी. यांसी चतु:सिमा :-

पूर्वेस :- रस्ता — दक्षिणेस :- फायनल प्लॉट नं. ३४७
पश्चिमेस :- रस्ता — उत्तरेस :- रस्ता

येणे प्रमाणे प्लॉटजागा त्यातील सर्व तदंगभूत हक्कासह.

वर वर्णन केलेली प्लॉटजागा ही जयसिंग स्वामीराव चव्हाण यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून त्यांनी वर नमुद मिळकत ही आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरवून सदरची प्लॉटजागा ही निर्वेध व निजोखमी अशी आहे असा निर्वाळा त्यांनी दिलेला आहे व सदरची प्लॉटजागा ही आमचे अशिलांना खरेदी देण्याचे त्यांनी मान्य व कबूल केले आहे.

तथापि सदर प्लॉटजागेवर कोणाचा, गहाण, दान, लिज, बक्षीस, पोटगी, वहिवाट, कुलमुखत्यार अगर तत्सम कोणताही कसलाही इतर हक्क हितसंबंध असल्यास तो ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ (तीन) दिवसाचे आंत आमचे खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह हरकत नोंदवावी.

वरील मुदती नंतर कोणाचीही कोणतीही हरकत अथवा तक्रार आमचे अशिलांवर अथवा वर नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली. ता. ०२/०५/२०२६

**सही/-**
**ॲड. आर.व्ही. नारायणकर**
**प्लॉट नं. ३०१, किसान नगर,**
**अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००६**
**मो.नं. ८९७५८१८१८३**
**अशिलातर्फे ॲड.**




## महत्त्वाचे

### गोपाल गणेशे भारतीय मुष्टियुद्ध संघात

**अकोला :** १५ व १७ वर्ष वयोगटाखालील मुले व मुलींची आशियाई मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धा उझबेकिस्तान येथे होणार असून या प्रतिष्ठेच्या स्पर्धेसाठी भारतीय संघ जाहीर झाला. यामध्ये अकोलाच्या क्रीडा प्रबोधिनीचा मुष्टियोद्धा गोपाल रामेश्वर गणेशे याची राष्ट्रीय संघात निवड झाली आहे. १ मे ते १६ मे दरम्यान ताश्कंद, उझबेकिस्तान येथे होणाऱ्या या स्पर्धेत गोपाल सहभागी होणार आहे. या यशाबद्दल जिल्हाधिकारी वर्षा मीणा,जिल्हा क्रीडा अधिकारी सतीशचंद्र भट, क्रीडा सहाय्यक संचालक सुधीर मोरे,उपसंचालक अमरावती विभाग शेखर पाटील, क्रीडा आयुक्त शीतल तेली उगले, क्रीडापीठ उपसंचालक माणिक पाटील यांनी खेळाडूंचे कौतुक केले. स्पर्धेपूर्व भारतीय संघाचे विशेष प्रशिक्षण शिबिर पतियाळा येथे १५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत पार पडले. या शिबिरात खेळाडूंना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने तांत्रिक, शारीरिक व मानसिक तयारी करून घेण्यात आली. गोपालने या शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करत प्रशिक्षकांचे लक्ष वेधून घेतले.

### जोश इंग्लिस लखनौ सुपर संघात दाखल

**नवी दिल्ली :** सोमवारी वानखेडे स्टेडियमवर मुंबई इंडियन्सविरुद्ध होणाऱ्या आयपीएल २०२६ च्या महत्त्वपूर्ण सामन्यापूर्वी, ऑस्ट्रेलियन यष्टिरक्षक-फलंदाज जोश इंग्लिस संघात सहभागी झाल्यामुळे लखनऊ सुपर जायंट्सला ऐन वेळी मोठा दिलासा मिळाला आहे. ३१ वर्षीय जोश इंग्लिस आता भारतात दाखल झाला असून त्याने संघासोबत सराव करण्यास सुरुवात केली आहे. १८ एप्रिल रोजी पश्चिम ऑस्ट्रेलियामध्ये पार पडलेला त्याचा विवाह सोहळा अशा काही वैयक्तिक बांधिलकींमुळे तो हंगामातील काही सामन्यांना मुकणार आहे, असे इंग्लिसने यापूर्वीच फ्रॅन्चायझींना कळविले होते. त्यामुळे त्याच्या सहभागाबाबत काहीशी अनिश्चितता निर्माण झाली होती. सुरुवातीच्या शंका असूनही, पंजाब किंग्जने करारमुक्त केल्यानंतर लखनौ संघाने त्याला ८.६ कोटी रुपयांना करारबद्ध केले. पंजाब किंग्जकडून खेळताना त्याला यापेक्षा खूपच कमी मानधन मिळाले होते. त्याचे आगमन उशिरा झाल्यामुळे काही प्रश्न उपस्थित झाले होते; परंतु आता त्याचा संघात समावेश होणे लखनौसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

### माजी फॉर्म्युला वन चालक ॲलेक्स झनार्डी यांचे निधन

**नवी दिल्ली :** माजी फॉर्म्युला १ चालक आणि पॅरालिम्पिक विजेता ॲलेक्स झनार्डी



यांचे शनिवारी निधन झाले. ते ५९ वर्षांचे होते. माजी विजेत्याचे निधन अत्यंत शांतपणे, आपल्या कुटुंबाच्या आणि मित्रांच्या प्रेमाच्या सानिध्यात झाले, अशी माहिती झनार्डी यांच्या कुटुंबाने दिली. २००१ मध्ये एका भीषण अपघातात दोन्ही पाय गमावल्यानंतर, झनार्डी यांनी केलेल्या जबरदस्त पुनरागमनासाठी ते ओळखले जातात, या अपघातामुळे त्यांची रेसिंग कारकीर्द संपुष्टात आली होती. अपघातानंतर त्यांनी आपली कारकीर्द नव्याने घडविली आणि पॅरा सायकलिंग क्षेत्रात जागतिक आदर्श बनले. त्यांनी २०१२ आणि २०१६ च्या पॅरालिम्पिक स्पर्धांमध्ये इटलीचे प्रतिनिधित्व केले आणि चार सुवर्ण व दोन रौप्य पदके जिंकली. २०२० मध्ये इटलीमध्ये झालेल्या एका रस्ते अपघातात या रेसिंग दिग्गजाला गंभीर दुखापती झाल्या होत्या; उत्तर इटलीतील सिएना येथे ते आपली हँड बाईक चालवत असताना हा अपघात घडला होता.

### निवड चाचणी अपयशी ठरल्यामुळे महिला क्रिकेटपटूची आत्महत्या

**चेन्नई :** निवड चाचणीत अपयश आल्याने पुदुचेरी येथील १९ वर्षीय महिला क्रिकेटपटू एंजल गंगवाणी हिने बुधवारी २९ एप्रिल रोजी आत्महत्या करून आपले जीवन संपवले. या घटनेमुळे क्रीडा विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.

एंजल ही मूळची चेन्नई येथील असून तिचे वडील जीएसटी विभागात अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत. ती पुदुचेरी येथे बीबीए द्वितीय वर्षात शिकत होती. आपले क्रिकेटचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती थिलासपेट येथील एका प्रशिक्षण केंद्रात सराव करत होती आणि त्यासाठी तिने सोक्कनाथनपेट येथे भाड्याने खोली घेतली होती. बुधवारी रात्री आठच्या सुमारास ती सरावावरून आपल्या घरी परतली. त्यानंतर तिचे प्रशिक्षक कथिरवेल यांनी तिला संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रतिसाद न मिळाल्याने ते काळजीत पडले. त्यांनी एंजलच्या घरी जाऊन पाहिले असता, ती छताच्या पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळली. (वृत्तसंस्था)

# चेन्नईने मुंबईला १५९ धावांत रोखले

**चेन्नई, २ मे**

एम.ए. चिदम्बरम् स्टेडियमवर शनिवारी येथे चेन्नई सुपर किंग्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात मुंबई इंडियन्सला डावाच्या प्रारंभापासून नियमित अंतराने धक्के बसले. नूर अहमद, रामकृष्णा घोष आणि जॅमी ओव्हरटनने प्रभावी मारा करत मुंबईच्या फलंदाजीतील हवा बाहेर काढली. नमन धीरने केलेल्या ५२ धावांच्या अर्धशतकी खेळीच्या बळावर मुंबई इंडियन्सने २० षटकांत ७ बाद १५९ धावांपर्यंत मजल मारली. त्यामुळे आता चेन्नई सुपर किंग्ससमोर विजयासाठी १६० धावा काढण्याचे लक्ष्य साहिले.



नमन धीरचे अर्धशतक

डावाच्या प्रारंभी दुसऱ्याच षटकांत अंशुल कम्बोजने सलामीवीर विल जॅक्सला (१) रामकृष्णा घोषकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. त्यानंतर मात्र रायन रिकेल्टन व नमन धीरने मुंबईचा डाव सावरण्याचा चांगला प्रयत्न केला. रिकेल्टनने धीरसोबत दुसऱ्या गड्यासाठी ५८ धावांची भागीदारी केली. नूर अहमदने रिकेल्टनला पटेलकडून झेलबाद केले. रिकेल्टनने २४ चेंडूंत ५ षट्कारांच्या मदतीने ३७ धावांची खेळी केली, त्यानंतर नमन धीरने सूर्यकुमार यादवच्या साथीने मुंबईला शंभर धावांच्या जवळ आणले. मध्यम गती वेगवान गोलंदाज रामकृष्णा घोषने सूर्यकुमार यादवला ब्रेव्हिसकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. सूर्यकुमारने १२ चेंडूंत ३ चौकार व एका षट्कारसह २१ धावा केल्या.

नमन धीरने तिलक वर्माच्या साथीने आपले अर्धशतक साजरे केले व मुंबईला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला, त्याचवेळी तिलक वर्मा (५) नूर अहमदच्या गोलंदाजीला बळी पडला.

जॅमी ओव्हर्टनने नमन धीरला रोखले. ओव्हर्टनच्या चेंडूवर उडालेला त्याचा झेल बदली खेळाडू एस. एन. खानने पकडला. नमन धीरने ३७ चेंडूंत ५७ धावांची अर्धशतकी खेळी केली, यात त्याने ४ चौकार व ३ षट्कार खेचलेत. नमन धीर बाद झाला, तोपर्यंत मुंबई इंडियन्सने १६.५ षटकांत ५ बाद १३४ धावांपर्यंत मजल मारली होती. पुढे कर्णधार हार्दिक पांड्या (१८) व रॉबिन मिंझने (५) संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, परंतु या दोघांनाही कम्बोजने आपले लक्ष्य केले. कृष्ण भगत (३) व ट्रेंट बोल्टने (७) नाबाद खेळी करीत मुंबई इंडियन्सला मर्यादित २० षटकांत ७ बाद १५९ धावा रचून दिल्या.

चेन्नई सुपर किंग्सकडून अंशुल कम्बोज सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला, त्याने ३२ धावांत ३ बळी टिपले. नूर अहमदने २ बळी टिपले, तर रामकृष्णा घोष व जॅमी ओव्हर्टनने प्रत्येकी एक बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# टी-२० विश्वचषकासाठी भारतीय महिला संघाची घोषणा

### हरमनप्रीत कौर कर्णधार, स्मृती मंधाना उपकर्णधार

### नंदिनी शर्मा, यष्टिरक्षक यास्तिका भाटियाला संधी

**नवी दिल्ली, २ मे**

इंग्लंड व वेल्समध्ये होणाऱ्या आगामी आयसीसी महिला टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी भारताने आपल्या महिला टी-२० संघाची घोषणा केली आहे. हरमनप्रीत कौर या महिला संघाचे नेतृत्व करणार आहे, तर स्मृती मंधाना उपकर्णधारपदाची धुरा सांभाळेल.

आंतरराष्ट्रीय स्तरावर अद्याप पदार्पण न केलेल्या नंदिनी शर्मा आणि यष्टिरक्षक यास्तिका भाटिया यांचा १५ खेळाडूंच्या या संघात समावेश करण्यात आला आहे.

प्रतिका रावलला टी-२० विश्वचषकाच्या संघातून वगळण्यात आले असले, तरी तिचा समावेश कसोटी संघात करण्यात आला आहे. १० ते १३ जुलै दरम्यान लॉर्ड्स मैदानावर इंग्लंडविरुद्ध एकमेव कसोटी सामना खेळला जाणार आहे. अष्टपैलू खेळाडू अमनजोत कौरला दुखापतीमुळे संघात स्थान मिळवता आले नाही.

नंदिनी ही एक मध्यमगती गोलंदाज असून तिने महिला प्रीमियर लीगमध्ये दिल्ली कॅपिटल्स संघाकडून १० सामने खेळले असून, त्यामध्ये तिने १७ बळी मिळविले आहेत. या



हरमनप्रीत कौर



नंदिनी शर्मा

वर्षी फेब्रुवारीमध्ये बँकॉक येथे पार पडलेल्या महिला आशिया चषक रायझिंग स्टार्स स्पर्धेत सहभागी झालेल्या भारतीय संघातही तिचा समावेश होता.

विश्वचषकासाठी निवडलेला संघ, त्यापूर्वी यजमान इंग्लंडविरुद्ध २८ मे पासून सुरू होणाऱ्या तीन सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेतही सहभागी होईल.

इंग्लंडविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठी आणि टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), शेफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, भारती फुलमाळी, दीप्ती शर्मा, ऋचा घोष (यष्टिरक्षक), श्री चरणी, यस्तिका भाटिया (दुसरी यष्टिरक्षक), नंदिनी शर्मा, अरुंधती रेड्डी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, श्रेयंका पाटील, राधा यादव.

इंग्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यासाठी भारतीय संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मंधाना (उपकर्णधार), शेफाली वर्मा, जेमिमाह रॉड्रिग्ज, प्रतिका रावल, ऋचा घोष, श्री चरणी, यास्तिका भाटिया, नंदिनी शर्मा, हरलीन देओल, रेणुका सिंग, क्रांती गौड, सायली सातघरे, स्नेह राणा. (वृत्तसंस्था)

# दुखापतीमुळे लक्ष्य सेनची थॉस चषकातून माघार

**हॉर्सेन्स, २ मे**

प्रतिष्ठेच्या थॉ स चषक बॅडमिंटन स्पर्धेत फ्रान्सविरुद्ध होणाऱ्या उपांत्य सामन्यात भारताला लक्ष्य सेनच्या सेवेविना खेळावे लागेल. लक्ष्य सेनला दुखापत झाल्यामुळे त्याने स्पर्धेतून माघार घेतली आहे. तो सध्या आपल्या उजव्या कोपराच्या सूजेतून सावरत आहे. २४ वर्षीय लक्ष्यने, जागतिक क्रमवारीत सहाव्या क्रमांकावर असलेल्या चोऊ टिएन चेनविरुद्धच्या एका तास व २८ मिनिटे चाललेल्या अटीतटीच्या लढतीत, दोन मॅच-पॉइंट्स वाचवत १८-२१, २२-२०, २१-१७ असा विजय मिळवला. या विजयाच्या जोरावर भारताने उपांत्यपूर्व फेरीत चीन तैपेईवर ३-0 असा दणदणीत विजय नोंदविला होता. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील या विजेत्या खेळाडूला, एका तीव्र रॅलीदरम्यान एका फटक्यासाठी झेप घेताना कोपराला दुखापत झाली. काल चोऊ टिएन चेनविरुद्धच्या सामन्यात पडल्यामुळे, लक्ष्यच्या खेळणाऱ्या हाताला विशेषतः कोपराच्या भागात सूज आली आहे. तसेच, त्याला पायांवर फोड येण्याच्या समस्येचाही सामना करावा लागत आहे, असे भारताचे माजी प्रशिक्षक आणि त्याचे मार्गदर्शक विमल कुमार यांनी सांगितले. लक्ष्य उपलब्ध नसल्यामुळे, युवा खेळाडू आयुष शेट्टी सलामीचा एकेरी सामना जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या ख्रिस्टो पोपोव्हविरुद्ध खेळेल.

# सुखकर्ता संघ आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचा विजेता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे-**

आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथे झालेल्या आमदार आमदार सचिन कल्याणशेट्टी चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत सोलापूरच्या सुखकर्ता इलेव्हन विजेतपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी हणमंत फुटाणे -पाटील निंबाळ संघावर मात केली.

महेश बिराजदार युवा मंच व गटनेता बलवान गोतसुर्वे मित्र परिवाराने ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेचे ब्रँड ॲम्बेसिडर प्रसिद्ध क्रिकेटपटू आकाश चव्हाण हे होते. या स्पर्धेत १२ संघ आणि त्यातील खेळाडू क्रिकेटपटू ऑक्शन द्वारे निवडण्यात आले होते. आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते व दक्षिण सोलापूर पंचायत समिती सभापती संदीप टेळे, महेश बिराजदार, जिल्हापरिषद सदस्य विकास बुळळा, नेताजी खंडागळे, पंचायत समिती सदस्य सुरज पाटील, योगीराज बाबा बाजारमठ, वळसंग पोलीस स्टेशनचे ए.पी.



आय.राहुल डोंगरे यांच्या प्रमुख उपस्थित देण्यात आले.

यावेळी अशोक पाटील,संयोजक समितीचे सचिन मंगरुळे, अनिल पाटील, माजी सरपंच गोविंद वलेकर, श्रीशैल दूधगी,सागर कोळी, राजकुमार बाईटपल्ली, सरपंच विश्रांती पाटील, रमेश क्षीरसागर, महिबूब पटेल, रफिक मुल्ला, मालकप्पा कोडले, सिद्धू तिपरादी, धनलिंग मिरजे, लक्ष्मण हुल्ले, महादेव कोरे, हणमंत कोळी, मल्लू ढब्बे, चंदू शिलेणी, सिद्धाराम वाघमारे, हुसेन पटेल, शांतकुमार गायकवाड, कुलदीप पाटील, सुरेश मोची आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी घनश्याम मंगरुळे, बबलु बिराजदार, हसन बिराजदार, सिकंदर बिराजदार, मॉन्टी घुंगरगाव,समीर जवळगे, सागर गोतसुर्वे, अमोल शिलेणी आदिनी परिश्रम घेतले.

**अंतिम चार पारितोषिकेप्राप्त संघ व पुरस्कर्ते :**

सुखकर्ता (१ लाख ११ हजार ७८९/- व स्प्लेंडर बाईक, आचेगांव विनर करिअर अॅकॅडमी व मोरया कन्ट्रक्शनचे अशोक राठोड), हणमंत फुटाणे -पाटील निंबाळ संघ (७१ हजार ७८९, योगीराज बाबा बाजारमठ), वळसंग पोलीस स्टेशन (४५ हजार ७८९ मल्लू चिवडशेट्टी सावकार), सह्याद्री वॉरियर्स उळे (३५ हजार ७८९, पंचायत समिती उपसभापती वर्षाताई गुड्डू अण्णा पटणे)

**वैयक्तिक पारितोषिक विजेते**

मालिकावीर- शुभम टंकाळे ( एल. ई. डी टीव्ही), गोलंदाज- राजकुमार हिरेमठ, फलंदाज- आकाश चव्हाण. सामनावीर : मयूर राठोड, रोहित राठोड, जान लालू, शंकर कोळी (स्पोर्ट्स सायकल).

# योग सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी संतोष सासवडे; दत्तगुरु वेदपाठक यांची सचिवपदी निवड



संतोष सासवडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

योग सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी संतोष सासवडे तर सचिवपदी दत्तगुरु वेदपाठक यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

माजी अध्यक्ष सुनील आळंद यांच्या अध्यक्षतेखाली शिवस्मारक येथे मंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारिणीची सर्वानुमते करण्यात आली. सभेच्या सुरुवातीला सचिव दत्तगुरु वेदपाठक यांनी मागील वर्षाचा अहवाल सादर केला, तर खजिनदार सुभाष जोशी यांनी जमा-खर्चाचा हिशोब मांडला. या अहवालास उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

नवीन कार्यकारिणी याप्रमाणे : अध्यक्ष- संतोष सासवडे, उपाध्यक्ष- विद्या होनमोडे, सचिव-दत्तगुरु वेदपाठक, खजिनदार- सुभाष जोशी, संचालक- आप्पासाहेब स्वामी, जितेंद्र महामुनी, उन्नती संचेती, लता माळगे, माजी अध्यक्ष सुनील आळंद, संस्थापक अध्यक्ष मनमोहन भुतडा.



दत्तगुरु वेदपाठक

**'योगप्रेमी' नगरसेवकांचा आज गौरव**

सोलापूर महानगरपालिकेच्या नवनियुक्त सदस्यांपैकी जे सदस्य योगाभ्यासाशी संबंधित आहेत, अशा 'योगप्रेमी' नगरसेवकांचा सत्कार योगसेवा मंडळातर्फे रविवार, ३ मे रोजी सकाळी ६ वाजता, नवी पेठ येथील शिवस्मारक येथे होणार आहे.सत्कारमूर्ती नगरसेवक : रोहिणी तडवळकर, वंदना गायकवाड, संगीता शंकर जाधव, बिजू प्रधाने.

# महाराष्ट्र दिनानिमित्त सोलापूर ते तुळजापूर 'स्केटिंग रॅली'चा उत्साह

### क्रीडा भारती व विनर्स फाउंडेशन यांचा संयुक्त उपक्रम



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २ मे-**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून सोलापूर शहरात क्रीडा क्षेत्रातील उत्साहाचे दर्शन घडले. क्रीडा भारती आणि विनर्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १ मे रोजी सोलापूर ते तुळजापूर अशा भव्य स्केटिंग रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. पहाटेच्या मंगलमयी वातावरणात निघालेल्या या रॅलीने सोलापूरकरांचे लक्ष वेधून घेतले.

शुक्रवारी पहाटे ५:00 वाजता सोलापुरातील ग्रामदैवत रूपाभवानी मंदिर येथून या रॅलीचा प्रारंभ झाला. पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री ज्ञानेश्वर म्याकल यांच्या हस्ते भगवा झेंडा दाखवून खेळाडूंना मार्गस्थ करण्यात आले. यावेळी 'जय भवानी, जय शिवाजी' आणि 'भारत माता की जय' अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. या साहसी रॅलीमध्ये लहान मुलांपासून ते अनुभवी खेळाडूंपर्यंत सर्वांचा मोठा सहभाग होता. क्रीडा भारती सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष अरुण उपाध्ये व प्रशिक्षक वासुदेव कैरमकोंडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली पार पडली.

या रॅलीमध्ये भारत बंडा, प्रशांत बामनला, श्रीलेखा बामनला, समयुक्ता गुंडेली, प्राची गुंडेली, नवशिल जक्का, साईकृष्णा जक्का, श्लोक रंगडाळ, सुमीत दासरी, सौम्या दासरी, श्रद्धा फालमारी, प्रणव गोली, कृषीका गोली या खेळाडूंनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

तसेच मनोहर गुंडेली, हरीश रंगडाळ, बसवराज बंडा, श्रीनिवास बामनला, प्रभाकर फलमारी, नवनीत जक्का, प्रीती रंगडाळ, स्वाती जक्का आदी मान्यवर आणि पालकांनी रॅली सोबत राहून खेळाडूंचा उत्साह वाढवला.

**क्रीडा संस्कृतीचे संवर्धन**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून तरुणांमध्ये क्रीडा संस्कृती रुजावी आणि साहसी खेळांची आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सोलापूर ते तुळजापूर हे अंतर स्केटिंग करत पार पाडणाऱ्या या खेळाडूंचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

# संजीवनी स्ट्रायकर्स, टाईम्स, सलगर वॉरियर्स, रायझिंग स्टार संघाची विजयी सलामी

### अभिसिद्ध पेरेंट्स लीग क्रिकेट स्पर्धेचे दिमाखात उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २ मे-**

'अभिसिद्ध पेरेंट्स लीग' क्रिकेट स्पर्धेत सलामीच्या चुरशीच्या सामन्यांमध्ये संजीवनी स्ट्रायकर्स, टाईम सीसी, सलगर वॉरियर्स आणि रायझिंग स्टार या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत विजयी सलामी दिली.

दयानंद कॉलेजच्या मैदानावर या स्पर्धेचे उद्घाटन चिराग वेलांनी, चिराग शाह, सोहेल शेख आणि नवीन माने यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. पंच व गुणलेखक म्हणून पंच म्हणून चंदू मंजेली, अशोक डोंबाळे, इर्शाद बिराजदार आणि प्रवीण कुलकर्णी यांनी तर गुणलेखक म्हणून सचिन गायकवाड, मिलिंद गोरे आणि साई पवार हे काम पाहत आहेत.

पहिला सामन्यात प्रथम फलंदाजी करताना अभिसिद्ध संघाने १३.२



षटकांत सर्वबाद १०८ धावा केल्या. प्रत्युत्तरात संजीवनी स्ट्रायकर्सने १३ षटकांत ३ बाद १०९ धावा करत विजय मिळवला. करण चाकोते याला 'सामनावीर' घोषित करण्यात आले.

दुसरा सामन्याच माऊली मास्टर्सने १५ षटकांत ६ बाद १३५ धावांचे आव्हान ठेवले होते. टाईम्स संघाने धडाकेबाज फलंदाजी करत अवघ्या १२.४ षटकांत ४ बाद १३९ धावा करून सामना खिशात घातला. प्रविण यादव सामन्याचा मानकरी ठरला.

तिसरा सामन्यात फ्रेंड्स स्ट्रायकर्स संघाने १५ षटकांत ६ बाद १०९ धावा केल्या. हे लक्ष्य सलगर वॉरियर्सने १२.५ षटकांत ३ बाद ११0 धावा करत पार केले. बिरू याला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

चौथ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना रायझिंग स्टारने १५ षटकांत ३ बाद १६५ धावांचा डोंगर उभा केला. बी.जी. रॉयल्सचा संघ १४.४ षटकांत १२९ धावांवर गारद झाला. रोहन ढेपे याला उत्कृष्ट कामगिरीसाठी सामनावीर निवडण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### पालकांचे निवृतीनंतरचे दायित्व मुलांचेच : डॉ. कुलकर्णी

**श्रीपूर, दि. २ मे-**

आयुष्यभर प्रपंच तसेच मुलांचे संगोपन व त्यांना स्वतःचे पायावर उभे करण्यात पालक खपलेले असतात. मात्र निवृत्ती नंतर मुलांनी त्यांना भार न समजता पालकांच्या आशा आकांक्षेकडे दातृत्वपूर्वक लक्ष देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी केले. चंद्रशेखर विद्यालयाच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा जाधव यांच्या निवृत्ती समारंभात ते बोलत होते. मंचावर चंद्रशेखर विद्यालय तसेच अबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष डॉ. रामदास देशमुख, उपाध्यक्षा शुभांगी देशमुख, उद्योजक हिम्मत पाटील, डॉ. सुधीर पोफळे, महाळुंग-श्रीपूर नगर पंचायतीचे सदस्य नानासाहेब मुंडफणे, शारदा पाटील विक्रमसिंह लाटे, रतनसिंह रजपूत, प्रा.पांडुरंग बनसोडे, माजी प्राचार्य नागनाथ वाघमारे, मुख्याध्यापक शंकर यादव, अनिल जाधव उपस्थित होते डॉ. रामदास देशमुख यांनी सुरेखा जाधव यांनी शालेय कारकिर्दीत शाळेचे नाव उज्वल केल्याचे सांगितले. याबरोबरच शुभांगी देशमुख, कोळेकर, प्रा. प्रकाश नवगिरे, डॉ. सुधीर पोफळे, संध्या कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. सुरेखा जाधव यांनी सेवाकाळातील कार्याबद्दल आनंद वाटत असल्याचे सांगितले. सुत्रसंचालन आरती डोळे व दत्ता नाईकनवरे यांनी केले.

### बार्शीतील युवक बेपत्ता; पोलिसांचे आवाहन

**बार्शी, दि. २ मे -**

येथील नाळे प्लॉटमधील रहिवासी धीरज अमर पोळ (वय १७ वर्षे ७ महिने) हा तरुण २९ एप्रिल रोजी सकाळी ९-३० वाजता भगवंत मंदिरासमोरुन बेपत्ता झाला असून, अज्ञात इसमाने त्याला फूस लावून पळवून नेल्याबाबत बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नंबर ३३४/२०२६ बीएनएस कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेच्या दिवसापासून धीरजचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. तरी या मुलाबाबत कोणालाही काही माहिती मिळाल्यास त्यांनी तत्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या ०२१८४-२२३३३३ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा तपास अंमलदार मुंडे यांच्या ९५५२५१२९४८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### कर्मवीर भाऊराव पाटील व रमेश खलीपे कॉलेजचे बारावी परीक्षेत उत्कृष्ट यश

**पिलीव, दि. २ मे-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेजचा बारावी परीक्षेचा विज्ञान शाखेचा निकाल ८७.५० टक्के लागला. परीक्षेस बसलेलल्या ७२ विद्यार्थ्यांपैकी ५३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम क्रमांक अजिंक्य शिंदे ६९.१७ टक्के द्वितीय क्रमांक मधुरा चव्हाण ५९ टक्के, तृतीय क्रमांक संध्या गलांडे ५७.३३ टक्के यांनी पटकावला. कला शाखेतील ४७ पैकी ३८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. निकाल ८०.८५ टक्के लागला. सुफीया मुलाणी ६८ टक्के, ऐश्वर्या गोरे ६४.१७ टक्के, वृषाली बजबळकर ६३ टक्के यांनी अनुक्रमे पहिले तीन क्रमांक पटकावले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे स्थानिक स्कूल कमिटी सदस्य संग्रामसिंह जहागिरदार, गणेश पाटील, संग्राम पाटील तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संजय पाटील, प्राचार्य अशोक बागल, पर्यवेक्षक मासाळ, ज्युनिअर विभाग प्रमुख सचिन पाटील, वरिष्ठ लेखनिक भोरकडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

### आपच्या शहराध्यक्षपदी निलेश संगेपाग

**सोलापूर, दि. २ मे-**



वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी सोलापूर ते दिल्ली असा सायकल प्रवास करून तत्कालीन मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची भेट घेणारे निलेश संगेपाग यांची आम आदमी पक्षाच्या सोलापूर शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. गेल्या काही वर्षांपासून संगेपाग हे पक्षाची ध्येय-धोरणे आणि विचार तळागाळातील जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांच्या या कार्याची आणि निष्ठेची दखल घेत पक्षश्रेष्ठींनी त्यांच्यावर ही धुरा सोपवली आहे. अवघ्या २३व्या वर्षी त्यांच्यावर टाकलेला हा विश्वास त्यांच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासातील एक मोठा टप्पा मानला जात आहे.

## निधन वृत्त...

### सुभाष कुलकर्णी

**सोलापूर, दि. २ मे-**



भारतीय पोस्ट सेवेतून सेवानिवृत्त झालेले अकोलेकाटी (ता. उत्तर सोलापूर) येथील मूळ रहिवासी व सध्या सोलापूर येथील मुरारजी पेठ येथील खमितकर कॉम्प्लेक्स मध्ये राहणारे सुभाष शंकरराव कुलकर्णी (अकोलेकर) (वय-७५) यांचे आज दि.१ मे २०२६ रोजी दुपारी तीन वाजता अल्प आजाराने सोलापूरच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सुना, मुलगी, जावई, दोन भाऊ, भावजयी असा परिवार आहे.

### सत्यभामा शेळके

**सोलापूर, दि. २ मे-**



चौपाड, उत्तर कसबा मंगळवेढा तालीम जवळ येथील रहिवासी सत्यभामा विश्वनाथ शेळके यांचे २ मे रोजी निधन झाले. सुनील शेळके यांच्या त्या मातोश्री होत.

### द्वारकाप्रसाद करवा

**सोलापूर, दि. २ मे-**



टॉवेल व्यापारी द्वारकाप्रसाद करवा वय ६३ यांचे दि. १ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. ते भवानी पेठ येतील रहिवासी असून त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुली, सून आणि नातवंडे असा परिवार आहे.

# नागरिकांनी वाहतूक व पार्किंगविषयी स्वयंशिस्त पाळावी : रणजितदादा

## वाहतूक कोंडी व पार्किंग विषयी अकलूजमध्ये बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ मे-**

शहराची होत असलेली वाढ, वाढणारी लोकसंख्या, त्यानुसार वाढलेली वाहने आणी त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी यावर उपाय काढण्यासाठी आज आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सदूभाऊ सांस्कृतिक हॉलमध्ये नागरिक व अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.

यावेळी जेष्ठ नेते विजयसिंह मोहिते पाटील, उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते पाटील, डी. वाय. आर.टी.ओ. अमरसिंह गवारे, आर.टी.ओ.पोंदकुळे, पोलीस निरीक्षक नीरज उबाळे, सार्व. बांधकाम अभियंता सुनीता पाटील, सर्व नगरसेवक, पं. स. सदस्य, नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



आ. मोहिते पाटील म्हणाले, शहरातील पार्किंग आणी वाहतुकीला शिस्त नाही. अल्पवयीन मुले मोटार सायकली पळवत आहेत. रिक्षाना परवाने नाहीत. मोठे व्यापारी, दवाखाने, बँका यांच्या समोर वाहणांची अस्ताव्यस्त गर्दी होतेय. वाहतूक कोंडी व अपघात टाळण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे पालन होणे गरजेचे आहे. अकलूज शहरातील गर्दीच्या भागाम ध्ये लवकरच एकतर्फी वाहतूक, सम विषम तारखेला पार्किंग असे उपक्रम राबवले जाणार आहेत. नागरिकांनी स्वयं स्फूर्तीने वाहने चालवावीत आणी वाहतुकीला अडथळा न करता पार्किंग करावीत असे आवाहन त्यांनी केले.

अल्पवयीन वाहन चालक मुलांच्या पालकांना सावधानतेचा इशारा देताना आर. टी. ओ. अमरसिंह गवारे म्हणाले, अल्पवीन मुलगा किंवा मुलगी वाहन चालवताना सापडले तर त्यांना सुमारे २५ हजार रुपये दंड, पालकांना अटक व सदर मुलांना वयाच्या २५ वर्षा पर्यंत लायसन काढता येणार नाही अशी दंडाची तरतूद आहे. म्हणून पालकांनी आपल्या अल्पवयीन मुलांना वाहन चालवण्यास देऊ नये. व्यापारी, व्यावसाईक, किरकोळ विक्रेते यांचे अतिक्रमण व बेशिस्त पार्किंग यांच्यामुळे रस्त्याच्या रुंदीचा पुरेपूर उपयोग वाहतुकीसाठी होत नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी होतेय. कायद्याची कठोरपणे अंम लबजावणी नागरिकांना सोसत नाही. त्यामुळे नागरिकांनी स्वतःच शिस्त पाळावी असे आवाहन पोलीस निरीक्षक नीरज उबाळे यांनी केले. यावेळी नागरिकांनीही आपल्या समस्या बोलून दाखवल्या.

# ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूलला जागतिक स्तरावर सहा सुवर्ण

## आय थिंकर ऑलिम्पियाडमध्ये विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा,**
**बोरामणी, दि. २ मे -**

ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील आय थिंकर ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर सुवर्ण, रौप्य व कांस्य मानांकन प्राप्त करुन विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

आय थिंकर ऑलिम्पियाड ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमता, तर्कशक्ती, विज्ञान व गणित विषयातील आकलन विकसित करण्यासाठी आयोजित करण्यात येणारी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धात्मक परीक्षा आहे. परीक्षेत इयत्ता दहावीतील सानिका जगताप, प्रणिती जळकोटे आणि पूनम भोसले यांनी जागतिक स्तरावर उत्कृष्ट गुणवत्तेची कामगिरी नोंदवत जागतिक सुवर्ण मानांकन प्राप्त केले. इयत्ता सहावीतील निवेदिता चौगुलेने रौप्य मानांकन मिळवून शाळेचा गौरव वाढवला. पुरस्कार वितरण समारंभात टॉप टेक प्रकाशन, मुंबई येथील प्रमुख समन्वयक डॉ. प्रफुल्ल आडगाले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना सन्म ानचिन्हे व प्रमाणपत्रे प्रदान केली.



यावेळी ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूलच्या व्यवस्थापन समितीचे संचालक अरुण शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, सचिवा संगीता शहा तसेच खजिनदार सुजाता बादोले यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना पूर्वप्राथमिक विभाग प्रम ुख अमृता कोरीशेट्टी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेचे शिक्षक, पालक व व्यवस्थापन समितीने अभिनंदन केले.

# करमाळ्यानंतर आता सोलापुरातही विषमुक्त भाजीपाला आठवडे बाजार

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि. २ मे-**

करमाळा तालुक्यातील विषमुक्त भाजीपाला पिकवणाऱ्या करमाळा ऑरगॅनिक ग्रुपतर्फे सोलापूर येथील सेंद्रिय आठवडा बाजाराचा पालकमंत्री व पोलिस अधीक्षकांच्या हस्ते प्रारंभ झाला. यावेळी त्यांनी ग्रुपचे कौतुक करून शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सहकार्याचे आश्वासन दिले.

पाणी फाऊंडेशन टीमच्या प्रेरणेतून करमाळा येथे सुरू झालेला करमाळा ऑरगॅनिक विषमुक्त आठवडी बाजार सोलापूर येथे सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केला आहे. सोलापुरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी आज सोलापूर ग्रामीण पोलीस मुख्यालय येथे भरलेल्या विषमुक्त आठवडी बाजाराला भेट दिली. नैसर्गिक शेतीचा मार्ग स्वीकारून समाजाला निरोगी अन्न देण्याच्या या उपक्रमाला विशेष दाद दिली. तसेच शेतकऱ्यांना विषमुक्त चळवळ अधिक जोमाने पुढे नेण्यासाठी प्रोत्साहन दिले.



पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी शेतकऱ्यांनी पिकविलेल्या सेंद्रिय भाजीपाल्यासाठी बाजारपेठ मि ळवून देण्यासाठी पुढील काळातही सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी हिराजी राऊत, जिवन होगले, मेजर सुनील दौंडे, हर्षद शिंदे, विक्रम खरात, विजय आवताडे, अतुल राऊत, महेंद्र नाना देशमुख, धनाजी माने, गणेश धुमाळ, प्रताप पाटील, सोमनाथ सायकर करमाळा ऑरगॅनिक विषमुक्त आठवडी बाजार गटाच शेतकरी आपला भाजीपाला घेऊन उपस्थित होते

# जेऊर येथे जखमी 'जपानी कॉर्मोरंट' पक्षाला जीवनदान

## काँग्रेस तालुकाध्यक्ष साहेबराव वाघमारे यांचे औदार्य

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.२ मे-**

करमाळा तालुक्यातील जेऊर परिसरात दुपारी एकच्या सुमारास तब्बल ४१ अंश सेल्सिअस तापमानात एक दुर्मिळ 'जपानी कॉर्मोरंट' पक्षी जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला काँग्रेसचे तालुकाध्यक्ष साहेबराव वाघमारे, रिक्षा चालक सचिन कांबळे व महेश चांदणे यांनी जीवनदान दिले.

संबंधित पक्षी पंख पसरवत उडण्याचा प्रयत्न करत होता, मात्र त्याला उडता येत नसल्याचे दिसून आले. जवळून पाहणी केली असता त्याचा डावा पाय गंभीररित्या मोडलेला असल्याचे स्पष्ट झाले. याबाबत माहिती मिळताच तिघांनीही तत्काळ मदतकार्य हाती घेतले. जखमी पक्षाला पाणी पाजून प्राथमिक मदत केली. तातडीने जेऊर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले.



दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. आर. एन. होळकर यांनी पक्षाची तपासणी केली. पक्षाचा एक पाय सुमारे ९० टक्के मोडलेला असल्याचे निष्पन्न झाले. त्यांनी तत्परतेने उपचार करत जखमी पायाला प्लास्टर व आवश्यक वैद्यकीय उपचार दिले.

**पक्षाला झालेली हानी व बचाव कार्य**

- पंख पसरवून उडता येत नव्हते
- डावा पाय गंभीररित्या मोडला
- पाणी पाजून प्राथमिक मदत
- तातडीने जेऊर पशुवैद्यकीय दवाखान्यात भरती

यानंतर पक्षाला पुढील देखभाल व पुनर्वसनासाठी मोहोळ येथील वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले. यावेळी साहेबराव वाघमारे, सचिन कांबळे, गट शिक्षणाधिकारी चंद्रकांत साळवे, शिवाजी आवटे उपस्थित होते. वनविभागाच्या आयेशा शेख व त्यांच्या कर्मचाऱ्यांकडे पक्षी सुरक्षितपणे देण्यात आला. जखमी 'जपानी कॉर्मोरंट' पक्षाची योग्य काळजी घेऊन त्याला पुन्हा निसर्गाच्या सान्निध्यात मुक्त करण्यात यावे, अशी मागणी उपस्थितांनी केली आहे.




# कामगारवर्ग सत्तेवर असेल हा विश्वास बाळगा : तानाजी ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २ मे -**

शिकागो शहरात कामगारांच्या नेत्यांनी संघर्ष घडविला. तो इतिहास न विसरता आपण मार्क्सवादी संघर्षाने पुढे जात राहिल्यास भांडवली व्यवस्थेला उध्वस्त करत कामगार वर्ग सत्तेवर असेल हा विश्वास बाळगा, असे प्रतिपादन कॉम्रेड तानाजी ठोंबरे यांनी केले.

१ मे कामगार दिनी आयटक कामगार केंद्राच्यावतीने पुतळा पार्क येथून महापुरुषांना अभिवादन करत शहराच्या रस्त्यावरुन घोषणा देत भव्य कामगार मिरवणूक कढली होती. त्यानंतर मिरवणुकीचे सभेत रुपांतर झाले. यावेळी सभेचे अध्यक्ष म्हणून ते मार्गदर्शन करत होते. मंचावर ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे कॉम्रेड ए. बी. कुलकर्णी, डॉ. जगदाळे मामा हॉस्पिटल श्रमिक संघाचे कॉ. लहू आगलावे, मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह कामगार संघटनेचे सुरज अन्नदाते, बांधकाम कामगार संघटनेचे अनिरुद्ध नखाते, अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कर्मचारी संघटनेचे प्रवीण मस्तुद, बार्शी नगरपालीका कंत्राटी कामगार संघटना प्रतिनिधी उपस्थित होते.

सभेची सुरुवात लाल बावटा फडकवून करण्यात आली. यावेळी युवराज घाडगे, केदार फुले, बाळासाहेब बाकले, भारत भोसले, भारती मस्तुद, आकाश लोंढे,सचिन काळे, मयूर ननवरे, अनिरुद्ध ओव्हाळ, दया भोसले,सागर बिडवे, अमर जवंजाळ,प्रीतम शेटे, मनोज कुलकर्णी, बाळासाहेब प्रतापे,सागर राजमाने, अब्बास बागवान, तानाजी बागल, उदावंद, नवनाथ पवार, संपत खताळ, रामेश्वर करळे, शहापरी शेख, सत्यभामा जाधवर, निर्मला सरवदे, आनंद गुरव, भारत पवार, भरत चव्हाण, नानासाहेब ठाकरे, अण्णासाहेब ठाकरे ,दादा काकडे, राजू ठोंबरे, परमेश्वर नागटिळक, केशव गायकवाड , कसबे सदावर्ते आदी उपस्थित होते.


# 'शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालया'ची १०० टक्के निकालाची परंपरा कायम

## सलग १७ व्या वर्षी उत्कृष्ट निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २ मे -**

शिवरत्न शिक्षण संस्थेच्या शंकरराव मोहिते पाटील इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजने यंदाही आपली बारावी परीक्षेतील १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. सलग १७ व्या वर्षी १०० टक्के निकल प्राप्त केला आहे.

श्रेयाली रणनवरे ८८.८३ टक्के गुणांसह प्रथम, मंजिरी इनामके ८५.८३ टक्के गुणांसह द्वितीय, त्रिवेणी माने ८४.५० टक्के गुणांसह तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. एकूण ८६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली त्यामधील ५२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. ३४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.




शिवरत्न शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक, खासदार धैर्यशील मोहिते-पाटील व अध्यक्ष, शितलदेवी मोहिते-पाटील यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संस्थेचे सर्व संचालक, स्थानिक व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, प्रिन्सीपल व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी १०० टक्के निकालाची परंपरा राखत, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढी सोबतच सर्वांगीण कौशल्य विकास व्हावा यासाठी प्रोत्साहन दिले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शिवरत्न संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व संचालक मंडळ, सर्व स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य प्राचार्य, समन्वयक सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# शिक्षण प्रसारक मंडळ अकलूजचा बारावीचा निकाल ९१.९५ टक्के

**तभा वृत्तसेवा**
**अकलूज, दि. २ मे -**

माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी, मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या १२ वी परीक्षेचा शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज या संस्थेचा निकाल ९१.९५ टक्के लागला. संस्थेच्या सात शाखेतून विज्ञान, कला, वाणिज्य व व्यवसाय अभ्यासक्रम यातून १५९१ विद्यार्थी परीक्षेला बसले. यापैकी १४६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

संस्थेत सदाशिवराव माने विद्यालयातील विज्ञान शाखेचा चि. अरबाज नजिर बागवान यांने ६०० पैकी ५६३ गुण व ९३.८३ टक्के मिळवीत प्रथम क्रमांक पटकावला. तर वाणिज्य शाखेची कु. अपूर्वा सचिन राऊत हिने ६०० पैकी ५५१ गुण व ९१.८३ टक्के मिळवित द्वितीय आणि विज्ञान शाखेची आफरीन मोकाशी हिने ६०० पैकी ५४९ गुण व ९१.५० टक्के मिळवीत तृतीय क्रमांक पटकावला. कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विषयात सानिका थोरात हिने १०० पैकी १०० गुण मिळवले.







संस्थेच्या सदाशिवराव माने विद्यालय अकलूज येथून विज्ञान, कला, वाणिज्य व व्य.अभ्यासक्रम या शाखेतून ६१३ विद्यार्थी परीक्षेला बसले यापैकी ५९९ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाखेचा निकाल ९७.७२ टक्के लागला. महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर येथून विज्ञान, कला, व्य. अभ्यासक्रमातून २३१ विद्यार्थी पैकी २२५ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाखेचा निकाल ९७.४० टक्के लागला. शंकरराव मोहिते महाविद्यालय येथून विज्ञान, कला, वाणिज्य, व्य. अभ्यासक्रमातील ३८० विद्यार्थी पैकी ३३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. व निकाल ८६.८४ टक्के लागला. कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय व ज्यू. कॉलेज सदाशिवनगर मधील विज्ञान, कला, वाणिज्य शाखेतून १५३ पैकी १४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. व निकाल ९४.७७ टक्के लागला.

जिजामाता कन्या प्रशाला येथून विज्ञान शाखेतील ११४ पैकी ११४ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन निकाल १०० टक्के लागला. यशाबद्दल संस्थेचे जेष्ठ मार्गदर्शक संचालक जयसिंह मोहिते पाटील, अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील, सदाशिवराव माने विद्यालयाचे सभापती सयाजीराजे मोहिते-पाटील, सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे पाटील यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### मुलांना का मारले म्हणून तरुणाला काठीने मारहाण

**सोलापूर, दि.२ मे-**

आमच्या मुलांना का मारले या कारणावरून एका तरुणाला काठ्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील डोंगरगाव येथे शुक्रवारी सकाळी दहा वाजता घडली. शिवाजी श्रीमंत डांगे ( वय-३६ वर्ष , राहणार डोंगरगाव) असे त्या मारहाण झालेल्या तरुणाचे नाव असून तो शुक्रवारी सकाळी राहत्या घराजवळ असताना त्याला सिद्धेश्वर झेंडे व इतर दोघांनी मिळून मारहाण केली. यात हाताला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने तो उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात स्वतः दुपारी दाखल झाला.

### ट्रॅक्टरच्या पैशावरुन दोन महिलांसह तिघांना मारहाण

**सोलापूर, दि.२ मे-**

ट्रॅक्टर चे पैशाच्या व्यवहाराच्या कारणावरून दोन महिलांसह तिघांना रॉड ,काठी व कोयत्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील खूपसिंगी येथे गुरुवारी रात्री साडेदहा वाजता घडली. अनुसया मल्हारी बिचुकले (वय-५५ वर्ष), सायली बिरुदेव बिचुकले (वय-२८ वर्ष) आणि बिरुदेव मल्हारी बिचुकले (वय-३२ वर्षे, तिघेही रा.खूपसिंगी) अशी मारहाण झालेल्या तिघांची नावे आहेत. गुरुवारी रात्री साडेदहा वाजता राहत्या घराजवळ असताना त्यांना सुनील शेंडगे व इतर सहा ते सात जणांनी मिळून मारहाण केली . यात तिघांना मार लागल्याने मंगळवेढा येथील आरोग्य केंद्रात प्रथम उपचार करून येथील शासकीय रुग्णालयाते स्वतः दाखल झाले.

### डीआरएम ऑफिससमोर रिक्षाला अपघात; चौघे जखमी

**सोलापूर, दि.२ मे-**

चालकाचा ताबा सुटल्याने धावती रिक्षा उलटली गेली असता त्याला धडकून दुचाकी वरील दोघे जन तर रिक्षातील दोघे प्रवासी मार लागून जखमी झाल्याची घटना डीआरएम ऑफिस समोर शुक्रवारी सकाळी सात वाजता घडली. करीम उस्मान सय्यद (वय-६५ वर्ष) आणि आयान सलीम सय्यद (वय-१४ वर्ष, दोघे राहणार जुनी लक्ष्मी चाळ, डोणगाव रोड, सोलापूर) अशी दुचाकी वरील जखमींची नावे तर रिक्षातील प्रवासी स्नेहा एकनाथ चव्हाण (वय-२१ वर्षे, रा.सलगर, जि.धाराशिव), पवन पांडुरंग बल्लाळ (वय-३० वर्ष, रा.हौसे वस्ती, अमराई सोलापूर)अशी जखमींची नावे आहेत. शुक्रवारी सकाळी सात वाजता करीम सय्यद व आयान सय्यद हे दोघे दुचाकीवरून निघाले असताना डीआरएम ऑफिस समोर चालकाचा ताबा सुटल्याने रिक्षा पलटी झाली. त्याचवेळी त्या रिक्षाला ही दुचाकी धडकली. यात दुचाकीवरील दोघे आणि रिक्षात बसलेले वरील दोघेजण जखमी झाले. या सर्वांना उपचाराकरता येथील शासकीय रुग्णालयात सकाळीच दाखल करण्यात आले.

# पाणी वाटप संस्थांमधील अधिकाऱ्यांची मनमानी; खासदार धैर्यशील मोहिते-पाटलांनी डागली तोफ

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२ मे-**

पाणी वाटप संस्थांमधील अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराच्या विरोधात खासदार धैर्यशील मोहिते-पाटील तोफ डागली. पाणी वितरणात पैसे खाता येत नाहीत म्हणून जलसंपदा विभागाचे स्थानिक श्रेणीतील अधिकारी पाणी वाटप संस्था बंद पाडण्याचे कट रचत असल्याचा सणसणीत आरोप त्यांनी केला. माळशिरस तालुक्यातील विविध समस्यांसंदर्भात आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी अकलूज येथे विशेष बैठक आयोजित केली होती.



या बैठकीत बोलताना ते पुढे म्हणाले, मी उगाच बिनबुडाचे आरोप करत नाही. हे मी पुरवण्याची सिद्ध करून दाखवू शकतो. शेतकऱ्यांच्या दृष्टीने हक्काचे पाणी आरक्षित करण्यासाठी आम्ही सांगत आलो आहे. जलजीवन मिशन कामांमध्ये अनियमितता असल्याने याची अधिकांश कामे रखडली आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्याम ध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, अकलूजचे उपनगराध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील, तहसीलदार सुरेश शेजुळ, जलसंपदा खात्याचे उपअभियंता श्रवण नहार, भीमा पाटबंधारे विभागाचे उपअभियंता कल्याणराव देशमुख, सतीश माने-देशमुख, वनाधिकारी आटोळे आदी उपस्थित होते.

> **...तर मी गप्प बसणार नाही**
>
> आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी वन अधिकाऱ्यांना शेलक्या शब्दात खडसावले. मी कधीही कुठल्या अधिकाऱ्यांना असे बोल बोलत नाही. परंतु नागरिकांच्या हिताला बाधा आणणार असाल तर गप्पही बसणार नाही, असे सांगायलाही ते विसरले नाहीत.
>
> 

**गतवर्षी ७०० तर यंदा ६०० बर्गे उपलब्ध**

निरा कालव्यातून उन्हाळी हंगामातील दुसरे आवर्तन कधी सुरु होणार? याकडे लक्ष वेधले असता पुढील चार दिवसात हे आवर्तन सुरु होईल. भीमा पाटबंधारे विभागाकडील कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी गतवर्षी ७०० तर यंदा ६०० बर्गे उपलब्ध झाले, असे उपअभियंता श्रवण नहार यांनी सांगितले.

**'एसआरआय'च्या मॅपिंगनुसार अधिकृत मतदार**

माळशिरस तालुक्यात गत निवडणुकीवेळी सुमारे ३ लाख ५० हजार मतदार होते. 'एसआरआय'च्या मॅपिंगनुसार तालुक्यात आतापर्यंत केवळ २ लाख ७० हजार मतदार अधिकृत ठरले आहेत. राहिलेल्या व वाढीव मतदारासंदर्भात नागरिकांनी सजग राहण्याचे आवाहन खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील या बंधूंनी केले.

## पिरॅमिडसाठी कायम मदत करणार : प्रथमेश कोठे

### बुध्द पौर्णिमा ध्यान महोत्सव उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

स्पर्धात्मक व तणावपूर्ण वातावरणात ध्यान करणे महत्वाचे आहे. स्व. महेश अण्णांनी विडी घरकुल भागातील नागरिकांसाठी निर्माण केलेल्या गणेश पिरॅमिडच्या विकास कामासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे ग्वाही महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

नगरसेवक प्रथमेश कोठे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जुना विडी घरकुल भागातील नागरिकांच्या सोयीसाठी माझे वडील महेश अण्णांनी गणेश पिरॅमिडची स्थापना केले. ते दररोज ध्यान करायचे. या गणेश पिरॅमिडच्या सुधारण्यांसाठी मी कायम मदत करणार असल्याचे आश्वासन नगरसेवक प्रथमेश कोठे त्यांनी दिले.



दि सोलापूर पिरॅमिड स्पिच्युअल ट्रस्टद्वारा हैद्राबाद रोड यशोधरा हॉस्पिटलजवळील श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिर येथे बुध्दपौर्णिमेनिमित्त ध्यान शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीम ध्ये निवडून आलेले सोलापूरचे प्रथम नागरिक महापौर विनायक कोंड्याल व नूतन निवडून आलेले नगरसेवक प्रथमेश कोठे, सतीश सिरसुल्ला, विनोद भोसले, दिपीका यलदंडी, उज्ज्वला अविनाश दासरी यांच्या भव्य सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ट्रस्टचे पूर्णचंद्र राव, चंद्रशेखर रेड्डी, परमानंद पाटील, निता राव, सीए चंद्रकांत इंजामुरे, नेहा मिरजगावकर, कर्णिकनगर योगा ग्रुपचे योग प्रशिक्षक अरविंद लोणी, सामाजिक कार्यकर्ते साठे सर, श्री सिध्देश्वर योगाच्या योग प्रशिक्षक स्वाती राऊत, अक्कम महादेवी ग्रुपच्या राजश्री तळंगे, संतोष कांबळे, आनंद गांगजी, श्रीनिवास पुला, कविता मिरजगावकर, उन्मनी जंगे, स्मिता दुधनकर, ज्योत्सना दुस्सल, प्रीती सदारंगानी, प्रज्ञा कुलकर्णी, दिपा मेहता, वर्षा कत्ते आदीजण उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दि सोलापूर पिरॅमिड स्पिच्युअल ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी चंद्रशेखर रेड्डी यांनी केले. यावेळी ते म्हणाले की, या विडी घरकुल भागाचे विकासरत्न स्व. महेश अण्णा कोठे हे एक चांगले मित्र होते. त्यांनी येथील नागरिकांसाठी गणेश पिरॅमिड ध्यान केंद्राची स्थापना केली. स्व. महेश अण्णा स्वतः पिरॅमिड मास्टर होते. ते सातत्याने ध्यान करत होते. आपल्या प्रत्येक कार्यक्रमात ते आवर्जून उपस्थित राहत होते. ते ब्रह्मर्षि पितामह पत्रीजीचे आवडते शिष्य होते. पत्रीजीसोबत इजिप्तच्या पिरॅमिडमध्ये त्यांनी ध्यान केले होते. त्यांचा अभ्यास करूनच महेश अण्णांनी या परिसरातील विद्यार्थ्यांसाठी व नागरिकांसाठी हे गणेश पिरॅमिड ध्यान मंदिर निर्माण केले. या पिरॅमिडच्या इतर अनेक सुधारणा करायच्या आहेत.

त्यासाठी महापौर विनायक कोंड्याल, नगरसेवक प्रथमेश कोठे व इतर नगरसेवकांनी सहकार्य करावे, असे प्रास्ताविकात नमूद केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहित वंगारी, आनंद गांगजी, श्रीनिवास पोला, व्यंकटेश आडम, गणेश म्याकम, ओंकार उटगे, विवेकानंद वंगारी, प्रकाशचंद्र पागुल, अंबादास कट्टा, विपुल आदीनी परिश्रम घेतले.

## ह.दे.प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

ह.दे.प्रशाला व क.महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन संपन्न झाला. प्रारंभी शाला समिती अध्यक्ष सुरेशबाबु मंकणी, मुख्याध्यापिका स्मिता कांगुणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी उपमुख्याध्यापक रविंद्र पानसरे, उपप्राचार्य शांतप्पा कुंभार, नू.म.वि शिशू शाळा मुख्याध्यापिका, नू.म.वि प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका, एस.पी.एम इंग्लिश मिडीयम स्कूल मुख्याध्यापिका, प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सर्व पर्यवेक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मल्लिकार्जुन घवाळे यांनी केले. प्रशालेच्या सांख्यिकी निकालाचे वाचन पर्यवेक्षक औदुंबर सर्वगोड तर कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमोद चुंगे यांनी वाचन केले. यावेळी प्राध्यापक धन्यकुमार बिराजदार यांनी आपल्या मनोगतातून महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे महत्त्व विविध दाखले देऊन सांगितले. मुख्याध्यापिका तथा प्राचार्या स्मिता कांगुणे यांनी सर्वांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या व यशस्वी विद्यार्थ्यांन चे कौतुक केले. शाळा समिती अध्यक्ष सुरेशबाबु मंकणी यांनी सर्वांना महाराष्ट्र दिन व कामगार शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी तसेच नू.म.वि शिशू शाळा ताई , नू.म.वि प्राथमिक शाळा शिक्षक व शिक्षिका, एस.पी.एम. इंग्लिश मिडीयम स्कूल शिक्षक व शिक्षिका यावेळी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद चुंगे यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता कौमीनारे देऊन झाली.



### २३ हजारांचे कॉपर वायर बंडल लंपास

**सोलापूर :** घरात नव्याने फिटींग केलेली वायरींग तोडुन नुकसान केले व २३ हजार रुपये किमतीचे विविध रंगाची कॉपर वायरचे बंडल लंपास केल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रभाकर प्रकाश माने (रा. कल्याण नगर भाग-३, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत किरण मल्लिनाथ मिटकरे (रा. ५१ विद्या नगर, शेळगी, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. नुकसानीची माहिती फिर्यादीला गुरुवार ३० एप्रिल रोजी सकाळी झाली. पोलीस हवालदार परदेशी गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाला मिळाली 'डिजिटल' उभारी

### 'महालक्ष्मी सरस' प्रदर्शनाचा सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या वतीने आयोजित 'महालक्ष्मी सरस' या भव्य प्रदर्शन व विक्रीचे उद्घाटन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अत्यंत थाटामाटात संपन्न झाले.

व्यासपीठावर ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, नामदार मंगलप्रभात लोढा, प्रधान सचिव एकनाथ डवले, मुंबईच्या महापौर रितू तावडे, 'उमेद'चे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, मुख्य परिचालन अधिकारी निखिलकुमार ओसवाल उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याप्रसंगी बोलताना म्हणाले की, ग्रामीण भागातील महिलांच्या हाताला काम आणि त्यांच्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी 'महालक्ष्मी सरस' आणि 'उमेद मार्ट' हे एक क्रांतीकारक पाऊल ठरत आहे.

ग्रामीण महिलांच्या संघर्षाला आणि यशाला अधोरेखित करणाऱ्या 'सरस महालक्ष्मी' या पुस्तिकेचे प्रकाशन आणि १००० पेक्षा जास्त उत्पादनांचे डिजिटल लोकार्पण करण्यात आले. 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताच्या सुरांनी वातावरणात चैतन्यमय ऊर्जा निर्माण झाले.



# श्री श्रीनिवासा कल्याण महोत्सव भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२ मे-**

श्रीकृष्ण रायरा मठातर्फे आयोजित करण्यात आलेला सोलापुरातील पहिलाच श्री श्रीनिवासा कल्याण महोत्सव अपूर्व उत्साहात आणि भक्तीयुक्त वातावरणात संपन्न झाला.

भगवान वेंकटेशाचा हा विवाह सोहळा पाहण्यास सोलापूरचे हजारो भाविक उपस्थित होते. यावेळी करण्यात आलेली व्यासपीठाची सजावट आणि अतिशय कलात्मकतेने सजवलेली व्यंकटेशाची प्रतिमा मनमोहक होती. ही सारी आरास पाहून भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

पहाटे पाच वाजल्यापासून श्री श्री मुष्णम राघवेंद्र आचार्य आणि त्यांच्या सहकार्यांनी विवाहाचे सर्व विधी यथास्थितपणे पार पाडले. दुपारी अकरा वाजता कल्याण महोत्सव आणि बारा वाजता अक्षता, मंगलसूत्र परिधान, कन्यादान आणि महापूजा असा समारंभ झाला तेव्हा सोलापूर शहरातील मान्यवर आणि भक्त हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

सोलापुरात प्रथमच असा अपूर्व सोहळा अनुभवण्यास मिळाला अशी प्रतिक्रिया भक्त भाविकांनी व्यक्त केली. महाप्रसादानंतर या कार्यक्रम ाचा पूर्वार्ध पार पडला.

दुपारच्या सत्रात अर्चना तुलसी, भजन, माला धारण इत्यादी कार्यक्रम पार पडले. श्री नंदकिशोर रामकिसन धूत (एन आर धूत ग्रुप) आणि डॉक्टर सूर्यप्रकाश कोठे यांच्यासोबतच लक्ष्मण करली तसेच करली परिवार यांनी या कल्याण महोत्सवाच्या यजम ानपदाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.

खा.ज्योती वाघमारे, महापौर विनायक कोंड्याल, विरोधी पक्ष नेते चैतन नरोटे, नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, सामाजिक कार्यकर्ते कुमार करजगी, ब्रिजमोहन फोफलिया, डॉ. सूर्यप्रकाश कोठे,, पुरुषोत्तम उडता, डॉ. राजेंद्र गाजूल, डॉ. बस्वराज कोलूर, गौतमचंद संचेती, श्रीनिवास चिलका, व्यंकटेश चिलका आदींनी भेट देऊन दर्शन घेतले. महोत्सव यशस्वी करण्यासाठी उत्सव अध्यक्ष शिवशंकर अंजनाळकर, उपाध्यक्ष नरेश बोल्लू, कार्याध्यक्ष हरिदास बुरा, खजिनदार लक्ष्मण करली, कार्याध्यक्ष मंदार कुलकर्णी यांनी परिश्रम घेतले. ज्येष्ठ पत्रकार अरविंद जोशी आणि अँकर अर्चना बुरा यांनी सूत्रसंचालन केले.

### तीन लाख आण म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर :** नवीन घर बांधल्याचे कर्ज फेडण्यासाठी तुझे दागिने दे अन्यथा माहेरून तीन लाख रुपये आण म्हणून विवाहितेचा सासरी शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह तीन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ब्रम्हदेव - पति, दिलीप - सासरे आणि सुनिता सासु (रा. गणेश नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत प्रिया ब्रम्हदेव माने (वय २६ वर्षे, रा. देशमुख पाटील वस्ती, सोलापूर) यारी फिर्याद दिली आहे. आई वडीलांकडुन ३ लाख रुपये घेवून ये म्हणून मानसिक, शारीरीक त्रास देवून हाताने लाथाबुकयाने मारहाण करुन जाचहाट केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार गौडनवरु हे तपास करीत आहेत.

### आयपीएल फॅन पार्क





**सोलापूर : नेहरुनगर शासकीय मैदानावर आयपीएल फॅन पार्कमध्ये शनिवारी मोठया स्क्रीनवर मुंबई इंडियन्स विरुध्द चेन्नई सुपर किंग या सामन्याचा आनंद लुटताना सोलापूरचे प्रेक्षक. दुसऱ्या छायाचित्रात प्रेक्षकांमधून काढण्यात आलेल्या लकी ड्रॉ विजेत्यास टी-शर्ट देताना सोलापूरची कन्या, आंतरराष्ट्रीय दिव्यांग महिला क्रिकेटपटू गंगा कदम व रणजीपटू रोहित जाधव. (छायाचित्र:केवल तिवारी)**







हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. ● मुख्य संपादक : प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. E-mail starunbharatgmail.com. ● Websate:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by DILIP SHIVMURTI DULANGE Printed at SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.Publised at TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |RNI No. MAHMAR/2023/86468
● CHIEF GROUP EDITOR : DILIP YASHWANT PETHE ● CHIEF EDITOR : PRASHANT VASANTRAO MANE

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कुर्डूवाडी-बीड एसटी सेवा पुन्हा सुरू; प्रवाशांना मोठा दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२ मे -**

कोरोना काळापासून बंद असलेली कुर्डूवाडी-बीड एसटी बस सेवा अखेर ३० एप्रिलपासून पुन्हा सुरू करण्यात आली आहे. या मार्गावर बस सुरू झाल्याने प्रवासी, व्यापारी व भाविकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

ही बस कुर्डूवाडी-परांडा-सोनारी-अनाळा-अंभी-पाथरूड-ईट पारगाव-चौसाळा-मांजरसुंबा मार्गे बीडपर्यंत धावणार आहे. कुर्डूवाडीहून सकाळी ८.३० वाजता सुटणारी बस ईट येथे सुमारे १०.४५ वाजता पोहोचेल, तर बीडहून दुपारी १ वाजता सुटून ईट येथे दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास येईल. विशेष म्हणजे ही बस पुढे पंढरपूरपर्यंत धावणार असल्याने भाविकांना थेट प्रवासाची सुविधा मिळणार आहे. या सेवेच्या पुनरारंभामुळे ग्रामीण भागातील वाहतूक, धार्मिक पर्यटन आणि स्थानिक व्यापाराला चालना मिळणार असून पाथरूड येथील खवा व्यापार व सोनारी येथील भैरवनाथ देवस्थानाला जाणाऱ्या भाविकांचीही मोठी सोय झाली आहे.

दरम्यान, ईट येथे बस आगमनानंतर प्रवासी संघटना व ग्रामस्थांनी एसटीचे स्वागत करत चालक-वाहकांचा शाल, फेटा व श्रीफळ देऊन सत्कार केला. यावेळी अशोक लहाने, सचिन टिळेकर, सुरेश टिळेकर, शकील तांबोळी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### MPSC परीक्षेत राज्यात प्रथम; प्रणव जाधव यांचा सत्कार

**इटकळ, दि.२ मे -**

तुळजापूर तालुक्यातील देवसिंगा तुळ येथील प्रणव नरसिंग जाधव यांनी MPSC परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल इटकळ ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने शाल, पुष्पहार व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. प्रणव जाधव यांची सहाय्यक नगर रचनाकार (श्रेणी-१) राजपत्रित अधिकारी म्हणून निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही योग्य नियोजन व मेहनतीच्या जोरावर मोठे यश मिळवू शकते, हे त्यांनी सिद्ध केले. यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक अशोक जाधव, पत्रकार दिनेश सलगरे, अभय जाधव व मित्रपरिवार उपस्थित होते.



### वाशी येथे भाजपाचे महा प्रशिक्षण अभियान संपन्न

**वाशी, दि.२ मे -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने दि. १ मे रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय महा प्रशिक्षण अभियानाचे आयोजन करण्यात आले. येथील अन्नपूर्णा मंगल कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित करताना पक्ष संघटन बळकट करण्यासाठी तळागाळात सक्रिय राहण्याचे आवाहन केले. तसेच पक्षाचे ध्येय-धोरण प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी पार पाडावी, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास तालुकाध्यक्ष राजगुरू कुकडे, नेते सुरेश कवडे, दत्ताभाऊ राजमाने, शिवाजी गिड्डे यांच्यासह पदाधिकारी, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या व कार्यकर्ते उपस्थित होते.



### श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**धाराशिव, दि.२ मे -**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये ६७ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तर केशव पाटील यांनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. गणित व विज्ञान ऑलिम्पियाड, नीट-जेईई तसेच एनएमएमएस परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त शिक्षक आर.पी. पवार व संग्राम पाटील यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक यशवंत इंगळे यांच्यासह शिक्षक, सेवानिवृत्त शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूर्यकांत पाटील व जयमाला शिंदे यांनी केले, तर आभार संतोष घार्गे यांनी मानले.

### ईश्वर क्षीरसागर यांना 'आदर्श मुख्याध्यापक' पुरस्कार

**मंगरूळ, दि.२ मे -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरुळ येथील संत गाडगे बाबा आश्रम शाळेचे मुख्याध्यापक ईश्वर क्षीरसागर यांना बी द चेंज फाउंडेशन, शिर्डी यांचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर झाला आहे.



गुरुवार, ७ जून रोजी विविध मंत्री व शिक्षणतज्ज्ञांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. क्षीरसागर यांनी आश्रम शाळेत अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना यशस्वी बनविण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबवलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची दखल घेऊन हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या निवडीबद्दल मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, शाहू शिक्षण संस्था पंढरपूरच्या संस्थापिका कोमलताई साळुंखे (ढोबळे) तसेच जिल्ह्यातील शिक्षणप्रेमींनी क्षीरसागर यांचे अभिनंदन केले आहे.

## महाराष्ट्र दिनानिमित्त धाराशिवमध्ये विकासाचा नवा अध्याय...

# डिजिटल परिवर्तनामुळे सेवा अधिक सुलभ : पालकमंत्री सरनाईक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ मे -**

महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात विकास, डिजिटल परिवर्तन, उद्योगवाढ, आरोग्य सुविधा आणि लोककल्याणकारी योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे प्रगतीचा नवा अध्याय सुरू झाला आहे. शासनाच्या विविध योजनांमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुलभ, सुरक्षित आणि सन्मानपूर्ण बनत असून 'समृद्ध, सक्षम आणि आत्मनिर्भर महाराष्ट्र' घडविण्याच्या दिशेने जिल्हा वेगाने वाटचाल करत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात ६७ व्या महाराष्ट्र राज्य स्थापना दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण केल्यानंतर ते उपस्थितांना संबोधित करत होते. यावेळी स्वातंत्र्यसैनिक भास्करराव नायगावकर, बुबा साहेब जाधव, श्रीमती कलावती उमरे, श्रीमती भागीरथी कुकडे, भागीरथी गुरव, जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना पाटील, उपाध्यक्षा उषा गायकवाड, महिला व बालकल्याण समिती सभापती पूजा शिंदे, माजी आमदार ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर, पोलिस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश काळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात 'डिस्ट्रिक्ट डॅशबोर्ड', 'कल्पवृक्ष स्मार्ट जीआर', 'जीवनरेखा' आणि 'तुळजाई चॅटबॉट' यांसारख्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे जमिनीचे दाखले, प्रमाणपत्रे, तक्रार निवारण आणि शासकीय योजनांचा लाभ अधिक सुलभतेने मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे वेळ, श्रम आणि खर्चात मोठी बचत होत आहे.

औद्योगिक क्षेत्रात जिल्हा उद्योग केंद्रामार्फत गुंतवणूक वाढत असून हजारो रोजगार निर्माण होत आहेत. विविध औद्योगिक क्लस्टर प्रकल्पांमुळे 'आत्मनिर्भर धाराशिव' संकल्पनेला बळ मिळत आहे.

वाहतूक क्षेत्रातही राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून बदल घडत असून नव्या बसगाड्यांमुळे ग्रामीण व शहरी भागात सुरक्षित व सुलभ प्रवास सुविधा उपलब्ध झाली आहे.

लवकरच 'राजमाता जिजाऊ' बससेवा सुरू होणार असून इलेक्ट्रिक बससाठी चार्जिंग स्टेशन उभारणीचे काम सुरू आहे. 'आपली एसटी' मोबाईल ॲपमुळे प्रवाशांना बससेवेची माहिती सहज मिळत आहे. आरोग्य क्षेत्रात आधुनिक



रुग्णालये, आयसीयू, एमआरआय, डायलिसिस सुविधा उपलब्ध होत असून आरोग्य सेवा आपल्या दारी ही संकल्पना साकार होत आहे. प्रधानमंत्री आवास योजना, शिवभोजन योजना, उज्ज्वला गॅस योजना, मनरेगा आणि जल जीवन मिशनसारख्या योजनांमुळे सर्वसामान्यांचे जीवन अधिक सुरक्षित व सन्मानपूर्ण झाले आहे.

कृषी क्षेत्रात सिंचन, पीकविमा, तंत्रज्ञानाधारित शेती व नैसर्गिक शेती उपक्रमांमुळे शेती अधिक सक्षम होत आहे.

डिजिटल तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कृषी क्षेत्रातही सकारात्मक बदल होत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. पोलिस पथकाने राष्ट्रगान व राज्यगीत सादर करून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. तसेच शहीद स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.

यावेळी कळंब तालुक्यातील शिराढोण येथील ग्राम महसूल अधिकारी विनोद चुकेवाड यांना 'आदर्श ग्राम महसूल अधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन हणमंत पडवळ यांनी केले.

## उत्तरेश्वर मंदिरावर विजेची तार तुटून पडली; मोठा अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ मे -**

येथील व्यासनगर परिसरातील राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या श्री उत्तरेश्वर महादेव मंदिरावरून गेलेल्या विजेच्या मुख्य लाईनची तार पहाटे तुटून मंदिरावर कोसळल्याची घटना घडली. सुदैवाने ही घटना पहाटेच्या वेळी घडल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, दि.१ मे रोजी पहाटे सुमारे ४.३० वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. त्या वेळी मंदिरात भाविकांची वर्दळ नव्हती तसेच परिसरातील रस्त्यावरही फारशी ये-जा नव्हती.

मात्र हीच घटना सकाळी किंवा सायंकाळी घडली असती, तर गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता होती.

व्यासनगर परिसरातील या मंदिरावरून अगदी जवळून विजेच्या मुख्य लाईनच्या तारा जात असून, याबाबत अनेक वेळा तक्रारी करण्यात आल्याचे मंदिराचे प्रमुख अमर भाळे यांनी सांगितले.

संबंधित वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे या तारा स्थलांतरित करणे किंवा भुयारी केबल टाकण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही त्यांनी केला.

या मंदिरात नेहमीच भाविकांची गर्दी असते. तसेच मंदिरालगतचा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीनेही महत्त्वाचा असल्याने येथे सतत वर्दळ असते. त्यामुळे भविष्यात अशा प्रकारची घटना टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

निदान आता तरी वीज वितरण कंपनीने तत्काळ दखल घेऊन मंदिरावरून गेलेल्या मुख्य लाईनच्या तारा भुयारी कराव्यात किंवा अन्य सुरक्षित मार्गाने स्थलांतरित कराव्यात, अशी मागणी अमर भाळे यांनी केली आहे.

## तुळजापूर-लोहारा एसटी सेवा बंद; प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२ मे -**

तुळजापूर-तोरंबा-उंडरगाव-मार्डी मार्गे लोहारा धावणारी एसटी बस सेवा अचानक बंद झाल्याने प्रवासी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सुरू करण्यात आलेली ही सेवा निवडणुका संपताच ठप्प झाल्याने प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत नियमित धावणारी ही बस प्रवाशांसाठी मोठा दिलासा ठरत होती. मात्र, काही दिवसांपासून बस अनियमित होत गेली आणि गेल्या आठ दिवसांपासून पूर्णपणे बंद असल्याने विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व सर्वसामान्यांना मोठा फटका बसत आहे.

ही सेवा केवळ निवडणुकीपुरतीच होती का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, प्रशासनाने तात्काळ ही बस सेवा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी होत आहे.



## परंड्यात भगवान गौतम बुद्ध जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ मे -**

दि. १ मे रोजी भीम प्रतिष्ठानच्या वतीने मंडई पेठ, भीमनगर रेवणी येथे तथागत भगवान गौतम बुद्ध यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

नगराध्यक्ष जाकिरभाई सौदागर यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेचे दीप, धूप व पुष्प अर्पण करून पूजन करण्यात आले. यावेळी भीम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना नगरसेवक रत्नकांत शिंदे, माजी नगरसेवक इरफान शेख, सामाजिक कार्यकर्ते तानाजी शिंदे, आप्पासाहेब बनसोडे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा नेते मोहन बनसोडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास भिमनगर येथील बुद्ध उपासक-उपासिका उपस्थित होते.

## गिरवली येथे सुसज्ज आरोग्य उपकेंद्राचे लोकार्पण; ग्रामीण आरोग्य सेवेला नवी दिशा

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२ मे -**

ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था ही जनसामान्यांच्या जीवनाचा खरा आधारवड मानली जाते. याच उद्देशातून गिरवली (ता. भूम, जि. धाराशिव) येथील आरोग्य उपकेंद्राच्या नूतन व सुसज्ज इमारतीचा लोकार्पण सोहळा उत्साहात पार पडला. धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी ऑनलाइन पद्धतीने या इमारतीचे लोकार्पण करून ती गिरवलीकरांच्या सेवेत समर्पित केली.

सध्याच्या काळाची गरज लक्षात घेऊन उभारण्यात आलेल्या या आधुनिक इमारतीमुळे गावातील आरोग्य सेवेला नवी चालना मिळणार आहे. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचवणे हे आमचे ध्येय असून, गिरवलीचे हे उपकेंद्र आरोग्याची नवी पहाट ठरेल, असा




विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या शुभांगी सुनील देशमुख, पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे तसेच गिरवलीचे सरपंच संजय मोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या हस्ते इमारतीच्या नामफलकाचे अनावरण करण्यात आले.

यावेळी ईट प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी पन्हाळे, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सूरज मोटे, तसेच अक्षय मोटे, सौरभ देशमुख, रत्नदीप मोटे, उपकेंद्राचे कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या अनेक दिवसांपासून गिरवलीकर या इमारतीची आतुरतेने वाट पाहत होते.

भव्य वास्तू आणि आधुनिक सोयी-सुविधांमुळे आता लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांना तातडीचे उपचार गावातच उपलब्ध होणार आहेत. या उपकेंद्रामुळे गावाच्या आरोग्य सुरक्षेत मोठी भर पडली असून, ग्रामस्थांकडून प्रशासन व लोकप्रतिनिधींचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## धाराशिव पोलीस दलात अत्याधुनिक वाहनांची भर; महाराष्ट्र दिनी लोकार्पण



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ मे -**

जिल्ह्यातील पोलीस दलाची कार्यक्षमता व आपत्कालीन प्रतिसाद अधिक सक्षम करण्यासाठी नव्या अत्याधुनिक वाहनांचा समावेश करण्यात आला. महाराष्ट्र दिनानिमित्त पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते पोलिस अधीक्षक कार्यालयात या वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत ५ स्कॉर्पिओ क्लासिक, ६ बोलेरो निओ, १४ बोलेरो (डायल ११२) तसेच १ अशोक लेलँड ट्रक अशी वाहने पोलीस दलात दाखल झाली आहेत. यामुळे पायलटिंग, बंदोबस्त, आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्कालीन सेवांमध्ये वेग व कार्यक्षमता वाढणार आहे.

नव्या वाहनांमुळे घटनास्थळी त्वरित पोहोचणे, नागरिकांना जलद मदत करणे आणि कायदा-सुव्यवस्था राखणे अधिक प्रभावी होणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील पोलीस यंत्रणा यामुळे अधिक बळकट होणार असल्याचा विश्वास व्यक्त होत आहे.

यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियंवदा महाडदाळकर, पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना आदी उपस्थित होते.

## रुईभर येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**रूईभर, दि.२ मे -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सहशिक्षक व्यंकट पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तसेच मान्यवरांच्या हस्ते मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारकाला पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमात इयत्ता ९ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून निकालपत्रकांचे वितरण करण्यात आले.

कामगार दिनानिमित्त सिद्धिविनायक मंदिराच्या बांधकामात योगदान देणाऱ्या पद्माकर ढवळे, लक्ष्मण कांबळे व नागनाथ (तात्या) कस्पटे यांचा सन्मान करण्यात आला.

माजी जि.प. सदस्य रामदास कोळगे यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व व राज्य निर्मितीचा इतिहास विशद करत वृक्षलागवडीचे आवाहन केले. प्राचार्य जयप्रकाश कोळगे यांनीही महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रत्येकाने योगदान देण्याचे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास सुभाषदादा कोळगे, राजनारायण कोळगे, शिवकन्या साळुंके, संतोष कपाळे, नानासाहेब शेलार, काकासाहेब डोंगरे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन कांबळे यांनी, तर आभार अभिजीत घोळवे यांनी मानले.

## संक्षिप्त...

## महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर दि. २ मे :** येथील औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेच्या प्रारंगणात महाराष्ट्र राज्य स्थापनेचा वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे चेअरमन शिवकुमार ऊस्तुर्गे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला.
याप्रसंगी संस्थेचे संचालक सुरेश हाके, रोहिदास मद्रेवार, अब्दुलकरीम शेख, संजीव कुमार मारापल्ले, महेश जानकर, रमेश वाघमारे, प्रकाश तेलंग व संस्थेचे सभासद रामराव वाघमारे, हनुमंत जानकर,संग्राम बलोरे,अभिमन्यू धोंडगे,राजेश्र्वर वाघमारे तसेच सचिन मुरडे,सविता बिरादार, किशोर महालिंगे, संस्थेचे व्यवस्थापक पद्माकरराव जोशी कर्मचारी किशोर बुरसे, राजेंद्र गोलावार, शेषेराव साळी आदी उपस्थित होते.संस्थेचे चेअरमन शिवकुमार उस्तुर्गे व व्हाईस चेअरमन
हेमलता गुणाले यांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वर्धापन दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.व शिवकुमार उस्तुर्गे यांनी ध्वजारोहण करून महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

## तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी




उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. एम. एन. धनाश्री यांनी तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, दिनविशेष समितीचे प्रमुख डॉ. एम. एस. खांडेकर तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## रोजगार मेळाव्यात ६६ उमेदवारांची नामांकित कंपनीत निवड




**तभा वृत्तसेवा**
**देवणी दि. २ मे :** जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र लातूर मॉडेल करिअर सेंटर लातूर व कै. रसिका महाविद्यालय देवणी व गुंडप्पा धनुरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी रसिका महाविद्यालय देवणी या ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जनसेवा सेवाभावी प्रतिष्ठान अध्यक्ष गोविंदरावजी भोपनीकर हे होते.प्रमुख मार्गदर्शक म्हणून निशांत सूर्यवंशी (सहाय्यक आयुक्त, रोजगार व कौशल्य विकास केंद्र लातूर), सोमनाथ वाडकर (तहसीलदार, देवणी) यांची उपस्थिती होती.
त्यावेळी टोयोटा किर्लोस्कर कंपनी, महिंद्रा अँड महिंद्रा, जाहीराबाद, पेटीएम लातूर, प्रभा इंजिनियर्स लातूर, पद्मजा मोटर्स लातूर या कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. अनिल इंगोले यांनी केले तर अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिवाजी सोनटक्के यांनी केले. आभार डॉ. गोपाल सोमाणी यांनी व्यक्त केले. या रोजगार मेळाव्यासाठी ८४ विद्यार्थी उपस्थित होते यापैकी ६६ विद्यार्थ्यांची विविध कंपन्यात निवड करण्यात आली.
या रोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्लेसमेंट सेलचे डॉ. योगेश मुळे सोबतच कौशल्य व रोजगार विभागातर्फे प्रवीण वाघमारे, दत्तात्रय कांबळे इ. उपस्थित होते.

### शेतातील साहित्य चोरीस; गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
लातूर दि. २ मे : जळकोट पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कुणकी शेतशिवारातून शेतामधील औजारे तसेच शेतीमाल अ एकूण ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची घटना २६ एप्रिल रोजी घडली. याबाबत दत्तात्रय नळगे (रा. कुणकी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जळकोट पोलिसात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# जनगणना २०२७ च्या मोहीमे अंतर्गत स्व-गणनेला प्रारंभ राष्ट्रीय उपक्रमात नागरिकांनी सक्रीय सहभाग नोंदवा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा दि.२ मे :** भारत सरकारच्या जनगणना - २०२७ मोहिमे अंतर्गत निलंगा शहरात १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व- गणनेची प्रक्रीया राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने दिनांक ०१ मे रोजी निलंगा नगर परिषद कार्यालयात महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६६ वा वर्धानपन दिन निमित्ताने राष्ट्रीय ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. तदनंतर भारत सरकारच्या जनगणना - २०२७ मोहिमे अंतर्गत निलंगा शहरात होणाऱ्या १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत स्व-गणना उपक्रमाचे औपचारीकरित्या उदघाटन नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्या हस्ते करण्यात आले. स्व-गणना ही एक आधुनिक डिजीटल सुविधा आहे, ज्यामध्ये नागरिक प्रगणकाची वाट न पाहता स्वतः हून घरबसल्या अधिकृत पोर्टलद्वारे आपल्या कुटुंबाची माहिती नोंदवू शकतात. यामुळे वेळेची बचत होते आणि नागरिकांना स्वतःच्या सोईनुसार अचुक माहिती भरण्याचे स्वातंत्र्य मिळते. जिल्हा जणगणणा अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली निलंगा नगरपरिषद प्रशासनाने या मोहिमेची पूर्ण तयारी केली आहे.



नागरिकांनी हीींि://शि/लशपीीी.सीं.ळप या अधिकृत पोर्टलला भेट देवुन खालीलप्रमाणे नोंदणी करावी. नोंदणी करताना पोर्टलवर जावुन मोबाईल क्रमांक व ओटीपी लॉग इन करावे. माहिती भरताना कुटुंबाची व स्वतःची माहिती (भाषा, पत्ता व नकाशावरील स्थान) अचुक भरावे. माहिती भरुन फायनल सबमिट केल्यावर मिळणारा अकरा अंकी (एस ई आयडी) जपून ठेवावा. नंतर प्रगणक घरी आल्यानंतर त्यांना दाखवावा. जे नागरिक १ मे ते १५ मे या काळात स्व-गणना करुन शकणार नाहीत, त्यांच्यासाठी प्रशासनातर्फे दुसऱ्या टप्प्याची १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त केलेले प्रगणक शहरातील प्रत्येक घराला भेट देवुन माहिती संकलित करणार आहेत. ज्या नागरिकांनी स्व-गणना पूर्ण केली आहे, त्यांनी प्रगणक घरी आल्यानंतर त्यांना फक्त अकरा अंकी (एस ई आयडी) दाखवावा. यामुळे त्यांची प्रक्रीयाकाही सेकंदात पुर्ण होईल. शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी स्व-गणना सुविधेचा लाभ घ्यावा आणि त्यानंतर १६ मे पासून सुरु होणाऱ्या घर गणनेसाठी येणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करावे असे आवाहन निलंगा नगर परिषदचे मुख्याधिकारी तथा चार्ज अधिकारी संतोष लोमटे यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष हलगरकर, उपनगराध्यक्ष फुलारी, सर्व सन्माननीय सभापती, नगरसेवक, न.प. कर्मचारी व शहरातील प्रतिष्ठीत नागरिक उपस्थित होते.

## अपघात रोखण्यासाठी डेमो द्वारे जनजागृती, पोलिसांचा उपक्रम




**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर दि. २ मे :** राष्ट्रीय महामार्गावर सुसाट वेगाने धावणाऱ्या वाहनांना लगाम घालण्यासाठी आणि प्रवाशांच्या मनावर रस्ते सुरक्षेचे गांभीर्य बिंबवण्यासाठी अहमदपूर पोलिसांनी एक आगळावेगळा प्रयोग राबवला आहे. ही केवळ एक अपघातग्रस्त कार नाही, तर एका चुकीचा परिणाम आहे अशा आशयाचा फलक लावून, महामार्गाच्या मधोमध प्रत्यक्ष अपघातग्रस्त कारचा सांगाडा उभा करण्यात आला आहे. पोलिसांच्या या बोलक्या उपक्रमाने वाहनधारकांचे लक्ष वेधून घेतले आहे.
अहमदपूर-नांदेड रोडवरील मरशिवनी फाट्याजवळ असलेल्या साई पेट्रोलियम पंपासमोर हा 'डेमो' तयार करण्यात आला आहे. एका लोखंडी स्टॅन्डवर भीषण अपघातात चक्काचूर झालेली कार ठेवून, त्याद्वारे वेगावर नियंत्रण ठेवण्याचा संदेश दिला जात आहे. महामार्गावरून येणारे-जाणारे चालक जेव्हा ही कार पाहतात, तेव्हा त्यांना वेगाच्या अतिरेकाचा काय परिणाम होऊ शकतो.
या ठिकाणी लावण्यात आलेल्या फलकांवरून पोलिसांनी अत्यंत महत्त्वाचे संदेश दिले आहेत .

## विमा कंपन्यांच्या मनमानी विरोधात आ.बनसोडे यांचा एल्गार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट दि. २ मे :** उदगीर जळकोट मतदारसंघात खरीप २०२५ मधील अतिवृष्टीने कंबरडे मोडलेल्या शेतकऱ्यांना विमा कंपन्यांकडून मिळणारी तुटपुंजी मदत म्हणजे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. हा अन्याय सहन केला जाणार नाही, अशी ठाम भूमिका घेत आमदार संजय बनसोडे यांनी राज्याच्या कृषी मंत्र्यांना विशेष बैठकीचे साकडे घातले आहे. मतदारसंघातील लाखो शेतकऱ्यांच्या हक्काचा पीक विमा पदरात पाडून घेण्यासाठी आमदार बनसोडे यांनी प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर पाठपुरावा तीव्र केला आहे. .आता शेतकऱ्याचे डोळे आमदार संजय बनसोडे यांच्याकडे लागले आहेत .



अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झाले होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत हेक्टरी १७ हजार रुपयांची मदत व पीक विमा देण्याच्या घोषणा झाल्या होत्या. मात्र, प्रत्यक्षात विमा कंपन्यांनी 'पीक कापणी प्रयोगा'चा (ऊीिं र्ऊीींळपस एुशीळाशपीं) आधार घेत शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत.

> **शेतकऱ्यांनी घाम गाळून पिकवलेले पीक डोळ्यादेखत गेले आहे. विमा कंपन्यांनी तांत्रिक कारणांचा आधार घेऊन शेतकऱ्यांची अडवणूक करणे चुकीचे आहे.**
> **माझ्या मतदार संघातील सर्व शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत मी स्वस्थ बसणार नाही.**
> **आमदार संजय बनसोडे,**
> **(उदगीर-जळकोट विधानसभा मतदारसंघ)**

कृषी मंत्र्यांनी तातडीने वेळ देऊन या विषयावर विशेष बैठक बोलवावी, विमा कंपन्यांच्या निकषांची फेरतपासणी करून जास्तीत जास्त विमा मंजूर करावा, व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यावर तात्काळ मदतीची रक्कम जमा करावी. अशी आग्रही भूमिका आमदार संजय बनसोडे यांनी घेतली आहे.
२०२५ च्या खरीप हंगामात उदगीर तालुक्यातील ४९,०६३ हेक्टर क्षेत्र आणि जळकोट तालुक्यातील २२,७४१ हेक्टर क्षेत्र बाधित होते. दोन्ही तालुक्यात सोयाबीन, तूर, मूग, उडीद आणि कापूस या पिकांचे

## म. गांधी महाविद्यालयाची उज्ज्वल यशाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर दि. २ मे :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२६ चा निकाल आज जाहीर झाला असून, येथील महात्मा गांधी महाविद्यालयाने आपली उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९५.१२ टक्के लागला असून ०२ विद्यार्थी विशेष प्राविण्य व २४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेत महाविद्यालयातून महेश ओमप्रकाश सावरगावे ही ८३.३३ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, कु. साक्षी राजेंद्र सोनकांबळे ही ७५.८३ टक्के गुण घेऊन सर्व द्वितीय, आशिष प्रकाश लोखंडे हा ७३.०० टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आला आहे आणि ७०.०० टक्के पेक्षा जास्त ०४ विद्यार्थी आहेत.
कला शाखेचा निकाल ८०.३९ टक्के लागला असून ०१ विद्यार्थी विशेष प्राविण्य व १३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत कला शाखेत कु. नंदिनी धुराजी चिलकरवार ही ७८.१७ टक्के गुण घेऊन सर्वप्रथम, श्रीनिवास दिगांबर गुट्टे ही ७३.५० टक्के गुण घेऊन सर्व द्वितीय व कु. मनिषा शिवशंकर कच्छवे ही ७३.०० टक्के गुण घेऊन सर्व तृतीय आली आहे.
वाणिज्य शाखेचा निकाल ६८.१३ टक्के लागला असून ८०.०० टक्केच्यावर ०६ विद्यार्थी आहेत. ०९ विद्यार्थी विशेष प्राविण्य व १८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

## कलापंढरी संस्थेच्यावतीने तालुका स्तरीय अभ्यास सहल

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर दि.२ मे :** बालकांना बाल संरक्षण यंत्रणाची माहिती व्हावी तसेच पोलीस स्टेशन मध्ये चालणारी प्रक्रिया आणि गटसाधन केंद्राच्या माध्यमातून चालणारी शैक्षणिक प्रक्रिया या विषयाची माहिती व्हावी म्हणून कलापंढरी सामाजीक संस्थेच्या वतीने बालकांची तालूका स्तरीय अभ्यास सहलीचे आयोजन दिनांक २९ एप्रिल रोजी संस्थेचे अध्यक्ष बी पी सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली रेणापूर येथे करण्यात आले होते.




रेणापूर तालुक्यातील पानगाव येथील कलापंढरी सामाजीक संस्था गेल्या ४१ वर्षापासून बी पी सुर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली बालकांच्या प्रश्नावर काम करत आहे.बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा, बालसंरक्षण यंत्रणा बालकांना समजल्या पाहीजेत म्हणून तसेच त्यांना पोलीस स्टेशनमध्ये चालणारी प्रक्रिया या विषयाची माहिती व्हावी तसेच तालूक्याच्या गटसाधन केंद्रातून चालणाऱ्या प्रक्रियेची माहीती व्हावी म्हणून कला पंढरी संस्थेच्या वतीने दिनांक २९ एप्रिल रोजी रेणापूर येथे रेणापूर तालूक्यातील पानगाव , भंडारवाडी गोविंद नगर बिटरगाव,गरसुळीतांडा,बिटरगाव तांडा आदींसह अनेक गावांतील किशोर, किशोरी गटाच्या बालकांची अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते.तर सर्व प्रथम रेणापूर येथील पोलीस ठाण्यात चालणाऱ्या प्रक्रीयेची माहीती पोलीस निरीक्षक सुधाकर देडे यांनी दिली असून बालका विषयी असलेले संरक्षणाचे कायदे विशेषतः पोक्सो कायद्याची माहीती सविस्तर दिली तसेच बालकांनी अन्याय अत्याचाराला तात्काळ विरोध करुन ११२ या टोल फ्रि क्रमांकावर फोन करुन कळवावे.तसेच दिवसभरात घडलेल्या घटना आपल्या आईसोबत शेअर कराव्यात मुलींनी आई सोबत मैत्री करावी आशी माहीती दिली.या नंतर गटसाधन केंद्राला भेट देऊन या ठिकाणी चालणाऱ्या शिक्षण व्यवस्थेत बाबत संपुर्ण माहिती शिक्षण विस्तार अधिकारी देशपांडे आणि खंदाडे यांनी दिली.
अभ्यास सहलीच्या यशस्वीतेसाठी धनराज पवार,मधुकर गालफाडे, भास्कर राजपेटे, सुप्रिया रामदासी,पुजा रोकडे आदींनी परीश्रम घेतले.

## ग्रामगीता मानवी जीवनाचा आदर्श मानदंड : प्राचार्य मांजरे



तभा वृत्तसेवा
उदगीर दि.२ मे : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची ११७ वी जयंती छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र- प्राचार्य डॉ. आर. एम. मांजरे होते. तर विचार मंचावर प्रबंधक बी. के.पाटील व दिलीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रथम संत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.
यावेळी त्यांच्या विचार कार्यावर प्रकाश टाकताना डॉ.मांजरे म्हणाले की माणिक बंडोजी इंगळे उर्फ ठाकूर म्हणून जन्माला आलेले २० व्या शतकातील ते एक महाराष्ट्रातील थोर समाज सुधारक, कवी आणि राष्ट्रसंत होते. त्यांनी लिहिलेली ग्रामगीता हे त्यांचे अलौकिक स्वरूपाचे साहित्य विषयक कार्य होते. ज्याद्वारे त्यांनी समाजाला ग्रामविकासाचा व राष्ट्रवादाचा संदेश दिला.
अंधश्रद्धा निर्मूलन, जातीभेद दूर करणे, ग्राम खच्छता आणि सामाजिक जागृतीसाठी भजनांचा व कीर्तनांचा प्रभावी वापर केला.अमरावती जिल्हयातील मोझरी या गावी गुरुकुंज आश्रमाची स्थापना करून अध्यात्मिक कार्य लोकांपर्यंत पोहचवले असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.
या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन जयंती समिती प्रमुख तथा मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. सुरेश शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहसंयोजक प्रा. डॉ .डी.बी. मुळे यांनी केले. या कार्यक्रमाला प्राध्यापक, व शिक्षकेतर कर्मचारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्यासाठी कौशल्य विकसन महत्त्वाचे : कुलगुरू डॉ. महाजन

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट दि. २ मे :** कौशल्य आणि रोजगार यांचे आजच्या काळातील महत्त्व अनन्य साधारण आहे. केवळ पदवी घेण्यापेक्षा पदवी बरोबर कौशल्य विकसित होणे ही गरजेचे आहे. प्रत्येकाने तांत्रिक कौशल्याबरोबरच सॉफ्ट कौशल्य हे विकसित करणे गरजेचे आहे कारण स्कील इज न्यू करन्सी हा विचार समाजासमोर निर्माण होत आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधी आज आपणांसमोर उपलब्ध आहेत. स्थानिक व जागतिक बाजारपेठेत त्यांची मागणी अधिकाधिक वाढलेली आहे.



त्यामुळे उद्योजकतेच्या संधी आपणाला स्वीकारता आल्या पाहिजेत व त्याचे सोने ही करता आले पाहिजे. कौशल्य विकासासाठी सरकारच्या विविध योजना अस्तित्वात आहेत. कौशल्य भारत, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ह्या योजनांचा लाभ घेणे गरजेचे आहे. स्वतःमध्ये प्रचंड आत्मविश्र्वास बाळगून त्यामध्ये सातत्य ठेवून नवीन कौशल्य शिकण्याची तयारी दर्शविणे आणि बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळून घेण्यासाठी कौशल्य विकसन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे प्र कुलगुरू डॉ अशोक महाजन यांनी यांनी केले . ते आपल्या धावत्या व सदिच्छा भेटी दरम्यान जळकोट येथील महात्मा फुले महाविद्यालयांमध्ये जिल्हा रोजगार कौशल विकास व महात्मा फुले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा प्रसंगी बोलत होते.
यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून चंदन पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य चंद्रशेखर कळसे, व प्राचार्य आयाची हे उपस्थित होते. तर सहाय्यक आयुक्त निशांत सुर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना महाजन असे म्हणाले की उद्योग व शिक्षण यांचा समर्पक सेतू तयार करण्यासाठी कौशल्य हेच यशाचे खरे साधन आहे. त्यामुळे मेळाव्याच्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी फायदा घेण्याचे आवाहन केले.
कार्यक्रमाच्या प्रारंभी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य चंद्रशेखर कळसे, सहायक आयुक्त निशांत सुर्यवंशी, प्राचार्य आयाची यांचेही उपस्थितांकरीता मार्गदर्शने झाली.या मेळाव्याचे आयोजन निशांत सूर्यवंशी, सहायक आयुक्त, कौशल्य विकास व रोजगार, लातूर, यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ रोहित पवार- कौशल्य विकास अधिकारी, प्रवीण वाघमारे, नारायण साळुंखे, दत्तात्रय कांबळे, खंडू सूर्यवंशी, अजय इंगोले, गणेश सूर्यवंशी यांनी केले.

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालयासाठी मंजुरी द्या : आ. बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर दि.२ मे :** उदगीर येथे मार्च-२०२४ मध्ये नव्याने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय (ठढज) सुरू करण्यात आले असून या कार्यालयात पदनिर्मिती, स्वतंत्र इमारत बांधकाम आणि आवश्यक प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचेकडे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी केली आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असुन संबंधित विभागास तात्काळ कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आली असल्याची माहिती माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी बोलताना दिली आहे.




यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याशी मंत्रालय, मुंबई येथे माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.
या भेटीदरम्यान उदगीरसह परिसरातील नागरिकांना वाहन नोंदणी, परवाने, करसंकलन यांसारख्या कामांसाठी सध्या दूरच्या ठिकाणी जावे लागते, त्यामुळे स्थानिक पातळीवर उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अत्यंत आवश्यक आहे. वाढती लोकसंख्या व दिवसेंदिवस वाहनांची वाढती संख्या आणि त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी लक्षात घेता उदगीर येथे स्वतंत्र उपप्रादेशिक कार्यालय सुरू करण्यात आले आहे.
यावर परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, पदनिर्मिती प्रक्रिया, आवश्यक मनुष्यबळ उपलब्धता तसेच इमारत बांधकामाबाबत शासनस्तरावर लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले. संबंधित विभागाला आवश्यक त्या सूचना देऊन प्रस्तावाला गती देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.
या निर्णयामुळे उदगीर शहरासह परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, शासकीय सेवांचा लाभ स्थानिक पातळीवरच मिळणार आहे. तसेच यामुळे वेळ व खर्चाची बचत होऊन प्रशासन अधिक कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तेरखेड्यात वीजपुरवठ्याचा बोजवारा; नागरिक संतप्त

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२ मे -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा गावात वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला असून ग्रामस्थ अक्षरशः अंधारात दिवस काढत आहेत. मागील अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या समस्येकडे लोकप्रतिनिधी व प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

गावात वीज गेल्यानंतर सलग दोन-दोन दिवस वीजपुरवठा होत नसल्याची स्थिती निर्माण झाली असून ही बाब आता नित्याचीच झाली आहे. धाराशिव जिल्ह्यात व्यावसायिकदृष्ट्या पुढे असलेल्या तेरखेडा गावात अशी परिस्थिती निर्माण होणे प्रशासनासाठी चिंताजनक ठरत आहे.

सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढली असून तापमान ४५ अंशांपर्यंत पोहोचले आहे. अशा उकाड्यात वीज नसल्यामुळे लहान मुले, महिला व वृद्ध नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. घरात राहणे कठीण झाल्याने अनेकांना झाडाखाली आसरा घ्यावा लागत आहे.

महावितरणकडे वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी तातडीने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देऊन कायमस्वरूपी तोडगा काढावा, अन्यथा नागरिकांच्या संतापाचा उद्रेक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



## तुळजाभवानी मंदिरात रितेश-जेनेलिया देशमुख यांचे दर्शन

**तुळजापूर, दि.२ मे -**

अभिनेता रितेश देशमुख आणि जेनेलिया देशमुख यांनी 'राजा शिवाजी' चित्रपटाच्या निमित्ताने श्री तुळजाभवानी मंदिरात जाऊन देवीचे दर्शन घेतले. कुलस्वामिनी मानल्या जाणाऱ्या तुळजाभवानी देवीची त्यांनी विधीवत पूजा-अर्चा करून आरती केली. महाराष्ट्र दिनानिमित्त प्रदर्शित झालेल्या 'राजा शिवाजी' या ऐतिहासिक चित्रपटाचे दिग्दर्शन रितेश देशमुख यांनी केले असून निर्मिती जेनेलिया देशमुख यांनी केली आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाच्या यशासाठी तसेच देवीच्या आशीर्वादासाठी दांपत्याने प्रार्थना केली. त्यांच्या उपस्थितीमुळे मंदिर परिसरात भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



## हिप्परगा सय्यद येथे सिमेंट बंधाऱ्याचे भूमिपूजन

**लोहारा, दि.२ मे -**

लोहारा तालुक्यातील हिप्परगा सय्यद येथे दि. २ मे २०२६ रोजी द प्राइड इंडिया संचालित स्पर्श रुग्णालय व अजीम प्रेमजी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सिमेंट बंधारा बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. जलसंधारण व शाश्वत ग्रामीण विकासासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी वरिष्ठ प्रकल्प अधिकारी रमाकांत जोशी यांनी विविध विकासात्मक उपक्रमांची माहिती दिली, तर युवा नेते शरण बसवराज पाटील यांनी या कार्याचे कौतुक केले. मान्यवरांच्या हस्ते प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भूमिपूजन करण्यात आले. कार्यक्रमास विविध पदाधिकारी, ग्रामस्थ व शेतकरी उपस्थित होते.




## स्वामी विवेकानंद शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात

**उमरगा, दि.२ मे -**

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर व महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १/५/२६ रोजी महाराष्ट्र दिन,कामगार दिन व बुध्द पौर्णिमेनिमित्त मुख्याध्यापिका सविता लोहार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे कार्यवाह डॉ.कपिल महाजन सह संचालक, मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, संजय कोथळीकर, गोपाळ आष्टे सह दोन्ही शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. या वेळी दोन्ही शाळेतील सर्व मुलांना गुणपत्रकाचे वाटप करण्यात आले.

## एक लाख 'जलतारा' उभारणीचा संकल्प; धाराशिवमध्ये जलक्रांतीची नांदी

**तभा वृत्तसेवा / अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२ मे -**

पाणीटंचाईवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने धाराशिव जिल्ह्यात यंदा ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्हा प्रशासन, नाम फाऊंडेशन, विविध सामाजिक संस्था आणि लोकसहभागाच्या माध्यमातून एक लाख 'जलतारा' निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे शुभेच्छा देत पाठिंबा दर्शविला आहे.



जिल्ह्यातील सुमारे ५०० गावांमध्ये हे अभियान राबविण्यात येणार असून, प्रत्येक एकरी एक जलतारा ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावर नियोजन, स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य आणि शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग यावर भर दिला जात आहे. प्रशासनाकडून तांत्रिक मार्गदर्शन, आवश्यक साहित्य आणि मनुष्यबळाचीही उपलब्धता करून दिली जात आहे.

### काय आहे 'जलतारा' अभियान?

'जलतारा' म्हणजे शेतात किंवा मोकळ्या जागेत तयार करण्यात येणारी लहान जलसंधारण रचना. कमी खर्चात आणि सुलभ पद्धतीने उभारता येणाऱ्या या संरचनेमुळे मोठा परिणाम साधता येतो. पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरवते. भूजल पातळी वाढविण्यास मदत होते. शेतकऱ्यांना पाण्याचा स्थिर स्रोत उपलब्ध होतो. कमी खर्चात सोपी बांधणी शक्य पाणी अडवा, पाणी जिरवा संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी या अभियानामुळे धाराशिव जिल्ह्यात जलसंधारणासोबतच लोकसहभागातून जलक्रांती घडविण्याचा आदर्श मॉडेल निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या संदेशात पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरवण्याची गरज अधोरेखित करत, या अभियानामुळे पाणीसाठा वाढेल, भूजल पातळी उंचावेल आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारेल, असे सांगितले. त्यांनी नागरिक, शेतकरी आणि युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होण्याचे आवाहन केले.

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नाना पाटेकर आणि मकरंज अनासपुरे यांच्या नाम फाऊंडेशन चा विशेष पुढाकार आहे. दुष्काळग्रस्त भागात जलसंवर्धनासाठी त्यांनी यापूर्वीही उल्लेखनीय काम केले आहे. लोकप्रतिनिधी, अधिकारी, स्वयंसेवक आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

अल्पावधीत सर्वाधिक 'जलतारा' उभारण्याचा विक्रम प्रस्थापित करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस असून, यासाठी टप्प्याटप्प्याने काम सुरू करण्यात आले आहे. पावसाळ्यापूर्वी मोठ्या प्रमाणात जलतारा पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. यामुळे पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरवले जाईल, परिणामी भूजल पातळी वाढेल, विहिरी व बोअरवेल्सना पाणी उपलब्ध होईल आणि शेती उत्पादनातही वाढ होईल. भविष्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## कळंबमध्ये लोक जनशक्ती पार्टीकडून विविध मागण्यांचे निवेदन सादर

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२ मे -**


लोक जनशक्ती पार्टी, कळंबच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालय, कळंब येथे विविध प्रलंबित प्रश्नांबाबत निवेदन सादर करण्यात आले. जिल्हाध्यक्ष राजाभाऊ गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले की, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ योजनेचा लाभ गेल्या तीन-चार महिन्यांपासून लाभार्थ्यांना मिळालेला नाही. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वृद्ध नागरिक अडचणीत आले असून, थकीत अनुदान तात्काळ वितरित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच महात्मा फुले मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ आणि अण्णाभाऊ साठे मागासवर्गीय विकास महामंडळाकडील कर्ज प्रकरणे गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असल्याने ती लवकरात लवकर निकाली काढून लाभार्थ्यांना कर्ज वितरण करावे, अशी मागणी करण्यात आली. छोट्या कामांसाठीही दोन ते तीन महिने लागत असल्याने नागरिक त्रस्त झाले असून, ही कामे जलदगतीने पूर्ण करावीत, अशी मागणीही करण्यात आली आहे. याशिवाय प्रधानमंत्री घरकुल आवास योजना, रमाई आवास योजना आणि इंदिरा आवास योजनेअंतर्गत मंजूर लाभार्थ्यांचे घरकुल बांधकामाचे थकीत हप्ते तात्काळ अदा करावेत, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या सर्व मागण्यांबाबत समन्वय साधून तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा जिल्हाध्यक्ष गायकवाड यांनी व्यक्त केली.

यावेळी तालुकाप्रमुख भारत कदम, शहरप्रमुख नागेश धीरे, बाबा टोपे, गौतम हजारे, बजरंग धावारे यांच्यासह पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

## उमरगा उड्डाणपूल अंधारात; पथदिव्यांचा पुन्हा बोजवारा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२ मे -**



सोलापूर-हैदराबाद या अत्यंत वर्दळीच्या महामार्गावरील उमरगा चौरस्ता येथील उड्डाणपूल सध्या अक्षरशः अराजकतेचं प्रतीक बनला आहे. काही दिवसांपूर्वी मोठ्या थाटामाटात सुरू करण्यात आलेले पथदिवे पुन्हा काहीच दिवसांत बंद पडल्याने नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. सुरुवातीला दिलासा मिळाल्यानंतर आता पुन्हा पुलावर अंधाराचं साम्राज्य परतलं आहे.

सध्या परिस्थिती अशी आहे की, उड्डाणपूलाच्या एका बाजूला दिवे सुरू आहेत, तर दुसऱ्या बाजूला पूर्ण अंधार आहे.

प्रशासनाने उजेड आणि अंधार यांचं विचित्र संतुलन साधलं आहे का, असा उपरोधिक सवाल नागरिक विचारत आहेत. हा प्रकार केवळ तांत्रिक बिघाड म्हणून झटकून चालणार नसून, तो निष्काळजीपणा आणि ढिसाळ कारभाराचा जिवंत पुरावा असल्याची टीका होत आहे.

दररोज हजारो वाहनं या पुलावरून वेगाने धावत असतात. रात्रीच्या वेळी अचानक अंधारात प्रवेश झाल्यावर वाहनचालकांचे डोळे दिपतात, अंदाज चुकतो आणि अपघाताचा धोका अनेक पटींनी वाढतो.

विशेषतः दुचाकीस्वार, प्रवासी बस आणि जड वाहनांसाठी हा अंधार म्हणजे मृत्यूचा सापळा ठरत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. अपघात झाल्यास जबाबदारी कोण घेणार, असा थेट प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

कर भरताना आम्ही पुढे, पण सुविधा देताना प्रशासन मागे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

काही दिवसांपूर्वी पथदिव्यांच्या उद्घाटनासाठी फोटोसेशन करणारे संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधी आता मात्र गायब असल्याची टीका होत आहे.

अंधारामुळे केवळ अपघाताचा धोका वाढलेला नाही, तर भीतीचं वातावरणही निर्माण झालं आहे. लूटमार किंवा इतर गुन्ह्यांची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रवाशांना रोजच्या प्रवासात मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

आता नागरिकांची मागणी स्पष्ट आहे - उमरगा उड्डाणपूलावरील सर्व पथदिवे तात्काळ दुरुस्त करून कायमस्वरूपी सुरू ठेवावेत, दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांच्या जीवाशी चाललेला हा खेळ त्वरित थांबवावा. अन्यथा, हा अंधार केवळ रस्त्यावरच नव्हे, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही कायमस्वरूपी काळा डाग ठरणार आहे.

## रुईभर येथील जयप्रकाश विद्यालयाचा बारावी निकाल १०० टक्के

### विज्ञान व कला शाखेत उज्ज्वल यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२ मे -**

येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला असून विद्यालयाने उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान व कला या दोन्ही शाखांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.



विज्ञान शाखेतील प्राविण्यप्राप्त विद्यार्थी केवटे गायत्री गुरुलिंग ९३.५० टक्के, खिस्ती श्रेयश चंद्रकांत ९२.१७ टक्के, माने दीक्षा नारायण ९० टक्के, इंगळे पुष्कर धनंजय ९० टक्के, एकंडे वैष्णवी गजेंद्र ८९.५० टक्के, जानराव श्रेया विनोद ८८.६७ टक्के.

कला शाखेतील प्राविण्यप्राप्त विद्यार्थी दूधभाते प्रतिक सचिन ८१.५० टक्के, पटेल मुडसिरा गौस ८०.१७ टक्के, शित्रे रागिणी रमेश ७९.६७ टक्के, नलावडे अभिषेक चंद्रकांत ७६.१७ टक्के, कांबळे सोनाली भागवत ७५.८३ टक्के. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा शिक्षणमहर्षी सुभाष दादा कोळगे, रामदास आण्णा कोळगे, राजनारायण कोळगे, प्राचार्य जयप्रकाश कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, प्राचार्य संतोष कपाळे, मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## नळदुर्ग येथे महाराष्ट्र दिन साजरा; ऐतिहासिक किल्ल्यावर मुख्य ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ मे -**

नळदुर्ग येथे दि.१ मे रोजी महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळा, महाविद्यालये, नगरपालिका, हुतात्मा स्मारक, पोलिस ठाणे, महामार्ग पोलिस कार्यालय यांसह शासकीय व निमशासकीय कार्यालयांवर राष्ट्रीय ध्वज फडकावण्यात आला.

ध्वजारोहणाचा मुख्य कार्यक्रम सकाळी ९.१५ वाजता नळदुर्ग किल्ला या ऐतिहासिक किल्ल्यावर पार पडला. याठिकाणी नळदुर्गचे अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला. नगरपालिकेत नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष, नगरसेवक-नगरसेविका, मुख्याधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

किल्ल्यावर झालेल्या मुख्य कार्यक्रमाला नगराध्यक्ष बसवराज धरणे, पाणीपुरवठा समितीचे सभापती तानाजी जाधव, बांधकाम समितीचे सभापती शशिकांत (पांडु) पुदाले, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर घोडके, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, विशाल डुकरे, विलास येडगे, आयुब शेख, तलाठी वायचळ तसेच पुरातत्त्व विभागाचे किल्ला इन्चार्ज नागनाथ गवळी यांच्यासह विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

## भोत्रा येथील सुनील पवार यांना 'समाज गौरव पुरस्कार' प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२ मे -**



परंडा तालुक्यातील भोत्रा गावचे सुपुत्र व सामाजिक कार्यकर्ते सुनील दिगंबर पवार यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त पुणे-चिंचवड येथे 'समाज गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व महाराष्ट्र वडार मजूर शिल्प प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यास पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवीभाऊ लांडगे, उपमहापौर सौ. शर्मिला बाबर, मंत्रालय गृह विभागाचे अधिकारी यशवंतराव लष्करे, उच्च तंत्र शिक्षण विभागाचे अधिकारी सुधीर पवार, एमआयडीसीचे चीफ इंजिनिअर कालीदास भांडकर, ज्येष्ठ साहित्यिक टी. एस. चव्हाण, भारतीय सशस्त्र दलाचे कर्नल ऋषिकेश धोत्रे, ससून रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी सदाशिवराव जाधव, सभापती कैलास कुटे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी उपमहापौर मुकारी आलगुडे, उद्योजक संजय भोसले, नितीन दादा धोत्रे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

तसेच 'मी वडार महाराष्ट्राचा' पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष रवी दादा शिंदे, मजूर शिल्प प्रतिष्ठानचे शाम विटकर, पिटू जाधव, विष्णु आण्णा चौगुले (सोलापूरकर), सागर ओरसे, लखन पाटकर, वडार एकता परिषदचे भरत विटकर, ज्येष्ठ पत्रकार रमेश जेठे, नगरसेविका अर्पणा कुराडे, वैशाली काळभोर, नगरसेवक प्रमोद कुटे यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, अधिकारी, उद्योजक व संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी गुळहळळी पाटी ते नळदुर्ग मोटारसायकल रॅली

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२ मे -**



महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने विविध प्रलंबित मागण्यांसाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी गुळहळळी पाटी ते नळदुर्ग दरम्यान मोटारसायकल रॅली काढण्यात आली.

शेतकऱ्यांचा पीकविमा, थकीत ऊस बिल, राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५२ भूसंपादन प्रकरणात न्यायालयाच्या आदेशाचा अवमान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई, पूर्वीप्रमाणे एक रुपयांत पीकविमा योजना पुन्हा सुरू करणे, तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क माफ करून भरलेले शुल्क परत देणे अशा विविध मागण्यांसंदर्भात यापूर्वीच पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले होते.

या मागण्यांची तातडीने अंमलबजावणी व्हावी, यासाठी १ मे रोजी काढण्यात आलेली ही रॅली गुळहळळी पाटी येथून सुरू होऊन नळदुर्ग येथे संपन्न झाली.

रॅलीनंतर आयोजित सभेत शेतकरी संघर्ष समितीचे दिलीप जोशी व सरदारसिंग ठाकुर यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी त्यांनी जिल्हा प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे शेतकऱ्यांना शासकीय मदतीपासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप केला.

शेतकरी आर्थिक अडचणीत असताना शासनाकडून मिळणारी मदत अपुरी व तुटपुंजी असल्याची टीकाही त्यांनी केली.

या रॅलीत दिलीप जोशी, सरदारसिंग ठाकुर, व्यंकट पाटील, पंडीत पाटील, विक्रम निकम, महेश घोडके, महादेव बिराजदार, पंडीत निकम, नरसिंग निकम, अजमोद्दीन शेख, दिलीप पाटील, काशिनाथ काळे, बंडू मोरे, हरी सुरवसे, गुलाब शिंदे, मानसिंग ठाकुर, बालाजी ठाकुर, प्रताप ठाकुर, दशरथसिंग ठाकुर, श्रीकांत पोतदार, पिरपाशा इनामदार यांच्यासह शेतकरी सहभागी झाले होते.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## आरटीई अंतर्गत फक्त ११९३ प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** आरटीई २५ टक्के प्रवेश लॉटरी पद्धतीने निवड झालेल्या २२६९ बालकांपैकी पहिल्या टप्प्यात केवळ ११९३ प्रवेश झाले असून, आणखी १०६८ प्रवेश शिल्लक असल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रवेश घेण्यात पालकांकडून दिरंगाई होत असल्याने शिक्षण संचालकांनी ८ मेपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

लातूर जिल्ह्यात इंग्रजी माध्यमाच्या २०७ शाळा असून, या शाळांमध्ये २५ टक्के आरटीईप्रमाणे २२६९ प्रवेश करायचे आहेत. गेल्या बारा दिवसांपासून प्रवेश प्रक्रिया सुरू असली तरी बऱ्याच पालकांकडे शिक्षण

विभागाचे कर्मचारी न पोहोचल्याने अनेकांनी प्राथमिक शिक्षण विभागाकडे गाऱ्हाणे केले. पालकांची ही अडचण ओळखून शिक्षण संचालकांनी ८ मेपर्यंत मुदवाढ दिली. आतापर्यंत २२६९ पैकी ११९३ प्रवेश झाले असून, ८ प्रवेश रद्द झाले आहेत. १०६८ प्रवेश आणखी व्हायचे आहेत. यासाठी आणखी आठ दिवसांची मुदत दिली असून, पालकांना मुदतवाढीमुळे दिलासा मिळाला आहे. प्राथमिक शिक्षण विभागाने पालकांना सहकार्य केल्यास प्रवेश लवकर होतील, अशी पालकांची अपेक्षा आहे.



## विविध वृत्त...

### बौद्ध साहित्य संमेलनाध्यक्षपदी प्रा.डॉ.प्रशांत गायकवाड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** दि. १० मे २०२६ रोजी भालचंद्र ब्लड बँक, लातूर या ठिकाणी होणाऱ्या दुसऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ.प्रशांत गायकवाड यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्घाटन रोहित पिसाळ यांच्या हस्ते होणार आहे.

या संमेलनाच्या चर्चा सत्रामध्ये डॉ. नारायण कांबळे, डॉ.विजय गैबीमोरे, डॉ.गिरीश मोरे, अमित मेधावी यांच्यासह अनेक साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. समारोपासाठी ज्येष्ठ आंबेडकरी नेते प्रा. सुकुमार कांबळे यांची उपस्थिती राहणार आहे. तरी या संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन अध्यक्ष-चंद्रकांत शिंदे, कार्याध्यक्ष-राजेंद्र कांबळे, उपाध्यक्ष-भगवान लोखंडे, डी. एस.नरसिंगे, सचिव-यु.डी.गायकवाड, कोषाध्यक्ष - एम.एम.बलांडे, राजेंद्र बनसोडे, मुख्य निमंत्रक - ॲड.धम्मदिप बलांडे, रविंद्र राजेगावकर, शांतरक्षीत सुरवसे, डॉ.लहु वाघमारे, देवदत्त बनसोडे, अशोक बनसोडे, मारूती सरवदे, अलका गायकवाड, मंगलताई कांबळे, पल्लवी घोबाळे आदींनी केले आहे.

### लोकशाही दिन ४ मे रोजी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार मे महिन्यातील जिल्हास्तरीय लोकशाही दिन ४ मे २०२६ रोजी दुपारी १ वाजता लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात होणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले.

### लॉर्ड श्रीकृष्णमध्ये निबंध स्पर्धा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** लातूर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुल मध्ये जलशक्ती पंधरवड्यानिमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सर्व प्रथम शाळेतील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाची सुरवात प्राचार्या रुपाली कुलकर्णी, शाळेचे समन्वयक रौफ शेख, शाळेच्या समन्वयिका रुपाली कोक ाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, संगीता शेटे, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये जल शपथ घेऊन केली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी जलशक्ती पंधरवड्याच्या उपक्रमांतर्गत शाळेतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेमधील विविध संकल्पना शाळेमध्ये राबवण्याचा मानस आहे असे शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी यांनी सांगितले. या स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, शाळेच्या प्राचार्या रुपाली कुलकर्णी, पालक यांनी कौतुक केले. सदरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शिक्षक, शिक्षिकांनी परिश्रम घेतले.

### सिग्नल टाईमिंग कमी करण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २ मे : वाढत्या उन्हामुळे वाहन चालकांची लाही-लाही होत आहे. त्यामुळे सिग्नल टाईमिंग कमी करण्याची मागणी वाहनधारकांकडून होत आहे.

# जिद्दीच्या वारशातून लातूर जिल्ह्याचा विकास साधूया : पालकमंत्री

## महाराष्ट्र राज्य स्थापना दिनी लातूर येथे राष्ट्रध्वज वंदन समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** भूकंपाच्या संकटाने हादरलेल्या लातूर जिल्ह्याने अत्यंत जिद्दीने स्वतःला पुन्हा उभे केले आणि आपली क्षमता सिद्ध केली. तोच जिद्दीचा वारसा पुढे नेत. आपण राज्याच्या विकास प्रक्रियेत्त लातूरचे नाव अग्रभागी नेऊया आणि जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधूया, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आज येथे केले.



महाराष्ट्र राज्याच्या ६७ च्या स्थापना दिनानिमित्त बाभळगाव रोडवरील पोलीस मुख्यालय प्रांगणात मुख्य शासकीय राष्ट्रध्वज चंदन समारंभात पालकमंत्री श्री.. भोसले बोलत होते. या प्रसंगी जिल्हा परिषद अध्यक्षा उषा-ताई पाटील, प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त मानसी मीना यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि नागरिक मोठ्धा संख्येने उपस्थित होते, पालकमंत्र्यांनी यावेळी सर्व जिल्हावासीयांना महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि बुद्ध पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन करून

आणि महापुरुषांच्या विचारांचे स्मरण करून पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले, महाराष्ट्राने गेल्या ६६ वर्षांत तंत्रज्ञान, उद्योग आणि शेती क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वप्नात महाराष्ट्र आघाडीवर राहील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्ह्याचा विकास वेगाने होत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेती विकास आणि जलसंधारणासाठी जिल्ह्यात जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियान राबविले जात आहे. मनरेगा आणि भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेतून गतवर्षी ७३० हेक्टरवर फळबाग लागवड करण्यात आली आहे. जिल्ह्यात मागील वर्षी पूर, अतिवृष्टीने शेतपिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ९२८ कोटी २८ लाख रुपयांची मदत वितरीत करण्यात आली आहे, असे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले.

प्रलंबित जिल्हा रुग्णालयाचा प्रश्र्न मार्गी लागला असून या रुग्णालयाचे नुकतेच

भूमिपूजन झाले आहे. लवकरच याठिकाणी ५०० खाटांचे सुसज्ज जिल्हा रुग्णालय उभे राहील. त्यामुळे आरोग्य सेवा अधिक बळकट होणार आहे.

तसेच मुख्यमंत्री सहायता निधी आणि आयुष्मान भारत महात्मा ज्योतिचा फुले जनआरोग्य योजनेतून गरजू रुग्णांवर कोटचवधी रुपयांचे मोफत उपचार करण्यात आले आहेत. मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मिळविण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाईन व अधिक गतिमान झाल्याने रुग्णांना मदत होणार असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी नमूद केले.

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत जिल्ह्यात आतापर्यंत ७ हजार

किलोमीटर रस्त्यांची कामे झाली आहेत. लातूर शहरासाठी ६० किलोमीटरचा रिंग रोड मंजूर असून, त्यासाठी ४८ किलोमीटर भूसंपादन पूर्ण झाले आहे. या मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळावा, यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. आशियाई विकास बँकेच्या मदतीने जिल्ह्यात ८६ किलोमीटर रस्त्यांची कामे सुरू आहेत. अर्थसंकल्पात १४७ कोटी रुपयांची नवीन कामे मंजूर झाली आहेत, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले.

येणारा काळ हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा आहे. भूकंपानंतर लातूरला पुन्हा उभे करणाऱ्या या मातीतील मुलांनी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, लातूरचा विद्यार्थी नोकरी मागणारा नव्हे, तर नोकरी देणारा बनला पाहिजे, हेच आपले स्वप्न असल्याचे पालकमंत्र्यांनी यावेळी सांगितले. सध्या उन्हाळा अधिक तीव्र

आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि कामगार बांधवांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. जिल्ह्यातील पाणी टंचाईसाठी २० कोटी ९६ लाख रुपयांचा आराखडा मंजूर केला आहे. सध्या २ टैंकर सुरु असून २५ विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यंदा एल निनोमुळे कमी पाऊस अपेक्षित आहे, त्यामुळे खरीप हंगामासाठी विशेष तयारी केली जात आहे. पाणी टंचाईचे संभाव्य संकट लक्षात घेवून नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले. पालकमंत्री श्री. भोसले यांनी

यावेळी पोलीस परेडचे निरीक्षण केले. उपविभागीय अधिकारी अरविंद रायबोले यांनी पोलीस परेडचे नेतृत्व केले. पोलीस पथकांसह गृहरक्षक दल, राष्ट्रीय छा सेना, पोलीस बॅण्ड पथक, चान पथक, वज्र चाहन, बॉम्ब शोधक पथक, जलद प्रतिसाद पथक, रुग्णवाहिका यांच्यासह विविध शासकीय विभागांचे चित्ररथ या पथसंचलनात सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, शहीद जवानांच्या वीरपत्नी, वीरमाता आणि वीरपिता यांची पालकमंत्री श्री. भोसले यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार केला आणि महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला, तसेच जिल्हा युवा पुरस्कार, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार, टॅलेंट सर्च परीक्षे-तील यशस्वी विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव फड यांनी केले.

## जीवनाला आकार देणाऱ्या शिक्षकांचे संस्कार, ज्ञान कायम जिवंत राहते : कराड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** शिक्षक म्हणजे गुरु आणि गुरु म्हणजे विचार हा विचार कधीच सेवानिवृत्त होत नसतो तो विचार सातत्याने ज्वलंत राहणारा आहे. शिक्षक हे केवळ शिकवत नाही तर विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्याचे काम करतात त्यांचे संस्कार आणि ज्ञान कायम जिवंत राहतात खऱ्या अर्थाने शिक्षक हे कधीच निवृत्त होत नाहीत तर ते कायम मार्गदर्शकाच्या भूमिकेतून कार्यरत राहणारे व्यक्तिमत्व आहे असे प्रतिपादन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर येथील रेणुका शिक्षण संस्थेच्या श्रीराम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे यांच्या सेवापूर्तीचा गौरव सोहळा शुक्रवार १ मे २०२६ रोजी मराठवाडा विभागाचे शिक्षक आ. विक्रम काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला याप्रसंगी ऋषिकेशदादा कराड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी माजी आ. बब्रुवान खंदाडे, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती सौ. शिवकन्याताई गोडभरले, पसं उपसभापती शरद दरेकर, रेणापुरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, जेष्ठ मार्गदर्शक ओमप्रकाश गोडभरले, शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदास कुटवाड, सचिव पंडितराव उगले,` यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती.

शाळेत जाईपर्यंत आई-वडिल घडवतात आणि आयुष्याला दिशा देण्याचे काम शिक्षक करीत असतात. शिक्षण ही अखंड चालणारी प्रक्रिया असून शिक्षकांच्या गुरूंच्या मार्गदर्शनामुळेच अनेकांच्या जीवनात मोठे परिवर्तन घडले असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड म्हणाले की, सिद्धेश्र्वर मामडगे यांनी शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या त्याचबरोबर संस्थेच्या प्रगतीत मोलाची कामगिरी केली असून आज जरी ते सेवानिवृत्त होत असले तरी उर्वरित आयुष्यातील वाटचालीचा समाजासाठी, कुटुंबासाठी आणि स्वतःसाठी नवा अध्याय सुरू करत आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि ज्ञानाचा प्रकाश सतत पसरत राहील त्यांच्या हातून या पुढील काळातही समाजाची सेवा घडो अशा सदिच्छा दिल्या.

गावचे सरपंच, चेअरमन, पतसंस्थेचे चेअरमन जिथे जाईल तिथे मिळालेल्या संधीच सोनं करण्याचा प्रयत्न विविध पुरस्कार प्राप्त सिद्धेश्र्वर मामडगे सरांनी केला असल्याचे उद्गगार काढून आ. विक्रम काळे म्हणाले की, हजारो विद्यार्थी घडविण्याचे काम त्यांच्या हातून झाले असून शिकून किती गेले यापेक्षा शिकलेले काय करतात हे महत्त्वाचे आहे. मामडगे सरांनी अत्यंत निष्ठेने कर्तव्य निभावले आहे. प्रत्येक कामात स्वतःला झोकून देऊन कार्य केले असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. प्रारंभी अनिल कुटवाड यांनी आपल्या प्रास्ताविकातून सिद्धेश्र्वर मामडगे यांच्या कार्याचा आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वामी आणि शेवाळे यांनी केले. या कार्यक्रमास शैक्षणिक सामाजिक व इतर विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'स्व-गणना' सुविधेचा लाभ घेवून जनगणना प्रक्रियेत सहभाग नोंदवावा : पालकमंत्री




**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. २ मे :** देशाच्या भविष्यातील विकासाचे अचूक नियोजन करण्यासाठी जनगणना प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे. ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि आधुनिक करण्यासाठी केंद्र सरकारने प्रथमच 'स्व-गणना' ही विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेचा लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घेऊन या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले आहे. त्यांच्या उपस्थितीत स्व-गणना मोहिमेला सुरुवात करण्यात आली.

१ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत नागरिकांना घरबसल्या स्वतःच्या कुटुंबाची माहिती नोंदवता येणार आहे. यासाठी नागरिकांनी ाश.लशर्पीी.सीें.ळप या अधिकृत पोर्टलवर जाऊन कुटुंब प्रमुखाच्या मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करणे आवश्यक आहे. एकदा माहिती यशस्वीरीत्या भरली की, नागरिकांना एक 'डएखऊं प्राप्त होईल. १६ मे पासून जेव्हा शासकीय प्रगणक घरोघरी भेटी देतील, तेव्हा त्यांना केवळ हा 'आयडी' दाखवल्यास जनगणनेची प्रक्रिया तातडीने पूर्ण होईल. या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून माहितीमध्ये अचूकता राहण्यास मदत होणार आहे.

भारताची जनगणना २०२७: आता तुम्हीच करू शकता तुमची नोंदणी क्र. १२३४५६७८९०१ लातूर जनगणनेच्या या पहिल्या टप्प्यात मुख्यत्वे घरांची माहिती संकलित केली जाणार असून, दुसरा टप्पा २०२७ मध्ये पार पडेल. प्रशासनाकडून विचारल्या जाणाऱ्या प्रश्र्नांची नागरिकांनी अचूक उत्तरे द्यावीत आणि या राष्ट्रीय कार्यात प्रशासनाला पूर्ण सहकार्य करावे. आपली अचूक नोंदणी, हेच देशाच्या उज्ज्वल भविष्याचे नियोजन आहे, असे नमूद करत पालकमंत्र्यांनी स्व-गणना सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

## राजकुमार बेलुरे व विजय कुलकर्णी यांचा सेवागौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ मे :** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयातील नाईक राजकुमार बेलुरे (४० वर्षे सेवा ) व सेवक विजय कुलकर्णी (३५ वर्षे सेवा ) हे आपल्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकीर्दीनंतर नियत वयोमानानुसार दि. ३० एप्रिल २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांचा सेवागौरव सोहळा संपन्न करण्यात आला.




यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य संजय गुरव, स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर, शालेय समितीचे अध्यक्ष गंगाधर खेडकर, सत्कारमूर्ती राजकुमार बेलुरे व सुरेखा बेलुरे तसेच विजय कुलकर्णी व अनुराधा कुलकर्णी, विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता व भारत माता यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.

यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी सत्कारमूर्तींनी केलेल्या कार्याविषयी माहिती सांगून, त्यांना सेवानिवृत्तीनंतरच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष धनंजय तुंगीकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, शाळा सुरू झाल्यापासून ते संपेपर्यंत कार्य करणारे असे आजचे सत्कारमूर्ती आहेत. त्यांचे श्रम हे अमूल्य आहेत. त्यांचा असलेला जनसंपर्क, शाळेसाठी दिलेले योगदान, सर्व कामातील पारंगतता याबद्दल माहिती सांगितली.

यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख यांनी अध्यक्षीय समारोपात सत्कारमूर्तींचे गुणवैशिष्ट्ये सांगताना असे सांगितले की, गृहसंपर्क असणारे, कर्तव्यनिष्ठ , प्रामाणिक व विद्यार्थीप्रिय व शिक्षकप्रिय असे सेवक आहेत त्यांनी संस्थेच्या उभारणीमध्ये रात्रंदिवस काम केले. सेवानिवृत्तीनंतरच्या काळात भारत भ्रमण करावे, चारधाम यात्रा करावी तसेच कुटुंबाला जास्तीत जास्त वेळ द्यावा अशी इच्छा व्यक्त करून त्यांना सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी विद्यालयाच्या वतीने सत्कारमूर्ती राजकुमार बेलुरे व विजय कुलकर्णी यांचा यथोचित सपत्नीक सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक,परिचय व स्वागत रंजना साकोळे यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन दिपाली मुचाटे यांनी केले तर कांचन तोडकर यांच्या कल्याणमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, इंदू ठाकूर, अंजली निर्मळे, राम जोशी,धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, सहप्रमुख मीरा चामवाड, कार्यक्रम प्रमुख रंजना साकोळे, सहप्रमुख सुवर्णा कुलकर्णी , व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## न्यू'वाले इंग्लिश स्कूल'चे यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२ मे :** स्थानिक अस्मिता फुटबॉल लीग २०२५-२६ अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेत बसवणप्पा वाले न्यू इंग्लिश मीडियम स्कूल (खाडगाव रोड) च्या संघाने शानदार कामगिरी करत विजेतेपद पटकावले. संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल येथे २९ व ३० एप्रिल रोजी ही स्पर्धा पार पडली. यामध्ये शाळेच्या इयत्ता ९ वी व १० वीच्या संघाने आपल्य कौशल्याच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावून चषकावर नाव कोरले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव मकरंद सावे, प्राचार्य भोगडे, उपप्राचार्य बाकलीकर व सुपरवायझर भारती यांनी खेळाडूंचे कौतुक केले. क्रीडा शिक्षक गणेश गिराम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा विजय मिळवला.

## 'संघर्षयोद्धा राजा हरिश्चंद्र जाधव' पुस्तकाचे प्रकाशन



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २ मे :** हैदराबाद मुक्ती लढ्यातील थोर सैनिक राजा हरिश्र्चंद्र जाधव यांच्या जीवनावर आधारित 'हैदराबाद मुक्ती लढ्यातील संघर्षयोद्धा राजा हरिश्चंद्र जाधव' या पुस्तकाचे नुकतेच विमोचन माईर्स एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या हस्ते करण्यात आले.

ज्येष्ठ विधीज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड. बळवंत जाधव यांचे वडील राजा हरिश्चंद्र जाधव यांच्या जीवनातील सामाजिक व कौटुंबिक मागोवा या पुस्तकात घेण्यात आला आहे. डॉ. विवेक सौताडेकर या पुस्तकाचे लेखक व संपादक आहेत.

या पुस्तकाची प्रस्तावना प्रा. डॉ. विश्र्वनाथ कराड यांची असून, या पुस्तकात ॲड. कालिदास देशपांडे, प्रा. ॲड. बी. व्ही. मोतीपवळे, ॲड. व्यंकट बेद्रे, डॉ. हंसराज बाहेती, पत्रकार जयप्रकाश दगडे, गोपाळ कुळकर्णी तसेच वैभव सूर्यवंशी, शेख हबीब बशीर, एस. नजीर, श्रीहरी कांबळे, बी. एम कांबळे, अंकुश जाधव, ॲड. तेजस्वी जाधव, ॲड बळवंत जाधव आदींचे लेख आहेत. यावेळी उषामती कराड, ॲड. बळवंत जाधव, ॲड. मंचकराव डोणे यांची प्रमुख उपस्थिती होती.